स. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ४५५
REFBK-0004473

सनो ५९३९

॥ श्रीशं वन्दे ॥

# क्रांतियुग.

लेखक



REFBK-0004473

श्री. त्रिविक्रम विष्णु वैद्य.

मुद्रक व प्रकाशक

दत्तात्रय गोविंद सडेकर

प्रो. 'धनंजय' प्रेस, खानापूर ( जि. बेळगांव. )

सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन.

# निवेदन.

मी. ... ३ गे.

परकीयांच्या दाबाखालीं चेंगरलेल्या आशियांतील प्रमुख राष्ट्रांनीं क्रांतियुगास आरंभ करून परकीयांच्या मगरमिठींतून आपली सुटका कशी करून घेतली, हा इतिहास भारतीय लोकांस प्रस्तुतकालीं अत्यंत बोधप्रद आहे. "पुढच्यास ठेंच आणि मागचा शहाणा" या न्यायानें ह्या क्रांतिकार्यांत अन्यराष्ट्रांस कोणत्या अडचणी आल्या आणि त्या त्या राष्ट्रांतील मुत्सद्द्यांनीं त्यांचें कोणत्या रीतीनें निवारण केलें ह्यांचें पूर्ण ज्ञान असल्याशिवाय स्वराष्ट्रोद्धाराचा मार्ग बिनचूक आकलन होणें सहसा शक्य नाहीं. इतिहासाच्या प्रकाशांतच भविष्याचा मार्ग आक्रमण करून जगांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं आपलें ध्येय दृष्टिपथांत आणलेलें आहे. सत्य, अहिंसा आणि इंद्रियनिग्रह हे गुण कितीहि जरी उपयुक्त असले तरी व्यक्तीचा पारलौकिक मोक्ष घडवून आणण्यांत फार झालें तर त्यांचा उपयोग होईल. राष्ट्राला ऐहिकमोक्ष मिळवून देणारे सद्गुण निराळेच आहेत. राष्ट्रीयमोक्षांत जर वरील गुणांचा अतिरेक झाला तर सत्यामुळें कार्यघात, अहिंसेमुळें पौरुषघात आणि इंद्रियनिग्रहामुळें आत्मघात होऊन राष्ट्र चिरकाल पारतंत्र्यांत खितपत पडल्याशिवाय राहत नाहीं.

प्रस्तुत पुस्तक आम्हीं कित्येक वर्षांपूर्वीच लिहून हातावेगळें केलें होतें. मध्यंतरी चुलत्याच्या आकस्मिक निधनामुळें आमच्या बावीस माणसांच्या मोठ्या कुटुंबाचा सर्वभार आमच्या शिरावर पडल्यानें पुस्तक प्रकाशनाचें कार्य तसेंच पडून राहिलें. पुस्तक प्रकाशनाला जसजसा विलंब लागूं लागला तसतसा अनेक राष्ट्रांत घडून येणाऱ्या स्थित्यंतरांचाहि इतिहास ह्या पुस्तकांत समाविष्ट करण्याची आवश्यकता तीव्रपणें

असूं लागली; पण सांसारिक कार्यव्यापामुळें परराष्ट्रीय राजकारणावरील अनेक गहन ग्रंथ मननपूर्वक वाचण्याचें चित्तस्वास्थ्य लाभूं शकलें नाहीं, ह्मणून हा ग्रंथ गुलदस्तांतच ठेवण्याचा आमचा विचार होता; परंतु आमचे कनिष्ठ बंधु व गोमांतक गौरव ग्रंथमालेचे चालक चि. व्यंकटेश विष्णु वैद्य ह्यांच्या अत्याग्रहावरून हा कांहींअंशीं अपूर्ण असलेला ग्रंथ महाराष्ट्रीय वाचकवर्गापुढें ठेवण्यांत येत आहे. असल्या गहनाविषयावरील पुस्तकास प्रस्तुतकालीं ग्राहक मिळण्याचा फारसा संभव नसतां किंवा ग्रंथकार ह्मणून आमचा मोठासा लौकिकहि नसतां हें पुस्तक प्रकाशांत आणण्यांत प्रकाशकाची स्वकीयत्वाचीच भावना कारणीभूत झाली आहे, यांत संशय नाहीं.

पुस्तकाच्या ह्या प्रथम खण्डांत कांहीं प्रमुख राष्ट्रांचा इतिहास समाविष्ट करतां आला नाहीं. ह्या प्रथम खंडाची उपयुक्तता जर वाचकवर्गास पटली, तर द्वितीय खण्डहि लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल कारण गोमांतकांत पुस्तक प्रकाशनाचा व्यवसाय किती नुकसानकारक आहे ह्याची कोणत्याहि सूज्ञ मनुष्यास जाणीव करून देण्याची आवश्यकता नाहीं. ह्या परिस्थितीमुळें किती तरी विद्वानांची विद्वत्ता उपेक्षेच्या काळोखांत कुजत चालली आहे ! सर्वांनीं त्वरित सहकार्य करून या अनर्थाला आळा घालणें परम आवश्यक नाहीं काय ?

कुंकळ्ळी—गोवा.
ता. १५।८।३१.

सर्वांचा नम्र,
त्रिविक्रम विष्णु वैद्य.

# अर्पणपत्रिका.

गोमांतकीय क्रांतियुगाचे अग्रदूत

श्री. गोविंद पुंडलिक हेगडे देसाई

यांस

मित्रत्वाचें अल्पसें चिन्ह म्हणून

हें पुस्तक सप्रेमादरपूर्वक

अर्पण करीत आहें.

ग्रंथकर्ता.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ अफगाणिस्थान | १ |
| २ तुर्कांची भवितव्यता | १० |
| ३ आशियांतील इराण | २१ |
| ४ इजिप्तचा ग्रास | २८ |
| ५ तिबेट | ३३ |
| ६ आशियांतील हालंड | ४० |
| ७ सयामचें भक्षण | ४५ |
| ८ आशियांत फ्रान्स | ५५ |
| ९ मलायाचें भक्षण | ५९ |
| १० आशियांत इंग्लंड | ६३ |
| ११ रूसो-जपानी युद्ध | ७१ |
| १२ फिलिपीनोचें पारतंत्र्य | ७९ |
| १३ आशियांत रशिया | ८६ |
| १४ कोरियाचें पारतंत्र्य | ९९ |
| १५ जपानची उत्क्रांति | ११७ |

# कालियुग.

## अफगाणिस्थान.

नं. ८२९ ता.

जेव्हां रशियानें मध्य आशियामध्यें प्रवेश केला, तेव्हांपासून अफगाणिस्थान आपल्या अधिसत्तेखालीं राखण्याची अत्यंत अवश्यकता आहे ही गोष्ट इंग्रजी मुत्सद्यांच्या पूर्णपणें प्रत्ययास आली. कारण जर रशियानें आपलें स्वामीत्व कोणत्याही उपायानें आफगाणिस्थानावर बसविलें, तर इराणच्या खाडीपर्यंतच नव्हे तर बलुचीस्थान, काफिरीस्थान, वझिरीस्थान इत्यादि प्रांतांना त्याचा शह लागून हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीलाही उपद्रव पोंचण्याचा फार संभव आहे. हा विचार मनांत आणून अफगाणिस्थानांवर आपलें स्वामीत्व स्थापन करणें परम आवश्यक आहे. असें जेव्हां इंग्रजलोकांस वाटलें, तेव्हां त्यांनीं न्यायान्यायाचा कांहींच विचार न करितां १८३९; १८४२; १८७८ आणि १८८० यांमध्यें अफगाणिस्थानावर जुलमानें आक्रमण केलें. ह्या चारही युद्धांत इंग्रजांना अतोनात खर्च आला व पुष्कळ प्राणहानीही सोसावी लागली; परंतु धोरणी इंग्रजसरकारनें हा सर्व खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीवर जबरदस्तीनें लादल्यानें खुद्द इंग्लंडास त्यामुळें कांहींच तोशीस लागली नाहीं. पुढें जेव्हां पंजाब व बलुचीस्थान या प्रांतांत धर्त इंग्रजसरकारनें आपले पाय चांगल्या रीतीनें रोवले, तेव्हां इंग्रजसरकारला पूर्वीं जितकें आफगाणिस्थानचें भय वाटत असे तितकें वाटेनासें झालें. विसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंड आणि रशिया यांचें वैर फारच विकोपास गेलें होतें. त्यामुळें यापुढें इंग्लंडला सर्वांत मोठें युद्ध फ्रान्स व रशिया यांच्याशीं करावें लागेल अशी त्यावेळीं बहुतेक इंग्रजी मुत्सद्यांची खात्री होती. इंग्रजांना वसाहतींच्या स्वामीत्वामध्यें

आशियाखण्डांत रशियाचें व आफ्रिकाखंडांत फ्रान्सचें जास्त भय वाटत असे. रशिया आणि फ्रान्स ह्यांचा समाचार घेण्यास इंग्लंडनें जर्मनीशीं तह करणें आवश्यक आहे, असें त्यावेळीं कांहीं साम्राज्यभक्त इंग्रज प्रतिपादन करीत होते; पण जेव्हां फ्रान्स आणि रशिया या देशांशीं इंग्लंडचा तह घडून आला, तेव्हां जर्मनी इंग्लंडचा भारी मित्र होण्याऐवजीं भारी शत्रु मात्र झाला.

रशिया आणि इंग्लंड या दोघांहि प्रबल राष्ट्रांना खूष करून मोठ्या मिनतवारीनें आपलें राष्ट्र कायम ठेवणारा आफगाणिस्थानचा अमीर अबदुल रहिमानखान हा १९०१ सालीं परलोकवासी झाला. रशिया तुझ्या राष्ट्रावर स्वारी करील अशी भीति घालून इंग्रजसरकार त्यास नेहमीं भिववीत असे आणि या भीतीचें निराकरण करण्याकरितां तूं आपल्या देशांत तार व रेल्वे निर्माण कर असा मानभावी व आत्महितवर्धक उपदेश त्यास करीत असे; पण अमीर अबदुल रहिमानखान हा रशियाच्या रोगाला जितका भीत असे तितकाच किंवा त्याहिपेक्षां जास्त या इंग्रजी औषधालाहि भीत असल्यानें त्यानें इंग्रजांच्या या मानभावी उपदेशाचा आदर केला नाहीं. स. १९०० मध्यें त्यानें जें आपलें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें आहे, त्यांत या इंग्रजी धोरणाचें उत्तम आविष्करण केलें आहे. अफगाणिस्थानला एक बंदर व सरळ परराष्ट्राशीं दळणवळण ठेवण्याचा अधिकार असावा अशी त्याची उत्कट इच्छा होती. हिंदुस्थानसरकार आपल्या फायद्याकरितां अफगाणिस्थानांत व्यापाराचा नंगा नाच घालीत आहे हें त्यास मुळींच आवडत नसे. अफगाणिस्थानच्या व्यापारावर हिंदुस्थानसरकारचा अधिकार असावा हें त्याच्या मानी हृदयास कसेंसेंच वाटे, ह्मणून त्यानें आपल्या राज्यांतील घोडे हिंदुस्थानांत पाठविण्याची व हिंदुस्थानांतील मीठ आपल्या देशांत आणण्याची बंदी केली. त्याचवेळीं इराण, तुर्कस्थान व अफगाणिस्थान ह्यांनीं परकीय राष्ट्रांनीं कोणत्याही मुसलमानी राष्ट्रावर

आक्रमण केलें असतां, एकमेकांस सहाय्य करण्याचा तह केला. इंग्लंड किंवा रशिया यांपैकीं जें राष्ट्र आपलं स्वातंत्र्य धोक्यांत आणण्याचा कमी प्रयत्न करील, त्या राष्ट्राशीं तात्पुरतें मित्रत्वानें वागावें असें अमीर अब्दुल रहिमानखान यांचें तत्व होतें. स्वदेशांतर्गत कारभारांत ढवळाढवळ करून यांपैकीं जें राष्ट्र अफगाणिस्थानच्या स्वातंत्र्यावर गदा घालण्यास पाही त्यास तो आपला महान् शत्रू समजे. वास्तविक त्याचें इंग्रजांवर मुळींच प्रेम नव्हतें; पण तो इंग्रजांशीं सख्य ठेवल्यानें काय फायदा मिळण्याचा संभव आहे हें पूर्णपणें जाणून होता, ह्मणून इंग्रजांशीं नेहमीं मित्रत्वानें वागे. इंग्रजांना त्यानें कधींच दगा दिला नाहीं. तहांतील अटी योग्य रीतीनें पालन केल्या ह्मणूनच त्याच्या कारकीर्दींत अफगाणिस्थानची पुष्कळ उन्नति झाली आणि तें संघटित होऊन त्याला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त झाली. इजिप्तचा खदीव महमदअल्लीप्रमाणें तो परकीय देशांच्या मदतीनें स्वदेशाचा व्यापार व उद्योगधंदे वाढविण्यास इच्छित होता; पण त्याला स्वदेशाच्या स्वातंत्र्याचा बलि देऊन त्याच्या मोबदल्यांत ह्या वस्तु घेण्याची मुळींच इच्छा नव्हती.

वयाच्या विसाव्या वर्षीं त्याचा मुलगा हाबिबुल्लाखान हा पित्यापाठीमागून अफगाणिस्थानच्या गादीवर बसला. तो इंग्रजी शिकला होता आणि इंग्रजी चालीरीतींची त्यास फारच आवड असल्यानें तो इंग्रजांचा चाहता होता. बाप जिवंत असतांच राज्याचा सर्व कारभार तोच पहात असे. त्यानें आपल्या सैनिकांचा पगार वाढविल्यानें लष्करला तर तो फार प्रिय होता. स्वदेशांतील ज्या लोकांनीं पोटाच्या कांचणीमुळें हिंदुस्थानांत जाऊन वस्ती केली आहे, त्यांनीं स्वदेशास परत यावें, त्यांस शेतकीकरितां स्वदेशांत जमीन मिळेल असा राज्यारूढ होतांच त्यानें पहिला जाहीरनामा काढला. त्याचप्रमाणें राजकीय गुन्ह्यांवरून ज्या लोकांस हिंदुस्थानांत हद्दपार करण्यांत आलें आहे, त्यांनींही स्वदेशीं परत येण्यास हरकत नाहीं आणि आपल्या स्वर्गीय पूज्य

पित्याच्या इच्छेस अनुसरून आपण सक्तीचें लष्करी शिक्षण अंमलांत आणीत आहे अशीहि त्यानें घोषणा केली.

जर अफगाणिस्थानांत व्यापार करण्याची परवानगी इंग्लंड व राशिया यांस मिळाली तर त्यांत दोघांचाहि फायदा आहे असें स. १९०२ साली राशियानें इंग्लंडला कळविलें. वर्तमान तहास अनुसरून अफगाणिस्थानशीं स्वतंत्रपणें बोलणें चालणें करण्याचा अधिकार जरी राशियास नव्हता, तरी तो तह रद्द करण्यांत यावा अशी राशियन सरकारची फार इच्छा होती. राशियन वर्तमानपत्रेंहि याविरुद्ध एकसारखीं ओरड करीत असत. अफगाणिस्थानांत राजकीय व व्यापारी बाबतींत इंग्रजांना ज्या सवलती आहेत, त्या सवलती राशियास कां नसाव्या असा त्यांचा सवाल होता. ह्या ओरडीमुळें इंग्रजांस अफगाणिस्थानांत असलेल्या सवलती कदाचित् राशियालाहि मिळाल्या असत्या; पण तुर्कस्थानांत त्याचवेळीं राशियाविरुद्ध प्रचंड चळवळ झाल्यामुळें त्या बेतास खो बसला. तुर्कस्थानांतून चार हजार तुर्क हिरात येथें राहण्यास आले आणि अफगाणिस्थाननें त्यांना आसराहि दिला. दुसऱ्या बाजूनें राशियानें आपली रेल्वे वाढवीत वाढवीत अफगाणिस्थानच्या सरहद्दीस आणून भिडविली. त्यामुळें राशिया अफगाणिस्थानवर हल्ला करील कीं, काय या भीतीनें इंग्रज लोकांनीं फारच धास्ती घेतली. ह्मणून त्या वर्षाच्या अखेरीस राशियानें जर अफगाणिस्थानावर हल्ला केला, तर त्याचें निवारण कोणत्या उपायानें करितां येईल याचा विचार करण्याकरितां एक शिष्टमंडळ हिंदुस्थानसरकारनें काबूल येथें पाठविलें. याशिवाय सरहद्दीवरील लोकांसंबंधींहि कांहीं निर्णय व्हावयाचा होता. त्याचप्रमाणें हिंदुस्थान व अफगाणिस्थान यांमधील व्यापारास शक्य तितक्या आणखीहि सवलती मिळाव्या असें हिंदुस्थानसरकारचें ह्या शिष्टमंडळास सांगणें होतें. मिशनला या सर्व बाबतींत कांहीं अंशीं यश मिळालें. आपल्या बापानें इंग्रजांशीं केलेला तह आपण पूर्णपणें

पाळूं व व्यापारी हितसंबंधाबद्दल इंग्रजसरकार जी आपणास मदत देत आहे तीहि आपण बिनतक्रार घेऊं असें अमीरानें कबूल केलें आणि जर इंग्रजसरकार अफगाणिस्थानास देत असलेल्या मदतीची रकम दुप्पट करील, तर आणखीहि व्यापारी सवलती इंग्रजांस मिळतील असें त्यानें अभिवचन दिलें. आपल्या या अभिवचनाची सत्यता पटवून आपलें मित्रत्व प्रदर्शित करण्याकरितां मुसलमान लोक आजपर्यंत ज्या लोकांना काफर समजत आले होते, ह्मणून यापूर्वीं कोणत्याही अमीरानें ज्यांच्या-बरोबर बसून भोजन केलें नव्हतें, त्या इंग्रज मिशनबरोबर एका टेब-लावर बसून पहिल्या प्रथमच अमीरानें भोजन केलें. त्यावेळीं व्यापारा-संबंधीं बोलणें फारसें झालें नाहीं. कारण जास्त हातपाय पसरल्यास अमीर सावध होऊन कांहींच लभ्यांश होणार नाहीं, ही गोष्ट इंग्रजांना पूर्णपणें ठाऊक होती. अफगाण सैनिकांचें इंग्रज ऑफिसरांच्या मदतीनें संघटण करण्याचें व काबूलपर्यंत हिंदुस्थानांतून आगगाडीचा फांटा नेण्याचें बोलणें इंग्रज मिशननें ओघाओघानें काढून पाहिलें; परंतु अमीरानें " अशुभस्य कालहरणम् " या न्यायानें तें लगेच मान्य केलें नाहीं. रशियाच्या आक्रमणासंबंधीं विचार करण्याकरितां इंग्रजमिशननें केलेलें हिंदुस्थानसरकारचें आमंत्रण मात्र त्यानें स्वीकारलें.

हबिबुल्लाखानाच्या कारकीर्दीच्या आरंभीं इंग्रजांनीं अफगाणिस्थानास पुष्कळ सहाय्य केलें. अफगाणिस्थान व इराण यांमध्यें सरहद्दीसंबंधीचा जो तंटा लागला होता, तो इंग्रजांनीं मध्यस्थी करून मिटविला. ही गोष्ट स. १९०५ मध्यें घडली. त्यानंतर १९०७ मध्यें इंग्लंड आणि रशिया यांच्यामध्यें तह झाला. ह्या तहाचा परिणाम इराण आणि अफ-गाणिस्थान या राष्ट्रांवर फारच झाला. ह्या तहांत अफगाणिस्थानासंबंधीं खालीं दिलेल्या गोष्टी आहेत.

( १ ) अफगाणिस्थानची वर्तमान राजकीय स्थिति जशाची तशी रहावी. रशियाला कोणत्याहि प्रकारें भयाची शंका वाटेल असें कोण-

तेंहि कार्य इंग्रजांनीं अफगाणिस्थानांत करूं नये; इतकेंच नव्हे तर अशा प्रकारची भीति वाटण्याजोगें कार्य करण्यास अफगाणिस्थानलाहि उत्तेजन देऊं नये. अफगाणिस्थानांवर रशियाचा कोणत्याहि प्रकारचा दाब राहाणार नाहीं किंवा रशिया आपला वकीलहि अफगाणिस्थानांत ठेवणार नाहीं. अफगाणिस्थानाबरोबर रशियाचें जितकें राजकीय कार्य असेल तें सर्व त्यानें इंग्लंडमार्फत करावें.

( २ ) काबूल येथें झालेल्या २१ मार्च स. १९०५ च्या तहास अनुसरून अफगाणिस्थानच्या कोणत्याहि भागावर इंग्लंडचा अधिकार असूं नये आणि इंग्लंडनें त्या देशाच्या अंतर्गत कारभारांत कोणत्याहि प्रकारें हात घालूं नये. तसेंच अमीरानेंहि ह्या तहांत कबूल केलेल्या अटींचा भंग करूं नये. अमीरानें जर प्रथम आगळीक केली, तर इंग्रजानें त्या देशावर आक्रमण करण्यास हरकत नाहीं.

( ३ ) सरहद्दीवर जे अफगाण ऑफिसर व रशियन ऑफिसर रहातील ते स्थानिक प्रश्नाचा निर्णय आपापसांत करतील. ह्या प्रश्नाना इंग्रजांनीं राजकीय स्वरूप देतां कामा नये.

( ४ ) अफगाणिस्थानांत रशिया आणि इंग्लंड यांचे समानाधिकार राहतील. जितके हक्क इंग्लंडला आहेत तितकेच हक्क रशियालाहि असावे.

राजकीय दृष्टीनें हा करारनामा इंग्रजांना फारच फायद्याचा होता. कारण ह्या तहामुळें अफगाणिस्थानच्या मार्गानें हिंदुस्थानावर रशियाची स्वारी होण्याची भीति राहिली नाहीं. रशियाचाहि यामुळें बराच फायदा झाला. त्याला व्यापारी व राजकीय दोन्ही प्रकारच्या सवलती मिळाल्या. त्याला अनायासें कोणत्याहि प्रकारच्या झगड्याशिवाय अफगाणिस्थानच्या चिंतेपासून मुक्त होण्यास मिळालें. त्याचप्रमाणें त्याला बुखारा, खिवा वगैरे आपल्या मांडलिक राज्यासंबंधीं कांहींच चिंता राहिली नाहीं. या तहासंबंधीं अमीरानें स्पष्टपणें संमति प्रकट केल्याचें प्रसिद्ध झालें नव्हतें, तरी "मौनं संमत्ति लक्षणम्" या न्यायानें त्याला हा

तह मान्य होता असें दिसतें. अफगाणिस्थान दुसऱ्या राष्ट्राशीं बोलणें चालणें करण्याच्या बाबतींत इंग्रजांच्या आधिन होता, तरी अन्य बाबतींत पूर्णपणें स्वतंत्र होता. रशिया आणि इंग्लंड यांना व्यापारी बाबतींत बरोबर सवलती मिळाल्या होत्या. यामुळें आतां कोणत्याहि प्रकारचा राजकीय असंतोष होण्याची भीति राहिली नव्हती. जर इंग्रज आणि रशियन मिळून इराणसंबंधींहि असाच तह करते, तर पश्चिम आशियांत पुढें आलेल्या अनेक विघ्नांचा निरास झाला असता; परंतु इंग्रजांच्या राक्षसी राज्यतृष्णेनें त्यांना दगा दिल्यामुळें पुढें तेथें इंग्रजांस अनेक कठीण प्रसंग भोगावे लागले.

अमीर हबिबुल्लाखानाच्या राजवटींत आणखी कांहीं महत्वाच्या गोष्टी घडून आल्या नाहींत. त्यानें आपल्या राज्यांत रस्ते बनविले, टेलिफोन सुरू केले आणि रेल्वेही करण्याचा विचार केला होता. त्याची प्रजा अशिक्षित होती, ह्मणून राजवाड्याबाहेर कोठेंहि गडबड ऐकूं आली नाहीं. त्यानें इंग्रजांबरोबर चांगल्या रीतीनें मित्रत्व राखिलें आणि हिंदुस्थानावर आक्रमण करणाऱ्या सरहद्दीवरील जातींचें स्वशक्त्यनुसार दमन केलें. ह्या सर्व बनावांमुळें इंग्रज लोक पुष्कळ चिंतारहित झाले. गत महायुद्धांमध्यें रशिया आणि इंग्लंड एक झाले नसते तर जेव्हां तुर्कस्थाननें जर्मनीच्या वतीनें महायुद्धांत भाग घेतला, तेव्हां अफगाणिस्थानही त्या महायुद्धांत सामील झाला असता व हिंदुस्थानावर घोर प्रसंग येण्याचा संभव होता. सुदैवानें हिंदुस्थानचें रक्षण करण्याकरितां महायुद्धाच्या पहिल्या तीन वर्षांमध्यें रशियानें उत्तर इराणावर चांगला दाब ठेविला होता आणि रशियन झारशाहीचा अंत होण्यापूर्वींच इंग्रज लोकांनीं मेसापोटेमिया व दक्षिण इराण यांमध्यें चांगल्या तऱ्हेनें आपले पाय रोवले होते. यामुळें तुर्कस्थान आपल्या बाजूनें भाग घेतांच अफगाणिस्थानहि आपणांस सहाय्य करील ही जी जर्मनीची आशा ती पूर्ण होऊं शकली नाहीं. स. १९१५ सालीं अफगाणिस्थानला इंग्रजां-

विरुद्ध उठविण्याकरितां जर्मनीनें आपले कांहीं वकील काबूल येथें पाठविले होते; परंतु त्यांनां कांहींच यश आलें नाहीं. जेव्हां रशियामध्यें राज्यक्रांति झाली तेव्हां जर्मनी आणि तुर्कस्थान ह्यांस अफगाणिस्थानांतील गुप्त कटांना उत्तेजन देण्याची संधी मिळाली. प्रस्तुतकालीं रशिय सोव्हियेट १९०७ सालीं इंग्लंडशीं झालेला तह मान्य करण्यास कबूल नाहीं. आशियामधील ब्रिटिश साम्राज्याचा अंत करून त्या जागीं स्वयं-निर्णयात्मक सत्ता स्थापन करण्याचा आमचा उद्देश आहे असें ते स्पष्ट-पणें सांगतात. आणि त्याप्रमाणें आचरण करतात.

ज्या दिवशीं पॅरिसमध्यें तहपरिषद् चालू होती त्याच दिवशीं हबिबुल्लाखानाचा वध करण्यांत आल्याची बातमी पॅरिस येथें पोंचली. कांहीं लोकांचें मत हें कृत्य बोलशेव्हिकांचें आहे असें पडलें. हें कृत्य त्याच्या नातलगापैकींच कोणीतरी राज्यलोभानें केलें आहे असेंहि कांहीं जण ह्मणाले. परंतु मागाहून समजून आलें कीं, अफगाणिस्थानांतील इंग्रजांचें प्रभुत्व पूर्णपणें नाहींसें करण्याकरितां एका क्रांतिकारक देश-भक्तानें हा वध केला. हबिबुल्लाखानामागून गादीवर बसलेल्या अमीर अमानुल्लाखानानें ताबडतोब पूर्ण स्वातंत्र्य जाहीर केलें आणि लगेच हिंदुस्थानच्या सरहद्दीवर स्वारी केली. इंग्रज लोकांनीं काबूलवर विमानां-तून बॉंब वगैरे टाकून अफगाण लोकांस भीति घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण कडव्या अफगाणापुढें इंग्रजांची कांहींच मात्रा चालली नाहीं. शेवटीं अफगाणिस्थानचें पूर्ण स्वातंत्र्य त्यास कबूल करावें लागलें. अमीर अमानुल्लाखान इंग्रजांचा अत्यंत द्वेष्टा होता. इंग्रजांनीं कोणत्या कारवाई करून आशियांत आपलें बस्तान बसविलें त्याचा इतिहास त्याला पूर्ण अवगत होता. आपणांस मिळणाऱ्या खंडणीची आशा सोडूनहि त्यानें आपल्या राष्ट्रांत असलेले इंग्रजांचे सर्व हक्क काढून घेतले.

## अफगाणिस्थान.

अफगाणिस्थान पूर्ण स्वतंत्र होतांच अमानुल्लाखानानें स्वदेशाच्या सर्वांगीण सुधारणा करण्यास आरंभ केला. अमानुल्लाखान स्वतः चांगला विद्वान होता. पॅरिस येथील विश्वविद्यालयांत त्याचें शिक्षण झालें होतें. त्याचप्रमाणें फ्रेंच लष्करी अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं त्यानें उत्तम लष्करी शिक्षण संपादन केलें होतें. अफगाणिस्थानास पूर्णस्वातंत्र्य प्राप्त करून दिल्यानंतर त्यानें त्या देशाची अंतर्गत सुधारणा करण्यास आरंभ केला व शास्त्रीयशिक्षण संपादन करण्याकरितां पुष्कळ अफगाण विद्यार्थी परदेशीं पाठविले. अफगाण स्त्रियांचीहि सुधारणा करण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न केला. स्त्रियांत शिक्षणाचा प्रसार करणें सुलभ होण्याकरितां उपयुक्त शिक्षण घेण्यासाठीं कांहीं विद्यार्थीनीं परदेशांतहि रवाना केल्या. प्रत्यक्ष राणी सुरिया हिनें गोषाचा त्याग केला व पती-बरोबर ती युरोपखंडाच्या प्रवासास निघाली. त्यावेळीं युरोपांत अमानुल्ला-खानाचा अभूतपूर्व सन्मान झाला.

परंतु अमानुल्लाखानानें अफगाणिस्थानांत अंमलांत आणलेल्या या सुधारणा पुराणमतवादी अफगाण बहुजनसमाजास आवडल्या नाहींत. ह्या सुधारणा इस्लामधर्माविरुद्ध आहेत ह्मणून अफगाणिस्थानांतील मुल्ला-मौलवींनीं अमीराविरुद्ध बंड उभारलें. ह्या बंडाचें प्रमुखत्व बच्चा-ई-साकू ह्या नांवाच्या एका भिस्त्याकडे होतें. ह्या बंडांत बंडखोरांस यश मिळालें व अमीरास देशत्याग करून इटलींत वास करावा लागला. बच्चा-ई-साकूनें अफगाणिस्थानचा अमीर ह्मणून आपणांस राज्याभिषेक करून घेतला; परंतु त्याचें राज्य केवळ औट घटकाच टिकलें. नादीरशहा नांवाचा एक अफगाण राजवंशांतील सेनापति पॅरिसमध्यें राहत होता. इंग्रजांच्या मदतीनें त्यानें अफगाणिस्थानांत आपला प्रवेश करून घेतला व वरपांगीं अफगाणिस्थानचा खरा अमीर अमानुल्लाखान ह्याच्या वतीनें तो लढूं लागला. बच्चा-ई-साकू व नादीरशहा ह्यांच्या अमीरपदाकरितां

पुष्कळ झटापटी झाल्या; परंतु शेवटीं बच्चा-ई-साकू मारला गेला व सर्व सत्ता नादीरशहाच्या हातीं आली. सत्ता हातीं येतांच अमानुल्लाची अफगाणिस्थानच्या सिंहासनावर स्थापना करण्याऐवजीं ती गादी त्यानें स्वतःच बळकावली. अफगाणिस्थानांत ही सर्व राज्यक्रांति करून अस्वस्थता माजविण्यांत इंग्रज साम्राज्यवाद्यांचें बरेंच अंग आहे असें ह्मणतात. अमानुल्लाखान हा इंग्रजांची साम्राज्यतृष्णा पूर्णपणें ओळखून असल्यानें धूर्त इंग्रजांच्या डोळ्यांत तो कांट्याप्रमाणें सलत होता. सांप्रत जरी नादीरशहा हा अफगाणिस्थानच्या गादीवर विराजमान असला तरी त्याविरुद्ध वारंवार वावटळी उठत आहेत; त्यामुळें अफगाणिस्थानांत कोणत्यावेळीं राज्यक्रांति होईल याचा नेम नाहीं.

---

## तुर्कांची भवितव्यता.

इटली आणि बालकन राष्ट्रं ह्यांच्या बरोबर तुर्कांचें जें युद्ध झालें होतें, त्याचे परिणाम तुर्कांवर व त्यांच्या शत्रूंवर इष्ट किंवा अनिष्ट होण्यापूर्वींच १९१४ मध्यें गत युरोपियन महायुद्धास सुरवात झाली. युरोपांतील तुर्कस्थानचा फार मोठा भाग आणि इजियन समुद्राचा टापू बालकन युद्धांत तुर्कांच्या सत्तेखालून निसटला होता; पण सीमा आणि कर्ज यासंबंधीं बालकन राष्ट्रांशीं व इटालीशीं त्याच्या पुष्कळ कटकटी चालल्या होत्या. त्यांचें निराकरण होण्यास बऱ्याच कालावधीची आवश्यकता होती. इकडे तुर्कांच्या कांहीं प्रांतांवर अधिकार मिळविण्या-विषयीं इटली आणि ग्रीस ह्यांचा लढा पडला होता. त्याचप्रमाणें ग्रीस देशाशीं तुर्कांचें युद्ध चालू होतें. युरोपांतील तुर्कस्थानांतून पळून आलेले पुष्कळ मुसलमान कांहीं कांहीं ठिकाणीं तुर्कांच्या सत्तेखालीं नांदणाऱ्या

स. २ नं. ११
ता. ........

ग्रीक लोकांना हांकलून देऊन त्यांच्या जमीनी कब्जांत घेतल्या होत्या. ग्रीक लोकांबरोबर मागें झालेल्या आरमारी युद्धांत आपल्या समुद्रावरील दुर्बलतेचा अनुभव तुर्कांस पूर्णपणें आल्यानें त्यांनीं एका इंग्रजी कंपनीला दोन मोठीं क्रूझरें बांधण्याचा मक्ता दिला. ह्या क्रूझरांकरितां घरोघर फिरून त्यांनीं पैसे एकत्र केले. तुर्कस्थानांत चाललेली ही आरमाराची वाढ पाहून ग्रीक राष्ट्रानें अमेरिकेपासून दोन लढाऊ जहाजें तावडतोब विकत घेतलीं. ग्रीस व तुर्कस्थान ह्यांमधील हें वैर दूर करण्याकरितां उभय राष्ट्रांचे प्रधान बेल्जम देशाची राजधानी ब्रुसेल्स येथें जमून बोलणें चालणें करावें व युद्धाच्या सर्व कारणांचें निराकरण करावें असें युरोपांतील कांहीं राष्ट्रांच्या मध्यस्थीनें ठरलें होतें. ही मध्यस्थी मान्य करून ग्रीसचा मुख्य प्रधान व्हेनिझेलास हा ज्या वेळीं बेल्जममध्यें येऊन राहिला, त्याच सुमारास साराजेव्हो येथें आस्ट्रियन युवराजाचा खून झाल्यामुळें आमच्या ह्या अटी मान्य कराव्या किंवा युद्धास तयार व्हावें असें त्यानें सर्व्हियास लिहून कळविलें. या बनावामुळें तुर्कस्थानच्या मुख्य प्रधानाला आतां खास युद्ध होणार असें वाटलें असेल किंवा त्या वाटाघाटींत कांहींच निष्पन्न होणें शक्य नाहीं असें वाटलें असेल; पण तो तहाच्या वाटाघाटीकरितां ब्रुसेल्स येथें येण्यास कॉन्स्टंटिनोपल येथून निघाला नाहीं; इतकें खरें.

इंग्लंडनें जर्मनीशीं युद्ध जाहीर करण्यापूर्वी ग्रेटब्रिटनसरकारतर्फे तुमचीं जीं दोन क्रूझरें आमच्या देशांत तयार करण्यांत येत आहेत, तीं आम्हीं घेऊं व तुमचे जे अगाऊ पैसे घेतले आहेत, ते तुम्हाला परत देऊं आणि जर तुम्हीं जर्मनीस सामील न होतां युद्धांत तटस्थ रहाल तर इजिप्तसंबंधीं आमच्यामध्यें झालेल्या करारांत फरक होणार नाहीं, अशी इंग्लंडनें खलीता पाठवून तुर्कस्थानला सूचना दिली; परंतु तुर्कस्थानचीं दोनाहि क्रूझरें अडवून इंग्लंडनें फार मोठी चूक केली. कारण तुर्कांना समुद्रावर ग्रीसची फार मोठी भीति वाटत असे आणि

संपूर्ण तुर्कस्थानांतील लोकांचे डोळे त्या क्रूझरांवर लागून राहिले होते. तुर्कांनी त्या क्रूझरांकरितां गरिबांच्या झोंपडीपर्यंत फिरून द्रव्य एकत्र केलें होतें. जर्मनीला ही एक चांगली संधी मिळाली. त्याचीं गोबेन आणि ब्रेस्ला ह्या नांवाचीं दोन जहाजें भूमध्यसागराचा वेढा फोडून डार्दानेलीसच्या सामुद्रधुनींत पोंहोंचलीं. त्याबरोबर आह्मीं हीं दोन्हीं क्रूझरें खरेदी केलीं आहेत असें तुर्कांनीं दुसऱ्याच दिवशीं जाहीर केलें. दोस्त राष्ट्रांनीं ह्या कृत्याला विरोध केला. तुर्कस्थाननें इटली किंवा ग्रीस ह्या राष्ट्रांस भिण्याचें कांहींच कारण नाहीं, जर तुर्कस्थान पूर्णपणें तटस्थ राहील तर या वर्तमान महायुद्धांत उभय राष्ट्रांकडून तुर्कस्थानवर आक्रमण होणार नाहीं, याची हमी आह्मीं घेतों; असें दोस्तांनीं त्यास अभिवचन दिलें; परंतु तुर्कांनीं यावर जो जबाब दिला, त्यामुळें दोस्त राष्ट्रें चकीत झालीं. पुढील अटी मान्य कराल तर आपण वर्तमान महायुद्धांत तटस्थ राहूं असें तुर्कस्थाननें खडखडीतपणें दोस्त राष्ट्रांस कळविलें. ( १ ) दोस्त राष्ट्रांतील लोकांस तुर्की साम्राज्यांत जे विशिष्ट हक्क आहेत ते त्यांनीं सोडून द्यावे. ( २ ) आमचीं दोनही क्रूझरें इंग्लंडनें परत द्यावीं. ( ३ ) आमच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप करण्याचा कोणालाहि अधिकार नसावा. ( ४ ) बल्गेरिया जर महायुद्धांत जर्मनीच्या तर्फे सामील झाला, तर आह्मांला थ्रेस प्रांत परत मिळावा. ( ५ ) आणि इंजियन समुद्रावर व बेटांवर असलेला ग्रीस व इटली यांचा ताबा काढून तो प्रांत आमच्या ताब्यांत द्यावा. त्यावेळीं कोणत्याहि प्रकारें तुर्कस्थानास संतुष्ट राखणें दोस्तांना आवश्यक होतें; पण तुर्कस्थानच्या ह्या अशक्यप्राय: अटी त्यांना मान्य करतां आल्या नाहींत. जर जर्मनीचीं दोन्हीं जहाजें व त्यांचेवरील खलाशी आमच्या स्वाधिन करीत असाल आणि बास्फोरस व दार्दानेलिस या सामुद्रधुन्यांत येण्याजाण्याची आमच्या व्यापारी जहाजांना सवलत देत असाल तर तुमचीं जहाजें आह्मीं परत करूं असें यावर दोस्तांनीं उलट तुर्कस्थानास

कळविलें. तुर्कस्थान तटस्थ राहील तर तुर्की राज्य कायम राखिलें जाईल असेंहि त्या खलीत्यांत लिहिलें होतें. हें मानभावी व तुच्छतेचें उत्तर कोणत्याहि स्वाभिमानी राष्ट्रास पसंत पडणें शक्यच नव्हतें. त्यानें दोस्त राष्ट्रांच्या या खलित्यास केराची टोपली दाखविली आणि १ अक्टोबर रोजीं दोस्त राष्ट्रांतील लोकांचे तुर्कस्थानांत असलेले विशिष्ट हक्क काढून घेतल्याचें जाहीर केलें. यामधील काळांत पुष्कळ जर्मन सैनिक व अधिकारी तुर्कस्थानांत पोहोंचले. त्यांनीं खटपट करून तेथील राज्यकारभारांत जर्मन पक्षपाती पक्षाचें प्राबल्य घडवून आणलें. यानंतर ता. २१ ऑक्टोबर रोजीं एक इंग्रज वकील स्वतः जॉर्ज बादशहांचा खलिता घेऊन तुर्कस्थानच्या सुलतानाकडे आला. इंग्लंडनें तुर्कस्थानचीं जहाजें अडकविल्याबद्दल आह्मांला फार दुःख होत आहे; परंतु त्याचें निरसन आह्मीं मागाहून करूं; पण गेल्या शंभर वर्षांपासून तुर्कस्थानचा जो स्नेह आहे तो आपण तोडूं नये. असें साळसूदपणानें त्यांत लिहिलें होतें; परंतु त्या नक्राश्रूंचें कांहींच चीज झालें नाहीं. ता. २९ ऑक्टोबर रोजीं कांहीं तुर्कांनीं रशियन तटावर गोळीबार केल्यामुळें तुह्मीं तुर्कस्थान सोडून परत यावें अशी रशियन वकीलास तेथील सरकारकडून आज्ञा मिळाली. पुष्कळ प्रयत्न केल्यावर शेवटीं लाचार होऊन इंग्रज व फ्रेंच वकीलास तेथून आपलें प्रस्थान हलवावें लागलें. यानंतर रशियानें काळया समुद्रांत प्रथम आगळीक करून तुर्की आरमारावर गोळीबार केल्यानें तुर्कस्थानास जर्मनीच्या वतीनें महायुद्धांत सामील व्हावें लागलें.

तुर्कस्थान महायुद्धांत सामील झाल्यानें युरोपियन महायुद्धाला जगद्व्यापी स्वरूप आलें. उभय पक्षांना लढण्यास आतां विस्तृत प्रदेश मिळाला. त्याचबरोबर दुसरे कांहीं देशहि युद्धांत सामील झाले. तुर्कस्थानांत लष्करी शिक्षण देत असल्यानें तेथें वजन असलेल्या कांहीं जर्मन लष्करी अधिकाऱ्यांनीं जर्मनीला महायुद्धांत ओढलें असें ह्मणणें

ही मोठी चूक आहे. त्यावेळीं इंग्रज व फ्रेंच लष्करी अधिकारीहि तेथें कमी नव्हते. तेहि मोठमोठ्या हुद्द्यावर होते. प्रयत्न केला असता तर त्यांनाहि आपला प्रभाव तुर्कांवर पाडतां आला असता कारण पूर्वी जर्मनीपेक्षांहि त्यांना तेथें जास्त सन्मान होता पण दोस्तांच्या कारवायां-मुळेंच तुर्क लोक त्यांच्यावर असंतुष्ट झाले. जेव्हां तरुण तुर्कांनीं राज्य-क्रांति करून नवीन राज्यपद्धति स्थापन केली तेव्हां इंग्रज व फ्रेंच लोकांनीं त्यांना फारच थोडी सहानुभूति दाखविली होती. कारण तुर्क-स्थानामध्यें प्रजासत्ताक व नियमबद्ध राज्यपद्धति स्थापन होणें त्यांना इष्ट नव्हतें. आपल्या अंकित असलेली मुसलमान प्रजाहि तुर्कस्थानचें अनुकरण करून स्वातंत्र्य मिळविण्यास तयार होईल ही त्यांनां फार भीति वाटे. तुर्क जर्मनीच्या वतीनें महायुद्धांत सामील झाले त्याला आण-खीहि एक कारण आहे. तें असें कीं, दोस्त राष्ट्रांत राशियाहि सामील होता. राशिया जर या युद्धांत विजयी झाला तर आपली मुळींच धडगत नाहीं हें तुर्क लोक पूर्णपणें जाणून होते. शेंकडों वर्षांपासून राशिया हा तुर्कस्थानास नामशेष करण्याच्या उद्योगांत होता. जेव्हां विसाव्या शत-काच्या आरंभीं राशिया व इंग्लंड यांच्या मैत्रीचा तह झाला, तेव्हांपासून तुर्क लोक इंग्रजांना आपले शत्रु समजूं लागले. याशिवाय १९०४ मध्यें हाजिप्त तुर्कस्थानच्या ताब्यांतून निसटून इंग्लंडच्या हातांत यावा असा व्यूह रचला होता. त्याचप्रमाणें जर इटलीनें कधींकाळीं तुर्कांचा कांहीं मुलख हस्तगत केला, तर फ्रान्सनें त्याच्या आड येऊं नये असा फ्रान्स व इटली यांचा एक गुप्त तह झाला होता. या गुप्त तहाचा थोडाबहुत पत्ता तुर्कांस लागल्याशिवाय राहिला नाहीं. या आणि अन्य कांहीं कार-णामुळें दोस्त राष्ट्रांपेक्षां जर्मनीच्या वतीनें युद्धांत सामील झाल्यास आह्मांला जास्त फायदा होईल असें तुर्क पूर्णपणें जाणून होते. ज्याप्रमाणें एकोणिसाव्या शतकांत आपल्या साम्राज्याच्या संरक्षणाकरितां इंग्रज सरकार आमच्या मदतीस धांवून येत असे, त्याचप्रमाणें विसाव्या

शतकांत जर्मनीला आमचें रक्षण करावें लागेल हें तुर्कांना पूर्णपणें माहीत होतें. इजिप्तवर आपला पूर्ण अधिकार व्हावा आणि दक्षिण आशियामध्यें आपला पाय पूर्णपणें रोवला जावा ह्मणून इंग्लंड तुर्कस्थानला रशियाच्या पंजांतून सोडविण्यास वेळोवेळीं तयार होत असे. तुर्कस्थान केवळ आत्मरक्षणाकरितां या महायुद्धांत जर्मनीच्या वतीनें सामील झाला होता, हें वरील विवेचनावरून स्पष्टपणें कळून येईलच. तुर्कांचा रशियापाशीं शेंकडो वर्षांपासून लढा चालत होता. त्याचा अंतिमनिर्णय करण्याकरितां तुर्कस्थान महायुद्धांत सामील झाला होता. जर्मनी रशियाचा शत्रु असल्यामुळेंच त्याला जर्मनीचा पक्ष ग्रहण करणें भाग पडलें.

ज्यावेळीं तुर्कस्थानांत राष्ट्रीयत्वाचा भाव वाढत चालला होता, आणि तेथें प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याचा विचार चालू होता, तेव्हां अन्य युरोपियन राष्ट्रांच्या वकीलांस कांहींच अनुमान झालें नाहीं; परंतु जें युद्ध होईल, त्यांत तुर्कस्थान कधींहि तटस्थ राहूं शकणार नाहीं, असें जर्मन वकीलानें पूर्णपणें ताडलें आणि जेव्हां तरुण तुर्कांचा जोर वाढला, तेव्हां जर्मन लोक त्यांना उत्साहित करूं लागले. कारण रशियाचें आणि जर्मनीचें भावीकालांत जेव्हां युद्ध सुरू होईल, तेव्हां तुर्कस्थानच्या सहाय्याशिवाय रशियाचा जगाशीं असलेला संबंध तोडतां येणें शक्य नाहीं, हें जर्मनी पूर्णपणें जाणत होता. रशियावर पुढें मागें सुलभपणें विजय संपादन करण्यास इराण आणि कॉकेशस प्रांत यांत त्यास शह देणें आवश्यक होतें. ही आपली भावी योजना सिद्धीस नेण्याकरितां तुर्कस्थानांत असलेल्या त्या वेळच्या जर्मन वकीलानें तरुण तुर्कांच्या तीन प्रमुख पुढाऱ्यांशीं मित्रत्व संपादन केलें. शौकतपाशा, अनवर बे आणि तलात बे हे ते तीन पुढारी होत. शौकतपाशा हा तुर्कस्थानचा सेनापति होता. अनवर बे हा तरुण तुर्कांचा मुख्य पुढारी असून तुर्की जनतेवर त्याचें बिलक्षण वजन होतें. तिसरा तलात बे हा

मंत्रिमंडळांतील एक मंत्री असून तुर्कस्थानांतील जमीनदार वर्गाचा पुढारी समजण्यांत येत असे. जेव्हां ट्रिपोलीवर इटलीनें अन्यायानें आक्रमण केलें, तेव्हां ट्रिपोलीच्या बाबतींत फ्रान्स व इटली यांचें पूर्वीच संगनमत ठरलेलं आहे, ह्याविषयीं त्यावेळच्या जर्मन वकीलानें ह्या तिघांचीहि सप्रमाण खात्री करून दिली. आणि जर जर्मन ऑफिसरांकडून तुर्की लष्कराची पुनर्घटना केली तर तुर्की लष्कर सबल होऊन परकीय आक्रमणापासून तुर्कस्थानचें संरक्षण करण्यास पूर्णपणें समर्थ होईल हीहि गोष्ट त्यांच्या मनावर बिंबविली.

जेव्हां सर्व बालकन राष्ट्रें मिळून तुर्कांशीं लढूं लागलीं, तेव्हां तुर्कांचा पराजय होण्यास एक महिनाहि लागला नाहीं. एका महिन्यांतच युद्ध बंद झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. परंतु तुर्क लोक विजयी राष्ट्रांच्या मागणीप्रमाणें आड्रिआनोपल सोडण्यास तयार झाले नाहींत; ह्मणून युद्ध पुन्हां सुरू झालें. जुना वजीर पदच्युत करण्यांत आला आणि त्याजागीं शौकतपाशाची नेमणूक झाली. अनवरपाशा अजूनपर्यंत ट्रिपोलींतच होता. यामुळें त्याला ही दुर्दशा प्रत्यक्ष दिसली नाहीं; परंतु कोणत्याहि उपायानें तुर्कांना विजय मिळाला नाहीं. आणि युरोपांतील बहुतेक भूमि व इंजियन समुद्रांतील बेटें याचा त्याग करून त्यास मोकळें व्हावें लागलें. जून १९१३ मध्यें शौकतपाशाचा वध झाला. इजिप्तच्या खेदीव वंशांतील सय्यद हलीम यास वजीरपद मिळालें, अनवरबेला युद्धमंत्रि बनविण्यांत आलें आणि तलात बेची नेमणूक परराष्ट्र मंत्र्याच्या जागीं करण्यांत आली. एक वर्षानंतर जेव्हां तुर्कस्थान महायुद्धांत सामील झाला. तेव्हांहि हेच पुढारी अधिकारपदावर होते, आणि युद्धकालींहि तुर्कस्थानचीं सूत्रें ह्याच पुढाऱ्यांच्या हातांत राहिलीं.

जर्मन वकील व्हान बेबरस्टीन यानें जें जें बीज पेरलें होतें, त्यांचा वृक्ष होऊन फलें मिळण्यास आतां सुरुवात झाली. ह्यांच्या पूर्वीपासून जर्मन लोकांनीं तुर्कस्थानच्या लष्करी खात्यांत श्रेष्ठ स्थानीं आपला

शिरकाव करून घेतला होता. तुर्की लष्कर आणि आरमार यांचीं सर्व सूत्रें जर्मनीच्या तंत्रानें हालत असून त्यावरील मुख्य अधिकारी जर्मन आहे असें पाहून रशियानें त्या गोष्टीला कसून विरोध केला. परंतु जर्मन जनरल व्हान संडर्सन यानें कोणाचीहि पर्वा न करितां आपलें काम जारीनें सुरू ठेविलें आणि तुर्की लष्कर युद्धाकरितां उत्तम रीतीनें तयार केलें. ह्यामुळें ऐनवेळीं जर्मनीला तुर्कस्थानापासून चांगलें सहाय्य मिळालें. तुर्कस्थानाजवळ दहा लाख सैनिक पूर्वींच तयार होते. महायुद्धांत भाग घेतल्यानंतर त्यांत आणखी पांच लाख सैनिकांची भर पडली. जर जर्मनीकडून त्याला ऑफिसराचें सहाय्य मिळालें नसतें, तर युद्धांत त्याला कांहींच कामगिरी करतां आली नसती. पण जर्मनीच्या मदतीनें तो चांगल्या रीतीनें तयार झाला. जर बालकन युद्धांत त्याचें पुष्कळ सैन्य गारद झालें नसतें, तुर्कस्थानांत त्यावेळीं सांथीच्या रोगाचा प्रसार झाला नसता आणि पुष्कळसा प्रदेश त्याच्या हातांतून गेला नसता, तर महायुद्धांत त्यानें यापेक्षां जास्त कामगिरी केली असती.

तुर्कांनीं यावेळीं फारच मोठी जोखीम आपल्या शिरावर घेतली होती. त्याला विजय मिळण्यास दोनच मार्ग होते. पहिला इजिप्तला उत्तेजित करून आपल्या पक्षांत मिळविणें आणि दुसरा कॉकेशस प्रांतांतून राशियाला पिटाळून लावून मध्यआशियांतील तार्तार लोकांस आपल्या बाजूस वळविणें हीं दोन्हीं स्थानें तुर्की साम्राज्याच्या दोनटोंकांस आहेत. तुर्कांनीं ताबडतोब त्या देशावर आक्रमण केलें असतें, तर त्यांना विजय मिळण्याचा संभव होता. मेसापोटेमियांत आपणाला शत्रुवर आक्रमण करतां येणार नाहीं; तेथें फक्त आत्मरक्षण करावें लागेल हेंहि तुर्क लोक पूर्णपणें जाणून होते. आशियामायनरांतील इंजियन समुद्राच्या किनाऱ्यावर कांहीं फौज ठेवणें आवश्यक होतें. कारण ग्रीकांवर विश्वास ठेवणें शक्य नव्हतें. याशिवाय बलगेरिया व ग्रीस यांपासून कॉन्स्टंटिनोपलचें संरक्षण करणें आवश्यक होतें. कारण हीं दोन्हीं राष्ट्रें तुर्कांचें परम शत्रुत्व करीत

मंत्रिमंडळांतील एक मंत्री असून तुर्कस्थानांतील जमीनदार वर्गाचा पुढारी समजण्यांत येत असे. जेव्हां ट्रिपोलीवर इटलीनें अन्यायानें आक्रमण केलें, तेव्हां ट्रिपोलीच्या बाबतींत फ्रान्स व इटली यांचें पूर्वींच संगनमत ठरलेलं आहे, ह्याविषयीं त्यावेळच्या जर्मन वकीलानें ह्या तिघांचीहि सप्रमाण खात्री करून दिली. आणि जर जर्मन ऑफिसरांकडून तुर्की लष्कराची पुनर्घटना केली तर तुर्की लष्कर सबल होऊन परकीय आक्रमणापासून तुर्कस्थानचें संरक्षण करण्यास पूर्णपणें समर्थ होईल हीहि गोष्ट त्यांच्या मनावर बिंबविली.

जेव्हां सर्व बालकन राष्ट्रें मिळून तुर्कांशीं लढूं लागलीं, तेव्हां तुर्कांचा पराजय होण्यास एक महिनाहि लागला नाहीं. एका महिन्यांतच युद्ध बंद झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. परंतु तुर्क लोक विजयी राष्ट्रांच्या मागणीप्रमाणें आड्रिआनोपल सोडण्यास तयार झाले नाहींत; ह्मणून युद्ध पुन्हां सुरू झालें. जुना वजीर पदच्युत करण्यांत आला आणि त्याजागीं शौकतपाशाची नेमणूक झाली. अनवरपाशा अजूनपर्यंत ट्रिपोलींतच होता. यामुळें त्याला ही दुर्दशा प्रत्यक्ष दिसली नाहीं; परंतु कोणत्याहि उपायानें तुर्कांना विजय मिळाला नाहीं. आणि युरोपांतील बहुतेक भूमि व इंजियन समुद्रांतील बेटें याचा त्याग करून त्यास मोकळें व्हावें लागलें. जून १९१३ मध्यें शौकतपाशाचा वध झाला. इजिप्तच्या खेदीव वंशांतील सय्यद हलीम यास वजीरपद मिळालें, अनवरबेला युद्धमंत्रि बनविण्यांत आलें आणि तलात बेची नेमणूक परराष्ट्र मंत्र्याच्या जागीं करण्यांत आली. एक वर्षानंतर जेव्हां तुर्कस्थान महायुद्धांत सामील झाला. तेव्हांहि हेच पुढारी अधिकारपदावर होते, आणि युद्धकालींहि तुर्कस्थानचीं सूत्रें ह्याच पुढाऱ्यांच्या हातांत राहिलीं.

जर्मन वकील व्हान बेबरस्टीन यानें जें जें बीज पेरलें होतें, त्यांचा वृक्ष होऊन फळें मिळण्यास आतां सुरुवात झाली. ह्यांच्या पूर्वीपासून जर्मन लोकांनीं तुर्कस्थानच्या लष्करी खात्यांत श्रेष्ठ स्थानीं आपला

शिरकाव करून घेतला होता. तुर्की लष्कर आणि आरमार यांचीं सर्व सूत्रें जर्मनीच्या तंत्रानें हालत असून त्यावरील मुख्य ऑफिसर जर्मन आहे असें पाहून रशियानें त्या गोष्टीला कसून विरोध केला. परंतु जर्मन जनरल व्हान संडर्सन यानें कोणाचीहि पर्वा न करितां आपलें काम जारीनें सुरू ठेविलें आणि तुर्की लष्कर युद्धाकरितां उत्तम रीतीनें तयार केलें. ह्यामुळें ऐनवेळीं जर्मनीला तुर्कस्थानापासून चांगलें सहाय्य मिळालें. तुर्कस्थानाजवळ दहा लाख सैनिक पूर्वींच तयार होते. महायुद्धांत भाग घेतल्यानंतर त्यांत आणखी पांच लाख सैनिकांची भर पडली. जर जर्मनीकडून त्याला ऑफिसरांचें सहाय्य मिळालें नसतें, तर युद्धांत त्याला कांहींच कामगिरी करतां आली नसती. पण जर्मनीच्या मदतीनें तो चांगल्या रीतीनें तयार झाला. जर बालकन युद्धांत त्याचें पुष्कळ सैन्य गारद झालें नसतें, तुर्कस्थानांत त्यावेळीं सांथीच्या रोगाचा प्रसार झाला नसता आणि पुष्कळसा प्रदेश त्याच्या हातांतून गेला नसता, तर महायुद्धांत त्यानें यापेक्षां जास्त कामगिरी केली असती.

तुर्कांनीं यावेळीं फारच मोठी जोखीम आपल्या शिरावर घेतली होती. त्याला विजय मिळण्यास दोनच मार्ग होते. पहिला इजिप्तला उत्तेजित करून आपल्या पक्षांत मिळाविणें आणि दुसरा कॉकेशस प्रांतांतून रशियाला पिटाळून लावून मध्यआशियांतील तार्तार लोकांस आपल्या बाजूस वळविणें हीं दोन्हीं स्थानें तुर्की साम्राज्याच्या दोनटोंकांस आहेत. तुर्कांनीं ताबडतोब त्या देशावर आक्रमण केलें असतें, तर त्यांना विजय मिळण्याचा संभव होता. मेसापोटेमियांत आपणाला शत्रुवर आक्रमण करतां येणार नाहीं; तेथें फक्त आत्मरक्षण करावें लागेल हेंहि तुर्क लोक पूर्णपणें जाणून होते. आशियामायनरांतील इंजियन समुद्राच्या किनाऱ्यावर कांहीं फौज ठेवणें आवश्यक होतें. कारण ग्रीकांवर विश्वास ठेवणें शक्य नव्हतें. याशिवाय बल्गेरिया व ग्रीस यांपासून कॉन्स्टंटिनोपलचें संरक्षण करणें आवश्यक होतें. कारण हीं दोन्हीं राष्ट्रें तुर्कांचें परम शत्रुत्व करीत

असत. तुर्कांना युरोपांतून कसें हांकलून देतां येईल याच विवंचनेंत तीं होतीं; परंतु केवळ तुर्कांचें शत्रुत्व साधण्याकरितां बालकन राष्ट्रें या युद्धांत भाग घेणार नाहींत ही गोष्ट निश्चित होती, जर कांणतेंहि अन्य कारण उपस्थित झालें, तरच तीं महायुद्धांत पडण्याचा संभव होता.

युद्धाच्या पहिल्या वर्षीं दोस्त राष्ट्रांनीं दार्दानेलिस आणि कॉन्स्टांटिनोपल यांच्यावर हल्ला करण्यांत आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें होतें. यामुळें जर्मनी आणि तुर्क यांना कॉकेशस प्रांत आणि इजिप्त यांवर आक्रमण करतां आलें नाहीं. जेव्हां गॅलिपोलीमध्यें इंग्रजांचा पूर्ण पराभव झाला, तेव्हां तुर्कांनीं सुवेझ कॅनाल ओलांडून इजिप्तवर आक्रमण करण्याचा दोनदां प्रयत्न केला, परंतु त्यांजपाशीं पुष्कळ सैन्य आणि इतर युद्धोपयोगी सामान नसल्यामुळें त्यांना पराजय पावून परत जावें लागलें. १९१६ च्या ग्रीष्मऋतूंमध्यें तर दोस्त राष्ट्रांनीं उलट तुर्कांवर आक्रमण करून मेसापोटेमिया आणि सुवेझ कॅनाल या भागांत त्याचा पराजय केला. जेव्हां इंग्रजांनीं सुवेझ प्रांतांतील रेलवे व समुद्रकिनारा यांची उत्तम व्यवस्था ठेवली, तेव्हां त्यांनीं केलेल्या जरुसलेम व सिरिया यांवरील हल्ल्याचा रोध तुर्कांना करतां आला नाहीं. युद्धाच्या आरंभींच मेसापोटेमियावर आक्रमण करून बसल्यावर इंग्रजांनीं आपली सत्ता स्थापन केली होती. इंग्रज लोक उमेदीनें पुढें पुढें जात असत. उत्साहातिरेकांत मागचा रस्ता साफ आहे कीं नाहीं हें पाहण्याचें भान त्यांना न राहिल्यामुळें मध्यंतरीं कुत–अल–अमारा येथें इंग्रजांना मोठा पराजय सोसावा लागला. तुर्कांना भिवविण्याकरितां इंग्रजांनीं मेसापोटेमिया काबीज केला नव्हता, तर अरब लोकांनीं आपणांस कांहीं उपद्रव देऊं नये साधल्यास सहाय्य करावें असा त्यांत त्यांचा मुख्य हेतु होता. जेव्हां इंग्रजांनीं हेज्जाज प्रांत स्वतंत्र केला आणि मक्केच्या शेरीफाशीं सख्य केलें, तेव्हां जणूं काय तुर्कांचें अरबांवरील स्वामीत्व त्यांनीं लयास नेलें.

मेसापोटेमिया आणि अरबस्थान यांवर इंग्रजांनीं केवळ राजकीय कारणाकरितां सत्ता स्थापन केली होती. आर्थिक कारणाकरितां नव्हती. जेव्हां तुर्कस्थान आपल्या वतीनें महायुद्धांत सामील होईल तेव्हां जगांतील सर्व मुसलमान राष्ट्रें आपणास मिळतील अशी जर्मनीला फार आशा होती. जिहाद् जाहीर करण्याचीहि सल्ला त्यांनीं तुर्कस्थानच्या सुलतानास ह्मणजे संपूर्ण मुसलमानांच्या खलिफास दिली होती. उलट आशिया आणि आफ्रिका येथील मुसलमानांनीं कोणत्याहि प्रकारें तुर्कांस मदत करूं नये अशी दोस्तांची आत्यंतिक इच्छा होती आणि जेव्हां तुर्क लोक शत्रूच्या मुलखावर धडाडीनें आक्रमण न करितां केवळ आत्मरक्षण करीत राहिले तेव्हां जगांतील सर्व मुसलमान एकत्र होण्याचा संभव सुद्धां राहिला नाहीं. जरी युद्धाच्या आरंभींच्या दोन वर्षांत दोस्त राष्ट्रांना पश्चिम आशियांत फारसें यश आलें नाहीं तरी याच एका गोष्टीवर समाधान मानून त्यांनीं फारशीं चिंता केली नाहीं.

तिकडे आपल्या साम्राज्याच्या उत्तरेस काळया समुद्रावर सत्ता न मिळाल्यामुळें तुर्क लोक फारच लाचार होते. पश्चिम आशियामायनर ते कॉकेशस सरहद्दीवर कोणतीहि एखादी रेल्वे नव्हती. त्यामुळें तबरेज आणि अर्झरुम हीं शहरें इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं. अर्झरूम हें तुर्कांचें बरेंच मोठें तटबंदीचें शहर होतें. तेथून रशियन लोक सहज आशियामायनरवर आक्रमण करण्यास शकत होते. इंग्रजांच्या हातून गॅलिपोली गेल्यामुळें दोस्तांस जें दुःख झालें होतें, तें अर्झरूम रशियाच्या हातांत असल्यामुळें पार नाहींसें झालें.

युद्धाचें सर्व भवितव्य तुर्कांवर अवलंबून आहे हें जर्मन लोक पूर्णपणें जाणत असल्यानें शक्य तितकी मदत तुर्कांस देण्यास जर्मनीनें कधींच कसूर केली नाहीं. जेव्हां बल्गेरियाही जर्मनीस मिळाला, तेव्हां तर त्यांनीं तुर्कांना फारच सहाय्य केलें. सामान आणि पैसा ह्यांचा स्वतः

असें त्यानें पुराव्यानें सिद्ध केलें. फ्रेंच प्रतिनिधीस त्यानें दिलेले पुरावे नाकबूल करतां आले नाहींत; परंतु त्याचें असें ह्मणणें पडलें कीं, इराणच्या स्वातंत्र्यांत रशिया व इंग्लंड आड येत आहेत. त्यावर इराणी प्रतिनिधीनें लगेच उत्तर दिलें कीं, यांत फ्रान्सचाहि पुष्कळ दोष आहे. तो आपल्या "सहकाऱ्यांच्या फायद्याकरितां इराणचा सर्वनाश पहात राहिला आहे. फ्रान्सनें पोलंडला ज्याप्रमाणें रशियाच्या पंजांतून सोडविलें, त्याचप्रमाणें रशिया व इंग्लंड यांच्या तावडींतून त्यानें इराणला सोडविलें असतें, तर कृतज्ञ इराणी लोकांनीं फ्रान्सला अनेक व्यापारी सवलती देऊन त्याचे उपकार फेडले असते. त्याचप्रमाणें इंग्लंडनें इराण-विषयींच्या आपल्या जुन्या धोरणांत बदल केला नाहीं तर त्यांच्या-विषयीं इराणी लोकांत द्वेष व अप्रीति उत्पन्न होणें सहाजीकच आहे. कित्येक वर्षांपासून युरोपियन राष्ट्रें आशियावर आपापलें प्रभुत्व स्थापन करण्याकरितां इराणमध्यें झगडत राहिलीं आहेत आणि त्याचा सर्वनाश करीत आहेत. ज्यांत इराणचा कांहींच संबंध नाहीं, अशा कार्याकरितां त्याच्या स्वातंत्र्याचा व संस्कृतीचा अपहार करण्यांत येत आहे.

जेव्हां ब्रिटन आणि रशिया यांचा लढा विकोपास गेला आणि युद्धाचा प्रसंग येतो कीं काय असें वाटूं लागलें, तेव्हां त्या दोघांनीहि आशियांत तह करण्याचें निश्चित केलें. याच तहाच्या योगानें इराणचें स्वातंत्र्यापहरण करण्यांत आलें. जर सोमाजी आणि गोमाजी ह्यांच्या-मध्यें आपसांत कांहीं तंटा उपस्थित झाला तर ते तिमाजीचें घर लुटून आपली भर करितात. आशियाटिकांबरोबर युरोपियन राष्ट्रांनीं निर्दयता, अनीति आणि मनसोक्त असे, जे जे अत्याचार केले आहेत, त्यांविषयीं जास्तसें विवेचन करण्याची गरज नाहीं. स. १९०० पासून आजपर्यंत इराणांत ज्या घटना घडून आल्या आहेत त्या आमच्या ह्मणण्याचें सत्यत्व प्रस्थापित करण्यास पुरेशा आहेत.

सन १९०० मध्यें आशियांत जितक्या रेल्वे होत्या त्यापेक्षां आज चौपट रेल्वे झाल्या आहेत; पण त्यामानानें इराणांत रेल्वेची वाढ मुळींच झालेली नाहीं. आशियांतील अनेक देशांत संपत्तीची वाढ झाली आहे यांत संशय नाहीं; पण इराण मात्र त्याला पूर्णपणें अपवाद आहे. उलटें त्यांत दारिद्र्यच वाढत चाललें आहे. संपूर्ण जगांत अनेक प्रकारच्या सुधारणा होत आहेत आणि सर्व देशांत प्रजेला नवे नवे अधिकार मिळत चालले आहेत; पण बिचाऱ्या इराणी लोकांना बलपूर्वक या गोष्टींपासून अलग राखण्यांत येत आहे. इराणी लोकांनीं जेव्हां जेव्हां आपल्या उन्नतिकरितां प्रयत्न केले, तेव्हां तेव्हां रशिया आणि इंग्लंड यांनीं त्यांना अडथळा केला आणि अन्यराष्ट्रांनीं शांतपणें तो अन्याय पाहिला. कोणालाहि हा अत्याचार बंद करण्याचें साहस झालें नाहीं. इराणांत ज्या ज्या अनुचित गोष्टी झाल्या आहेत, त्या पाहून मनांत असा प्रश्न येतो कीं असलीं अत्याचारी राष्ट्रें ज्या राष्ट्रसंघांत आहेत तो राष्ट्रसंघ कसा सफल होईल आणि सार्वराष्ट्रीय शांततेचा उपाय कसा निघूं शकेल ? ज्यांच्या रोमरोमांत स्वार्थ भरलेला आहे ते परोपकार काय करणार ?

जेव्हां रशियानें आशियांत आपला विस्तार करण्यास आरंभ केला, तेव्हांपासून इराणवर आधिपत्य करण्याचा हक्क आपला आहे असा त्याचा समज होता. कास्पियन समुद्राच्या उभय बाजूंनीं इराणला चेपीत तो पुढें येत होता. ट्रान्सकाकेशियाचा प्रांत—ज्यांत तेलाच्या सर्वांत उत्तम खाणी आहेत—रशियानें युद्धांत जिंकून घेतला होता. ट्रान्स कास्पियन प्रांताचाहि फार मोठा अंश त्यानें इराणपासून हिसकून घेतला. रशियाच्या सुखस्वप्नाच्या पूर्तींत इराण आड येत होता, म्हणून तो इराणवर कोणत्या ना कोणत्या प्रकारें सत्ता स्थापन करण्यास पहात होता. इकडे ब्रिटनचीहि इच्छा अशी होती कीं, हिंदुस्थानच्या मार्गावर इराण असल्यानें तो आपल्या अंकित असला पाहिजे. १८५४ आणि १८७७

मध्यें ब्रिटननें रशियाला टर्कीच्या मार्गानें भूमध्यसागरापर्यंत येण्याला विरोध केला होता. जेव्हां रशियाला दार्दानेलिसपर्यंत येण्याला मार्ग मिळेनासा झाला, तेव्हां त्यानें आपला मोर्चा पॅसिफिक महासागर आणि इराणची खाडी यांजकडे वळविला. पूर्व आशियांत जपानची पाठ थोपट्ण्याकरितां इंग्लंड उभें होतें आणि त्यानें मुकडेन व पोर्ट आर्थरचा मार्ग मोकळा केला होता. इराणची खाडी इंग्रजांच्या सत्तेखालीं आलीच होती. त्यावेळीं अफगाणिस्थानहि एक प्रकारें त्यांच्याच हातांत होता. जेव्हां रशियानें मध्य आशियांत पुढें सरून रेलवे बांधण्यास आरंभ केला, तेव्हां इंग्रज समजून चुकले कीं, पुढें मागें हें ग्रहण हिंदुस्थानला लागल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांनीं विचार केला कीं, आतां इराणांतच रशियाशीं सामना दिला पाहिजे. याकरितां विसाव्या शतकांतहि पुन्हां तेथें जुनें राजकारण चालूं लागलें. व मोठमोठे गुप्त कट होऊं लागले. रशिया आणि इंग्लड याची इराण ही रणभूमि झाली आणि आशियावर सत्ता स्थापन करण्याकरितां तीं उभय राष्ट्रें परस्परांचें बल पारखूं लागलीं. या परिक्षेंत त्या राष्ट्रांनीं ह्या गोष्टीचा मुळींच विचार केला नाहीं कीं, यांत इराणचे अधिकार किती तुडविले जात आहेत आणि त्याचें हित किती खच्ची केलें जात आहे. जो स्वतः दुर्बल आहे त्याच्या हक्करक्षणाचा प्रयत्न युरोपियन राजकारणाप्रमाणें पहातां केवळ मूर्खत्वच नव्हे तर आत्महत्यारि आहे.

सन १९०० मध्यें रशियानें आपल्या नूतन रेल्वेचा उद्घाटन समारंभ केला. त्यानें इराणचा खुरासान प्रांत आणि अफगाणिस्थानचा हिरात प्रांत ह्यांच्यामध्यें असलेल्या कुस्त नदीच्या दलदलींत आपले पुष्कळसे लोक आणि रेल्वे बनविण्याचें साहित्य पाठवून दिलें. यामुळें जणूकाय त्यानें इराणी व इंग्रज लोकांना धमकी दिली. त्याचप्रमाणें इराणलाहि त्यानें आपलें कर्ज घेण्यास व त्याच्या तारणाकरितां समुद्रावरील कर आपल्या ताब्यांत देण्यास भाग पाडलें. जर तारण देण्यास विलंब

झाला असता, तर कर्ज देणाऱ्या बँकांस तो कर वसूल करण्याचा रशियानें हुकूम दिला असता. इराण सरकारला त्यावेळीं असेंहि कबूल करणें भाग पडलें कीं, रशियाच्या अनुमतिशिवाय पुढील पंचाहत्तर वर्षांत आपण कोणाहि अन्यराष्ट्रांत कर्ज उभारणार नाहीं. या शर्तीतून इराणच्या आखातांतील बंदरें सोडून दिलीं होतीं; कारण त्यांच्यावर इंग्लंडचा अधिकार होता. १८९२ सालीं इराणनें इंग्रजापासून कर्ज घेतलें होतें. तें ऋण फेडण्याकरितां रशियानें हें इराणला कर्ज दिलें होतें आणि त्याच्या मोबदल्यांत रेल्वे बांधण्याचे कांहीं अधिकार मिळविले होते. हमदान, तेहरान आणि तेब्रीजपर्यंत रशियानें आपल्या रेल्वेचा फांटा आणावा असें निश्चित झालें होतें. ही रेल्वे १९०३ पर्यंत तयार होण्याचें ठरलें होतें. ह्यामुळें हिंदुस्थानसरकार भयभीत झालें होतें.

१९०१ मध्यें इंग्रजांनीं तुर्कांचें कोवीट बेट आपल्या ताब्यांत घेण्याचें योजिलें. त्यावेळीं रशिया त्याच्या आड आला. त्यानें स्पष्टपणें घोषित केलें कीं, इराणी खाडीचे सर्व अधिकार इंग्रजांनींच हिरावून घेणें उचित नाहीं. जर इंग्रजांनीं कोवीट घेतलें, तर त्याच्या बदला आह्माला बंदर आबास मिळणें उचित आहे. आपला हा निश्चय दृढ आहे हें जाहीर करण्याकरितां त्यानें फेब्रुवारी १९०१ मध्यें आपल्या ओडेसा बंदरापासून इराणच्या आखातापर्यंत एक आगबोटीचा रस्ता कायम केला. यामध्यें इराणशीं रशियाचा व्यापारहि वाढत चालला होता आणि पांचच वर्षांत तो पांचपट झाला. हें सर्व पाहून इंग्रजांनीं रशियाचें ऋण आणि रेल्वे यांविरुद्ध इराणी लोकांस चिथावण्यास सुरुवात केली. जेव्हां १९०२ मध्यें रशियानें इराणला आणखीहि कर्ज दिलें आणि त्याच्या बदला रशियाच्या इंपिरियल बँकेच्या शाखा इराणांतील प्रमुख शहरांत उघडण्याचा हक्क मिळविला, तेव्हां पुन्हां इंग्रजांनीं रशियाविरुद्ध इराणी लोकांत चळवळ करण्यास सुरुवात केली.

जेव्हां इंग्रजांनीं असें ऐकिलें कीं, रशियानें इराणच्या खाडींत आपलें आरमार पाठविलें आहे आणि तो बंदर आबास व त्याच्या आसपासच्या द्वीपांत भूमि विकत घेण्यास इच्छित आहे, तेव्हां इंग्रजांना अतिशय चीड आली. हिंदुस्थानचे त्यावेळीं असलेले गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांनाहि वरिष्ठ हुकूम आला कीं, तुह्मीहि इराणच्या आखातांत जाऊन आपल्या बलाचें प्रदर्शन करावें. त्या आज्ञेप्रमाणें लॉर्ड कर्झन इराणांत गेला; पण तेथें इराणसरकारनें त्याचा बराच अपमान केला. जेव्हां कर्झन बुशाहर येथें पोहोंचून इराणचा गव्हर्नर आपल्या स्वागतार्थ येईल ह्मणून बोटींत बसून राहिले, तेव्हां तो गव्हर्नर कर्झनच्या स्वागतार्थ मुळींच आला नाहीं. त्यानें स्पष्टपणें सांगितलें कीं, लॉर्ड कर्झन आपणापेक्षां कोणत्याहि प्रकारें श्रेष्ठ नसल्यानें त्याला प्रथम भेटण्यास जाऊन त्याचें स्वागत करणें मला पसंत वाटत नाहीं. त्याला गरज असेल तर त्यानें मला भेटण्यास यावें. त्यानें हें कृत्य रशियाच्या सल्ल्यावरून केलें होतें. ह्यावर हाऊस ऑफ लॉर्डसमध्यें लॉर्ड लॉन्सडाऊन यानें घोषित केलें कीं, इराणच्या आखातांत आह्मांला जे अधिकार आहेत ते कोणत्याहि तहानें किंवा सार्वराष्ट्रीय कायद्यानें मिळालेले नाहींत, ह्मणून तेथें जर कोणतेंहि राष्ट्र आह्मांला विरोध करील तर सर्व शक्ति एकवटून आह्मीं त्याचा प्रतिकार करूं. तात्पर्य हेंच कीं, जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीपासून शांघायपर्यंत “ बळी तो कान पिळी ” या न्यायानें आपली सत्ता आह्मीं कायम ठेवली आहे त्याचप्रमाणें येथेंहि कायम ठेऊं. ब्रिटनला हिंदुस्थानच्या रक्षणाचा ताम्रपट ईश्वरानें दिलेला आहे, ह्मणून त्याला आशियांतील इतर देशांवर प्रभुत्व स्थापन करण्याचा अधिकारच आहे. एकुणिसाव्या शतकांत त्यानें इराणच्या आसपासच्या अनेक लहानमोठ्या सरदारांस आपल्या अंकित बनविलें होतें आणि त्यांतील कित्येकांस इंग्लंडच्या व कित्येकांस हिंदुस्थानसरकारच्या अंकित केलें होतें. इराणच्या आखातावर अन्य राष्ट्रांची सत्ता होणें त्यांस इष्ट नव्हतें

म्हणूनच त्यानें कोविटमध्यें जर्मनीला आणि बंदर आबासमध्यें राशीयाला विरोध केला होता. जेव्हां फ्रान्सनें इराणच्या ओमन खाडीमध्यें कोळसा घेण्याकरितां एक स्थान हस्तगत करण्याचा प्रयत्न केला, तेव्हांहि इंग्लंडनें त्याला विरोध केला. १९०४ मध्यें ओमनच्या सुलतानानें जिसेह बंदरचा मक्ता फ्रान्सला दिला. यावर इंग्लंडनें सांगितलें कीं, ओमन हें हिंदुस्थानसरकारचें अंकित राष्ट्र आहे आणि हिंदुस्थानसरकारच्या संमतिशिवाय आपला कोणताहि प्रदेश कोणालाहि देतां येत नाहीं; परंतु सुलतानास हें म्हणणें मान्य होईना. तेव्हां इंग्लंड निकरावर आलें आणि आपण मस्कतवर गोळीबार करूं अशी तावडतोब त्यानें धमकी दिली. यावर फ्रान्सनें सांगितलें कीं, मस्कतमध्यें कोळसा घेण्यास आपणाला जितके हक्क मिळतील तितकेच इंग्लंडलाही देण्यास आपली तयारी आहे. अशा रीतीनें ब्रिटन आणि फ्रान्स यांचा आपसांत समेट झाल्यामुळें तें प्रकरण तितक्यावरच निभावलें. नाहीं तर युद्धाचाच प्रसंग होता. दुसऱ्या देशाशीं प्रसंग येतांच, या स्वार्थसाधु युरोपियन राष्ट्रांची आपसांत सुलभपणें समजूत होत असते. दोन बलवान् मनुष्य आपल्यावर आक्रमण करण्यास आलेले पाहून दुर्बल मनुष्याची घाबरगुंडी उडून जाते आणि त्या दोघांनाहि आपलें कार्य तडीस नेण्याची चांगली संधि सांपडते, यांत दुर्बलाची पूर्णपणें दामटी वळली तरी हरकत नाहीं. त्याची चिंता बलवानानीं कां करावी ?

जपानकडून पराजय झाल्यानंतरहि इराणमध्यें राशियाची सत्ता जशाची तशी कायम राहिली. इतकेंच नव्हे तर तिकडे मंचुरियांत गतिरोध झाल्यावर तो इराणांतून समुद्रापर्यंत पोंहोचण्याचा जास्तच नेटानें उद्योग करूं लागला. इंग्रजांनीं पुष्कळ विरोध केला असूनहि त्यानें आपला एक वकील बंदर आबासमध्यें ठेवण्यास कमी केलें नाहीं. ब्रिटन आणि रशिया यांपैकीं कोणतेंहि राष्ट्र दुसऱ्यास इराणांतून हांकलून देण्यास समर्थ नव्हतें; परंतु एकमेकांच्या स्वार्थाआड येणें मात्र त्यांना

सुलभ होतें. उभय राष्ट्रें इराणला अन्योन्य राष्ट्राकडून कर्ज काढण्यास देत नव्हतीं यामुळें त्या देशांतील रेल्वे अपुरी राहिली आणि देशांत अराजकता माजून राहिली.

१८९६ मध्यें जेव्हां शहा नासिरुद्दिनचा खून झाला तेव्हां इराणचा खजिना खूप भरलेला होता; पण दहावर्षांनंतर शहा मुजफरउद्दीनच्या अमदानींत त्याला पूर्ण ओहोटी लागली. या ओहोटीचें कारण ह्मटलें ह्मणजे इंग्लंड व रशिया यांचीं कारस्थानेंच होत; परंतु इराणची ती दुर्बल स्थिति महायुद्धानंतरहि तशीच कायम राहिली नाहीं. प्रसिद्ध इराणी देशभक्त शहा रेझाखान यानें इराणला नवजीवन प्राप्त करून दिलें. १९१७ मध्यें रशियांत झालेल्या क्रांतिनंतर सोव्हियेट सरकारनें इराणच्या राजकारणांतून आपलें अंग पूर्णपणें काढून घेतलें. त्यानंतर आशियांत झालेल्या सार्वत्रिक जागृतींत इराणहि जागृत झाला. त्यामुळें इंग्रजांच्या कारस्थानाची पुढें तेथें फारशी डाळ शिजूं शकली नाहीं. सध्यां इराणची स्थिति पूर्वींच्या मानानें चांगली आहे; पण युरोपियनांनीं त्या देशांत पूर्वीं बळकावलेले हक्क माशानें गिळलेल्या माणकाप्रमाणें परत मिळणें महत्प्रयासाचें होऊन बसलें आहे.

---

# इजिप्तचा ग्रास.

एकुणिसाव्या शतकांत इंग्रजांचें धोरण असें होतें कीं, हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्यामध्यें असलेल्या जलमार्गावर आणि स्थलमार्गावर आपलें आधिपत्य असावें. जरी या धोरणाचें अवलंबन पूर्वीं ठरवून केलें नसलें तरी जणू काय असें दिसून आलें कीं, इंग्रजांनीं आपल्या हेतूच्या पूर्तीकरितां हें सर्व धोरण हुशारीनें व समजूनउमजून केलें

आहे. नेपोलियनबरोबर इंग्रजांचें जें युद्ध झालें होतें, त्यानंतर आज-पासून ग्रेट ब्रिटननें जितकीं राजकीय धोरणें आंखलीं, जितके-तह केले, जितके देश आपल्या आधिपत्याखालीं आणले आणि जितके देश आपल्या संरक्षणासाठीं आणले, ते वास्तविकपणें भारतवर्षावर दृष्टि ठेऊन आणले आणि पादाक्रांत केले होते.

इंग्रजांनीं नेपोलियनबरोबर भूमध्यसमुद्र, इजिप्त आणि सिरिया यांत युद्धें केलीं होतीं, हीं सर्व भारतवर्षाकरितां होतीं. व्हियेना येथील तह-परिषदेमध्यें इंग्लंडनें युरोपांतील कोणताहि मुलूख आपणाकरितां मागितला नव्हता. ते आपल्या नुकसानीबद्दल आपण जें मालटा, मॉरि-शस, सिसिली आणि सिलोन यांवर आधिपत्य स्थापन केलें आहे तें कायम राहावें इतकेंच इच्छित होते. सन १८१५ मध्यें आणखी कोण-तेंहि राष्ट्र भारतवर्षाच्या स्थलमार्गांत बाधक होऊं नये ह्मणून इंग्लंडनें तुर्कांस सहाय्य केलें. जेव्हां इजिप्तच्या महंमद अलीनें तुर्कसाम्राज्यावर आक्रमण केलें होतें, तेव्हां त्याला सिरियामध्यें इंग्रजी आरमार आणि सैन्य यांनीं अडथळा केला होता आणि जरी इंग्रज जनतेला नापसंत होतें तरी इंग्रज सरकार बालकन राष्ट्राच्या स्वातंत्र्यास नेहमीं अडथळा आणीत असे व मुसलमान लोक ख्रिस्ती लोकांची जी कतल करीत त्याजकडे उपेक्षा बुद्धीनें पाहत असे. क्रिमियन युद्ध केवळ तुर्कांच्या रक्षणाकरितां होतें. या युद्धानंतर सॅनस्टफनो येथें जो तह झाला तो रद्द करण्याची कारवाई इंग्रजानींच केली आणि तो तहनामा जर रद्द झाला नसता, तर १८७७ मध्यें फिरून इंग्लंडनें रशियाशीं लढाई पुकारली असती. ब्रिटिश सरकार प्रथम सुवेझ कालवा तयार करण्याच्या विरुद्ध होतें, परंतु हा कालवा जेव्हां बांधून तयार झाला, तेव्हां त्यानें सुवेझ कंपनीपासून त्याचे सर्व अधिकार आपण विकत घेतले. यानंतर ब्रिटिश सरकारनें असें एक कृत्य केलें कीं, जर तें अन्य कोणत्याही राष्ट्रानें केलें असतें, तर इंग्लंडनें त्याच्याशीं अवश्य युद्ध पुकारलें असतें. ज्या तुर्क-

साम्राज्याचें आजपर्यंत इंग्रज लोक रक्षण करीत आले होते त्याचेंच सायप्रस बेट इंग्रजांनीं आपल्या रक्षणाखालीं आणलें आणि इजिप्तवर आपलें आधिपत्य स्थापन केलें. जेव्हां इंग्रजांच्या सत्तेखालीं इजिप्त सांपडला, तेव्हां इंग्रजांनीं आपलें बालकनसंबंधींचें पूर्वीचें धोरण बदललें. पूर्व रूमेलिया जेव्हां बल्गेरियांत सामील झाला, तेव्हां इंग्रजांनीं त्याला संमत्ति दिली. जर त्यापूर्वी आठवर्षे बल्गेरियाच्या राज्यविस्ताराचा प्रश्न उभा राहिला असता तर कदाचित् इंग्रज लोकांनीं सर्व युरोपमध्यें एक भीषण युद्ध माजविलें असतें.

इजिप्तवर आधिपत्य स्थापीत करतेवेळीं इंग्रजांनीं सर्व राष्ट्रांना असें सांगितलें होतें कीं, आह्मी हा अधिकार कायमचा स्थापन केलेला नाहीं. आह्मी लवकरच तो अधिकार सोडून देऊं;पण त्यांनीं कोणता ना कोणता तरी बहाणा करून इजिप्त आपल्या हातांत ठेवलें आहे. एकुणिसाव्या शतकाचे शेवटीं इंग्रजांनीं इजिप्त आणि तांबडा समुद्र यांवर आपलें आधिपत्य दृढ करण्याकरितां सुदान काबीज केलें आणि दक्षिण आफ्रिका आपल्या हातांतून निसटून जाऊं नये ह्मणून बोअर युद्ध केलें. त्याचवेळीं ब्रिटननें आफ्रिकेच्या दक्षिण टोंकापासून उत्तर टोंकापर्यंत आपली रेल्वे बनविण्याचा विचार केला. इजिप्तमध्यें इंग्रजांची सत्ता वाढल्यानें फ्रान्स आणि इंग्लंड यांचें युद्ध होण्याचा संभव होता; पण दोन्हीं देशांनी आपसांत तह केला. याचें कारण असें होतें कीं, एक तर फ्रान्स त्यावेळीं कांहीं कारणामुळें इंग्लंडबरोबर युद्ध करण्यास तयार नव्हतें आणि त्याची दृष्टि केवळ मोरोक्कोवर होती. भारतवर्षाच्या कोणत्याहि मार्गावर नव्हती. ८ मे १९०४ मध्यें ब्रिटन आणि फ्रान्स यांमध्यें एक करारनामा झाला, त्यायोगानें दोघांनीहि आपलीं जगांतलीं युद्धें बंद केलीं. या करारनाम्याचें महत्वाचें कलम असें होतें कीं, फ्रान्सनें इजिप्तमध्यें कांहीं गडबड करूं नये आणि इंग्लंडनें मोरोक्कोमध्यें फ्रान्सला पाहिजे तसें चरूं द्यावें. इंग्रज लोक समजून होते कीं, जर

इजिप्तमध्यें फ्रान्सनें कांहीं गडबड केली, तर सुवेझ कॅनालपर्यंत हिंदुस्थानच्या मार्गावरील आपला अधिकार नष्ट होईल, याकरितां त्यानें फ्रान्सशीं तह केला होता.

यानंतर तीन वर्षांनीं इंग्लंडनें रशियाशीं तह केला. त्यांतेंहि ध्येय हिंदुस्थानपर्यंत पोंहोचणाऱ्या मार्गाचें रक्षण व्हावें हेंच होतें. रशिया तिकडे इराणमध्यें बराच पसरून अफगाणिस्थानच्या सीमेपर्यंत पोहोचला होता आणि तिबेटमध्यें गडबड करण्यास इच्छित होता. याकरितांच १९०७ मध्यें इंग्रजांना रशियांशीं तह करावा लागला. यानंतर आणखीहि कांहीं वर्षेपर्यंत इंग्रजलोक भारतवर्षाच्या जल आणि स्थल मार्गाचें रक्षण करीत राहिले आणि शेवटीं गेल्या महायुद्धाच्या कांहीं आधीं इंग्रजांचा उद्देश पूर्णपणें सफल होत होता, इतक्यांत जर्मनीनें युद्धास तयार होऊन मध्यें विघ्न उपस्थित केलें. परंतु या युद्धांतहि इंग्रजांचा हा उद्देश सफल झाला आणि संपूर्ण दक्षिण आशियांत भूमध्यसमुद्रापासून पॅसिफिक महासागरापर्यंत त्यांचा अधिकार पूर्णपणें दृढ झाला.

जलमार्गानें भारताचे रक्षणाकरितां इंग्रजांनीं पश्चिमेकडे अरबीसमुद्रापर्यंत पूर्वेकडे बंगालच्या उपसागरावर आणि हिंदी महासागरांतील सर्व महत्वाच्या ठाण्यांवर आपलें आधिपत्य स्थापन केलें. इंग्रज लोक सर्व समुद्रांवर आपलें आधिपत्य अशाकरितां इच्छित होते कीं, ह्यामुळें किनाऱ्यावरील सर्व देश आपल्या मुठींत राहावे. लंडन आणि लिव्हरपूलपासून हाँगकाँगपर्यंत सर्व प्रदेश आणि समुद्र केवळ आरमाराच्या जोरावर ताब्यांत ठेवणें शक्य नव्हतें, याकरितां इंग्रजांनीं समुद्रांमधील दुसऱ्या अनेक स्थानांवर आपलें आधिपत्य स्थापन केलें. हिंदुस्थानच्या पश्चिम मार्गावर जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस, इजिप्त, एडन आणि सुदानवर, अरबी समुद्रांतील सोकोट्रा आदि अनेक टापूंवर, इराणच्या आखातांतील बेहरीन द्वीपकल्पावर, हिंदुस्थान जवळच्या सिलोन बेटावर, बंगालच्या

उपसागरांतील बेटांवर, पूर्वेस सिंगापूर आणि मलाया द्वीपकल्पावर, बोर्निआच्या उत्तर भागावर चांगल्या रीतीनें इंग्रजांनीं आपली सत्ता स्थापन केली. हिंदुस्थानच्या उत्तरेस बलुचीस्थान, अफगाणिस्थान, रशियाचा बुखारा आणि तुर्कस्थान,चीनचा तिबेट आणि सिक्यांग प्रांत, नेपाळ आणि भूतान हीं संस्थानें व ब्रह्मदेश आहे. जेव्हां हिंदुस्थान सरकारनें बलुचीस्थान आणि ब्रह्मदेश यांचा समावेश हिंदुस्थानांत केला, तेव्हांपासून इराण, चीनचा शेचुआन व युनान प्रांत, फ्रेंच इंडोचायना आणि सयाम ह्यांच्या सीमा हिंदुस्थानच्या हद्दींत मिसळल्या.

१८७५ पासून १९०३ पर्यंत प्रयत्न केल्यानंतर बलुचीस्थान आणि १८७९ पासून १९०९ पर्यंत प्रयत्न केल्यावर ब्रह्मदेश ब्रिटिश भारतांत समाविष्ट झाला. परंतु अधिकारवर्धनाची लालसा केव्हांहि पूर्ण होत नाहीं. ती अधिकच वाढत जाते. ह्यामुळें गत महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटननें दक्षिण इराणमध्यें आपला पाया दृढ करण्याचा उद्योग आरंभिला. स्वतः इराणला ही गोष्ट संमत होती अशांतली गोष्ट नाहीं; परंतु ह्यासंबंधीं रशिया व ब्रिटन यांनीं परस्पर तह केला होता. तसेंच इंग्रजांचें प्रभुत्व स्वीकारण्याकरितां अफगाणिस्थानशीं कटकटीस आरंभ झाला. इजिप्तमध्येंहि तेथील रहिवाशांच्या इच्छेनुसार नव्हे, तर फ्रान्सशीं केलेल्या कराराप्रमाणें इंग्रजांनीं फारच चांगल्या रीतीनें पाय रोवले आणि आपली सत्ता वाढवीत वाढवीत त्यानीं ती नील नदीच्या उगमापर्यंत नेली.

इकडे दक्षिण इराणमध्यें आपले पाय पसरीत हिंदुस्थान सरकारनें बलुचीस्थान आपल्या घशांत कोंबलें आणि तिकडे सयामला दटावीत ब्रह्मदेश गिळून टाकला. १९०९ मध्यें ब्रिटननें सयामकडून त्याचीं तीन लहान लहान मांडलिक संस्थानें हिरावून घेतलीं आणि बंगालच्या उपसागराच्या तटावर आपला पूर्ण अधिकार स्थापन केला. वायव्येकडे संरक्षित राज्यांवर आक्रमण करणाऱ्या रानटी जातींना शिक्षा करण्याच्या मिषानें सैन्य पाठविलें जात असे आणि ह्याप्रकारें नव्या प्रदेशावर सत्ता

स्थापन करण्यांत येत असे. जोंपर्यंत डोंगरांची पूर्ण हद्द भारतसरकारच्या ताब्यांत आली नव्हती तोंपर्यंत हें धोरण सारखें चालू होतें. आतां हिंदुस्थानच्या सीमेवर नेपाळ, भूतान आणि अफगानिस्थान हींच केवळ तीन स्वतंत्र राज्यें राहिलीं आहेत; परंतु ह्यांपैकीं दोन राज्यें वास्तविक पहातां स्वतंत्र नाहींत, हिंदुस्थान सरकारनें त्यांचे हातपाय बांधून टाकले आहेत. कित्येक वर्षांपासून नेपाळमध्यें इंग्रज रेसिडेंट राहत आहे आणि हिंदुस्थानच्या सैन्याकरितां तेथून पुष्कळ गुरख्यांची भरती करण्यांत येते. तेथील मुख्य प्रधान इंग्रजांच्या तंत्रानें चालत असतो. हिंदुस्थानच्या इच्छेप्रमाणें नेपाळ आणि भूतान यांनीं वागावें ह्मणून त्यांस मोठमोठ्या रकमा देण्यांत येत असतात. १८६४ मध्यें भूतानचा कांहीं भाग बंगालमध्यें समाविष्ट करण्यांत आला होता आणि १८६५ पासून त्याला ग्रँट देण्यांत येते. जेव्हां तिबेटमध्यें लढाई उपस्थित झाली, तेव्हां भूतानमध्यें इंग्रजांनीं आपल्या तर्फेचा एक सत्ताधारी निर्माण केला आणि ह्याप्रकारें लढाईशिवाय हा प्रदेश आपल्या हस्तगत केला. १९१० मध्यें भूताननें आपले परराष्ट्रीय संबध इंग्रजांच्या हातीं दिले आणि ह्याच्या मोबदल्यांत आपली ग्रँट दुप्पट वाढवून घेतली. ह्यावेळीं इंग्रजांना भूतानच्या सीमेवर दोन चांगलीं ठाणींहि मिळालीं. ब्रिटिशभारताच्या विस्ताराचा इतिहास पाहिला असतां असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, जर मध्यंतरीं जगांतील राजकीय परिस्थितींत आणि संबंधांत फार मोठें परिवर्तन झालें नाहीं तर नेपाळ आणि भूतान लवकरच ब्रिटिश भारतांत समाविष्ट होतील.

## तिबेट.

विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत इंग्रजलोकांना तिबेटाची फारशी चिंता नव्हती; परंतु हिंदुस्थानचे संरक्षणास तिबेटचा हाली-

सारखा उपयोग होण्याचा संभव असल्यानें इंग्रजांनीं तिबेटी लोकांशीं विसाव्या शतकाच्या आरंभीं सख्य करण्याचा उपक्रम केला. इतक्यांत तेथें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याची चळवळ चालू झाली आणि त्याकरितां तिबेटी लोकांचें चिनी साम्राज्यसत्तेबरोबर युद्ध सुरू झालें. इंग्रज लोकांच्या हेतूला दुसरा अडथळा हा आला कीं, अजूनपर्यंत तिबेटाबाहेरील लोकांना त्या देशाचें विशेषसें ज्ञान नाहीं, इतकेंच नव्हे तर त्या देशांत लोकसंख्याहि किती आहे याची पूर्ण माहिती नाहीं; परंतु जेव्हां हिंदुस्थानसरकारनें उत्तरेस हिमालयापर्यंत आणि पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत आपलें साम्राज्य स्थापन केलें, तेव्हां तिबेटाबरोबर व्यापार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें १८९० आणि १८९३ मध्यें चीन देशाबरोबर तह केला होता; पण तिबेटवासी लोक बाहेरील जगाशीं व्यापार करण्यास इच्छित नसत. यापूर्वींहि कांहीं वेळां हिंदुस्थानसरकारापुढें तिबेटचा प्रश्न आला होता; परंतु कांहीं अंतस्थ कारणामुळें हिंदुस्थानसरकारनें तिबेटच्या राज्यकारभारांत हात घातला नाहीं. एक तर चीन देशाला नाराज करण्याची इंग्रजांना तेव्हां खुषी नव्हती आणि दुसरें तिबेटांतील व्यापार फारसा फायदेशीरहि नव्हता. तसेंच तिबेटवासी लोक कोणत्याहि परकीय लोकांना आपल्या देशांत विशेषेंकरून आपल्या देशाची राजधानी लासा या शहराच्या आसपासच्या टापूंत पाऊल टाकूं देत नसत. त्या देशावर चीनचा अधिकार केवळ नावांपुरता होता. चीनचे फक्त पांच हजार स्वार तेथें असत.

जोंपर्यंत तिबेटवासी लोक परदेशीय लोकांशीं कांहींच संबंध ठेवीत नसत तोंपर्यंत इंग्रज लोक स्वस्थ होते; पण स. १९०० मध्यें त्यांनीं हें ऐकिलें कीं, दलाई लामानें आपल्या वकीलाबरोबर एक पत्र व कांहीं नजराणा रशियाच्या झाराकडे पाठविला आहे, तेव्हां त्यांना फारच काळजी पडली. यापूर्वीं तिबेटवासीयांनीं केव्हांहि आपला वकील युरोपांतील कोणत्याहि राजापाशीं पाठविला नव्हता. रशियाचा एक वकील

यापूर्वीच येऊन दलाई लामाला भेटला होता, अशीहि माहिती सूक्ष्म शोधाअंतीं इंग्रजांना कळून आली. जुलै १९०१ मध्यें दलाई लामाचा आणखी एक वकील फिरून राशियाच्या झारापाशीं गेला. राशियांतील बौद्ध लोकांना धार्मिक स्वातंत्र्य देण्याची विनंति करण्याकरितां हा वकील दलाई लामानें पाठविला आहे, असें रशियन वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केलें होतें, परंतु राशिया पूर्वीपासूनच मांचुरिया आणि मंगोलिया यांत कांहीं गडबड करीत होता, यामुळें हें गुप्तपणें वकील पाठविण्याचें कृत्य चीन आणि इंग्लंड या उभय देशांना संशय येण्यास कारण झालें. राशिया देश आतां एका नव्या मार्गानें हिंदुस्थानावर आक्रमण करण्याच्या विचारांत आहे असें इंग्रज लोकांना भय पडलें. यामुळें इंग्रज वृत्तपत्रांनीं एकच ओरड करण्यास सुरवात केली. ते पुन्हां पुन्हां तिबेटवासियांना दोष देऊन लिहूं लागले कीं, त्यांनीं आमच्याबरोबर अमुक वेळीं अमुक केलें, अमुक अमुक तहाचें अमुक प्रकारें पालन केलें नाहीं. त्यावेळीं चीनच्या मुर्वतीखातर आह्मी स्वस्थ राहिलों; परंतु आतां तर तिबेटवासी लोक राशियाशीं गुप्तपणें खलबतें करीत आहेत, ह्मणून आह्मीं आमच्या सरहद्दीचा योग्य बंदोबस्त राखिला पाहिजे आणि व्यापारी तहांतील अटी निश्चयानें अंमलांत आणल्या पाहिजेत. या कामीं चीनला मोठेपणा देण्याकरितां ते असें लिहूं लागले कीं, आह्माला राशियासारखें सरळ दलाई लामाशीं बोलणें चालणें करण्याची इच्छा नाहीं. जें काय करावयाचें तें आह्मी चीनमार्फत करूं. यामुळें चीनाबरोबर इंग्लंडचें बोलणें चालणेंहि झालें आणि मे १९०३ मध्यें इंग्लंडनें चीन देशालाही सूचना दिली कीं, सरहद्द आणि व्यापारी संबंध यांचा विचार करण्याकरितां हिंदुस्थानच्या व्हाइसरायानें नेमलेलें कमिशन तिबेटच्या सरहद्दीवर चिनी व तिबेटी प्रतिनिधींच्या भेटी घेईल.

तदनुसार जुलै १९०३ मध्यें सिकीमचे इंग्रज पोलिटिकल एजंटबरोबर कर्नल यंग हंजबँड तिबेटच्या सरहद्दीच्या आंत खंबाजंग नामक ठिकाणीं

जाऊन पोहोंचले. जेव्हां कित्येक महिनेपर्यंत चिनी किंवा तिबेटी प्रतिनिधि तेथें आले नाहींत तेव्हां इंग्रजांनी तेथें आपली फौज बोलावून तिबेटावर आक्रमण करण्याकरितां रस्ते बनविण्यास सुरुवात केली. रशियाच्या ताब्यांत कोणत्याहि प्रकारें तिबेटानें जाणें हिंदुस्थान सरकारास अतिशय अनिष्ट होतें; ह्मणून त्याला आपल्या ताब्यांत ठेऊन लासामध्यें आपला वकील ठेवण्याची हिंदुस्थानसरकारची इच्छा होती. त्यांना तिबेट किंवा खुद्द चीन ह्यांच्या विरोधाची बिलकुल पर्वा नव्हती. कर्नल यंग हजबंड आपल्या बरोबर पुष्कळ फौज घेऊन गेला होता आणि त्यानें निश्चय केला होता कीं जर तिबेटवासीयांनी आपणांस विरोध केला, तर तेथल्या तेथेंच गोळी घालून त्यांस ठार मारूं.

पण हिंदुस्थानसरकारचें हें अरेरावी कृत्य अनुचित समजणारे कांहीं उदारमतवादी इंग्रज इंग्लंडांत होते. त्यांनीं ह्यासंबंधीं पार्लमेंटामध्यें कांहीं प्रश्नहि केले होते. ह्या चळवळीमुळें ज्यांत चीन व तिबेट ह्यांच्या परराष्ट्रीय राजकारणासंबंधीं खुलासा केलेला होता असें एक पत्रक जाहीरपणें प्रसिद्ध करणें हिंदुस्थानसरकारास भाग पडलें. त्या जाहीरपत्रकावरून कळून येत होतें कीं, लासापर्यंत फौज पाठवून तेथें आपला रेसिडेंट ठेवावा अशी भारतसरकाराची इच्छा होती. ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानसरकारच्या ह्या कारवाईस जरी संमत्ति दिली नाहीं, तरी तिबेटवर आक्रमण करण्यास हिंदुस्थानसरकारास हरकत वाटली नाहीं. यामुळें यंग हजबंडनें तिबेटमध्यें पुढें घुसण्यास आरंभ केला आणि १० दिवसांच्या आंत तीन लढायांमध्यें तिबेटी लोकांचा पराभव केला. तिबेटी लोकांपाशीं चांगलीं हत्यारें नव्हतीं किंवा कवायती सैन्यही नव्हतें. यामुळें पहिल्याच लढाईंत इंग्रजांनीं त्यांचे सहाशें सैनिक परलोकीं पाठविले आणि दोनशें सैनिकांना कैद केलें. यानंतर यंग हॅजबंडनें दलाई लामाला एक पत्र पाठविलें कीं, २५ जूनपर्यंत कांहीं उत्तर आलें नाहीं किंवा आमच्या मागण्या मान्य केल्या नाहींत, तर इंग्रजी सैनिक लासाला

घेऊन पोहोंचतील; परंतु तें पत्र जसेंच्या तसें त्याच्यापाशीं परत आलें, म्हणून त्यानें कांहीं अधिक फौज आपल्या मदतीला मागविली आणि ३ आगस्ट रोजीं लासा शहर आपल्या कब्जांत घेतलें. या लढाईंत इंग्रजांचे फक्त ३६ सैनिक कामी आले; परंतु दलाई लामाच्या १५०० शिपायांनीं परलोकचा रस्ता पाहिला. दलाई लामा मंगोलियाला पळून गेला आणि इंग्लंडनें ७ सप्टेंबर स. १९०४ रोजीं तिबेटी लोकांकडून जबरदस्तीनें एका तहावर सही करून घेतली. या तहान्वयें असें ठरलें कीं, इंग्रजी व्यापाऱ्यांस तिबेटांत व्यापार करण्यास मोकळीक असावी, इंग्रजांच्या संमत्तिशिवाय तिबेटी लोकांना आपल्या देशाचा कोणताहि भाग कोणत्याहि परकीय राष्ट्रास उपभोगण्यास देण्याचा हक्क नसावा, कोणत्याहि अन्य राष्ट्रास तिबेटाच्या अंतर्गत कारभारांत हात घालतां येऊं नये आणि त्याला तेथें आपला प्रतिनिधी ठेवतां येऊं नये. जे व्यापारी हक्क अजून इंग्रजांना मिळाले नाहींत ते अन्य कोणत्याहि राष्ट्रास मिळूं नयेत. ह्याशिवाय युद्धांत झालेला खर्च म्हणून पांच लाख पौंड इंग्रजांस द्यावे आणि जोंपर्यंत ह्यांच्या पांच लाख पौंडांची पूर्णपणें फेड होणार नाहीं, तोंपर्यंत इंग्रजांनीं तिबेटांत आपलें सैन्य ठेवावें आणि त्याचा खर्च तिबेटापासून घ्यावा.

ह्यावर पार्लमेंटांत बरीच खळबळ उडाली. याचें कारण असें होतें कीं, एक तर तिबेटावर जुलूम झाला होता आणि दुसरें तिबेटावर स्थाईरूपानें अधिकार गाजविला तर चीन नाराज होऊन चीनांतील आपल्या फायदेशीर व्यापाराला धोका बसेल अशी इंग्रजांना भीति होती. यामुळें इंग्रजी पार्लमेंटनें नुकसान भरतीची रकम कमी करून एक तृतियांश केली. कारण त्यांचा हेतु सफल झाला होता. ते तिबेटवासी लोकांना केवळ हेंच दाखवावयास पाहत होते कीं, जर हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील कोणत्याहि देशांत राशियाचें वर्चस्व होईल तर तें इंग्रजांस कधींहि सहन होणार नाहीं, आणि तिबेटावर आक्रमण करून त्यांनीं पूर्णपणें ही गोष्ट

तिबेटवासीयांना पटवून दिली. यानंतर २७ एप्रील १९०६ रोजीं या तहांत कांहीं फेरबदल करून चीनदेशानेंहि तो तह मान्य केला. त्यावेळीं इंग्लंडनें चीनला अभिवचन दिलें कीं, आह्मीं तिबेटाच्या कोणत्याहि भागावर अधिकार गाजविणार नाहीं, किंवा त्याच्या राजशासनांत हस्तक्षेप करणार नाहीं, आणि चीननें वचन दिलें कीं, आह्मीं कोणत्याहि अन्यराष्ट्रांना तिबेटच्या राज्यकारभारांत हात घालूं देणार नाहीं व नुकसान भरपाईची रक्कम त्याच्याकडून शक्य तितक्या लवकर देववूं.

जेव्हां १९०७ मध्यें इंग्लंड आणि रशिया यांचा तह झाला, तेव्हां तिबेटासंबंधीं असलेला उभयतांचा वाद मिटला. दोघांहि राष्ट्रांनीं तिबेटावर असलेला चीनचा अधिकार मान्य केला, त्याचा कोणताहि भाग ताब्यांत घेऊन त्यावर अधिकार गाजविणार नाहीं अशी कबुली दिली. त्याच्या राजशासनांत हस्तक्षेप न करण्याचा संकल्प केला, आणि ठरविलें कीं, दोघांनीहि आपला प्रतिनिधि लासा येथें ठेवून दलाई लामाशीं परस्पर व्यवहार न करितां चीनच्या मार्फतच त्याच्याशीं व्यवहार करावा. रशियानें तिबेटांत असलेले इंग्लंडचे विशेष हक्क मान्य केले आणि १९११ साल संपेपर्यंत दोघांनीहि तेथें आपलें मिशन वगैरे पाठवूं नये, किंवा रेल्वे, तार वगैरे सुधारणेचीं साधनें तेथें निर्माण करण्याच्या भानगडींत पडूं नये असें ठरलें. ह्याप्रकारें रशिया आणि इंग्लंड या उभय राष्ट्रांनीं तिबेटविषयीं तटस्थता स्वीकारल्यानंतर दलाई लामा परत लासा येथें आला. आतां चीनला तेथें आपलें पूर्ण वर्चस्व स्थापन करण्यास संधी मिळाली. रुसो जपानी युद्धांत रशियाचा पराभव झाल्याकारणानें संपूर्ण आशियाखंडांत राष्ट्रीयभावनेचा उदय होऊं लागला होता; ह्मणून तुर्कस्थानाप्रमाणें चीन देशाचीहि हीच इच्छा होती कीं, आपल्या साम्राज्यांतील कोणताहि प्रांत कोणत्याहि अन्यराष्ट्राच्या अधिसत्तेखालीं असूं नये. याकरितां चीनदेश तिबेटावर आपली पूर्ण सत्ता स्थापूं पाहत होता,

१९०८ मध्यें दलाई लामानें पेकिंग येथें जाऊन चिनी साम्राज्याचें मुख्य संचालकपद स्वतःस प्राप्त होण्याकरितां पुष्कळ खटपट केली. पण चिनीराष्ट्रानें त्याला उत्तर दिलें कीं, राजकीय अधिकाराची गोष्ट तर सोडाच; पण वेळ पडली तर तुमचा आमच्यावर असलेला धार्मिक अधिकारहि आह्मी झुगारून देऊं. जेव्हां दलाई लामा लासाला पोहोंचला, तेव्हां चिनी राष्ट्राच्या वरील उत्तराचें प्रत्यंतर त्याच्या दृष्टीस पडलें. लासाचा सर्व अधिकार चिनी सैनिकांनीं आपल्या ताब्यांत घेतला होता आणि चिनी राष्ट्रानें पाठविलेला वकील तेथील व्हाइसराय बनला होता. जेव्हां दलाई लामानें आपला जुना अधिकार गाजविण्यास सुरवात केली, तेव्हां चिनी सैनिकांनीं त्याच्या कांहीं अनुयायांना कापून काढिलें. दलाई लामा पळून हिंदुस्थानांत आला, आणि चीन देशानें एक जाहीरपत्रक काढून दलाई लामास पदच्युत केल्याचें सर्व जगास जाहीर केलें.

१९१२ च्या राज्यक्रांतीचे वेळीं पगार आणि अन्न इत्यादि बंद झाल्यानें लासा येथील चिनी सैन्यानें बंड केलें व तिबेटी मठांवर हल्ला केला. त्यावेळीं तिबेटी लोकांनीं मार देऊन त्यांना पिटाळून लाविलें आणि ते हिंदुस्थानच्या रस्त्यानें तिबेटांतून पळाले. आतां दलाई लामा पुन्हां लासाला आला आणि त्यानें आपले जुने अधिकार आपल्या ताब्यांत घेतले. यानंतर जेव्हां चीननें तिबेटावर स्वारी करून त्यावर आपलें स्वामित्व स्थापण्यास सुरवात केली; तेव्हां इंग्रजांनीं चीनला विरोध केला. शेवटीं इंग्रजांच्या सांगण्यावरून चीन आणि तिबेट ह्या देशांचे प्रतिनिधि आपला झगडा मिटविण्याकरितां हिंदुस्थानांत एकत्र झाले. दलाई लामानें चिनी राष्ट्रापासून बचाव होण्याकरितां इंग्रजांचा आश्रय केला होता. चिनी राष्ट्रांत अजूनहि आपापसांत यादवी चालत असल्यानें हें प्रकरण तसेंच भिजत पडलें आहे. गत महायुद्धांत तिबेटनें इंग्रजांच्या सहाय्याकरितां कांहीं सैनिकहि पाठविले होते. याशिवाय व्यापारामुळें तिबेटापासून इंग्रजांस पुष्कळ लाभ झाला आहे. गत महायुद्धाच्या वेळीं

हा लाभ दुप्पट प्रमाणांत झालेला दिसून आला आणि तिबेट हातांत आल्यानें हिंदुस्थानची उत्तर सरहद्द सांभाळण्याच्या बाबतींत जो फायदा झाला आहे त्याची तर गणतीच नाहीं.

गत महायुद्धामध्यें चीनदेशानेंहि जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें होतें; परंतु संयुक्त राष्ट्रांना त्यामुळें फारसा फायदा झाला नाहीं. कारण युद्धकालामध्यें चिनांत पुष्कळ अंतर्गत कलह झाले. तिबेटांतहि कांहीं गडबड उडाली होती. १९१८ च्या शेवटीं एक बातमी प्रसिद्ध झाली होती कीं, तिबेटी लोकांनीं चिनी सैनिकांना मारून आपल्या देशांतून पिटाळून लाविलें. चिनांतील अंतर्गत कलह अजूनहि बंद झाले नाहींत. जर पाश्चात्य राष्ट्रें व जपान ह्यांच्या पंजांतून चीनदेश पूर्णपणें मुक्त झाला, तर पाश्चात्य देशांच्या पद्धतीवर तो आपलें राष्ट्रसंघटन करून जागतिक महायुद्धांतील आपलें योग्य स्थान पटकावील. जर चीन देशाला या युद्धांत विजय मिळाला तर तिबेट प्रस्तुतच्याप्रमाणें इंग्रजांच्या ओंजळीनें पाणी पिणार नाहीं. त्यावेळीं तो चीन, जपान, हिंदुस्थान ह्यांना सहाय्य करील व युरोपियन लोकांच्या पंजांतून आशियाखंडास मुक्त करण्याच्या खटपटीस लागेल.

—×—

# आशियांतील हॉलंड.

युरोपियनांमध्यें सर्वांत पहिल्यानें स्पेन आणि पोर्तुगाल यांनीं युरोपबाहेरील देशांचा शोध काढला होता आणि तेथें आपल्या वसाहति स्थापन केल्या होत्या. असा एक वेळ होता कीं, युरोपच्या बाहेर मिळविलेल्या प्रदेशांची पोपाला पाहिजे तशी विल्हेवाट लावतां यत असे. त्याला विरोध करणारें दुसरें राष्ट्र त्यावेळीं युरोपांत नव्हतें. प्रथम दक्षिण आणि मध्य अमेरिका स्पेन आणि पोर्तुगाल ह्यांच्या हातांत

होती; पण नंतर तेथील वसाहतवाल्यांनीं बंडें करून स्वतंत्र प्रजासत्ताक राज्यें स्थापन केलीं. युरोपियन साम्राज्यवादानें या प्रजासत्ताक राज्यांचें स्वातंत्र्य केवळ याच कारणानें टिकलें होतें कीं, आपण दुसऱ्यांचे देश हिरावून घेणार नाहीं किंवा आपण दुसऱ्यांना आपल्या देशांत येऊं देणार नाहीं असें अध्यक्ष मनरोनें जाहीर केलें होतें. एकुणिसाव्या शतकांत जर युरोपांतील मोठमोठ्या राष्ट्रांत विरोध न येता तर आफ्रिकेंतून स्पेन आणि पोर्तुगाल यांची हकालपट्टी केव्हांच झाली असती. अमेरिकनानीं स्पेनच्या आरमाराचा नाश केल्यामुळें आशियांत त्याची एकहि वसाहत राहिली नाहीं. त्याचें बहुतेक राज्य संयुक्त संस्थानें आणि इंग्लंड यांनीं घेतलें व उरलेलें त्याला जर्मनीच्या हातीं सोंपवावें लागलें.

सत्राव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास हालंडनें पोर्तुगालाला सिलोनांतून बाहेर घालविलें आणि अठराव्या शतकाच्या अखेरीस हालंडला हांकलून लावून इंग्लंडनें त्यावर आधिपत्य स्थापन केलें; पण आशियांत पोर्तुगालच्या कांहीं वसाहति राहिल्या आहेत. या सर्व वसाहतींचें क्षेत्रफळ दोन हजार चौरस मैलांपेक्षांहि कमी आहे आणि त्यांत सुमारें दहा लाख लोकांची वस्ती आहे. या वसाहतींमुळें पोर्तुगालला कांहीं विशेष फायदा होतो अशांतली गोष्ट नाहीं. ब्रिटननें ह्या त्याच्या सर्व वसाहति हिसकावून घेतल्या असत्या; पण ब्रिटनला त्यांची कांहीं अवश्यकता नाहीं, किंवा पोर्तुगालची त्याच्याशीं कांहीं तेढहि नाहीं. आज दोनशें वर्षांत पोर्तुगालचा ब्रिटनशीं कांहीं संग्राम उपस्थित झाला नाहीं, किंवा ब्रिटनच्या शत्रूला त्यानें कधीं सहाय्यही केलेलें नाहीं.

परंतु आशियांत हालंडची स्थिति कांहीं निराळी आहे. त्याच्या अधिकारांत डच ईस्ट इंडीज बेटें आहेत. त्यांत जावा, सुमात्रा, बोर्निओ इत्यादि बेटांचा फार मोठा भाग आणि दुसरे अनेक द्वीप आहेत. हीं ठिकाणें अतिशय सुपीकहि आहेत आणि हिंदीमहासागरांत लष्करी दृष्टीनेंहि महत्वाचीं आहेत. त्यांचें क्षेत्रफळ साडेसात लाख चौरस मैल असून

त्यांत मुसलमानांची अधिक वस्ती आहे. यामुळें मुसलमानी वसाहतींच्या दृष्टीनें हालंडहि एक महत्वाचें राष्ट्र आहे. आशियांत ब्रिटननें हालंडापासून अधिक वसाहति छिनावून घेतल्या. सतराव्या शतकाच्या मध्यास हालंडजवळ इंग्रजांबरोबरीचें आरमार होतें; पण नंतर इंग्लंड जेव्हां प्रबल होऊं लागला, तेव्हां तो हळुहळू हालंडच्या वसाहति हिरावून घेऊं लागला. त्यामुळें केपकॉलनी आणि सिलोनहि त्याच्या हातीं आलें. १३ ऑगस्ट १८१४ मध्यें लंडन येथें जो तह झाला होता, त्यांत इस्टइंडिज बेटांवर डचांचें आधिपत्य इंग्लंडनें कबूल केलें होतें. त्याचप्रमाणें वेस्ट इंडीजचेंहि भवितव्य निश्चित झालें होतें. अमेरिकेच्या ठिकाणासंबंधी युरोपियनांमध्यें झालेला हा अखेरचा तह होता. यानंतर मनरो तत्वांस अनुसरून असें निश्चित झालें कीं, आतां कोणी युरोपियन राष्ट्रानें अमेरिकेचें कोणतेंहि ठिकाण हस्तगत करूं नये.

लंडनमध्यें इस्टइंडिजसंबंधी जो तह झाला होता, तो अनुचित होता असें बहुतेक इंग्रज लेखकांचें ह्मणणें आहे. हालंडनें नेपोलियनला सहाय्य दिलें होतें, ह्मणून इंग्लंडनें त्याच्या सर्व वसाहति हिसकावून घेणें, हा कांहीं न्याय नाहीं. कांहीं वेळां तर डचांचीं इस्टइंडिज बेटें सोडून दिल्यानें इंग्रजांचा मोठा फायदा झाला आहे. इस्टइंडिज सोडून देतांना हा फायदा इंग्रजांच्या मुळींच लक्षांत आला नाहीं; पण तरीहि त्यांचा अनायासें फायदा झाला. गत महायुद्धांत हालंडनें जर्मनीच्या बाजूनें समरमखांत उडी घेतली असती, तर इंग्रजांचें फार मोठें नुकसान होण्याचा संभव होता; परंतु इस्टइंडिजमुळें त्यास तटस्थ राहावें लागलें आणि त्या योगानें दोस्त राष्ट्रांचा फारच फायदा झाला.

विस्तार आणि लोकसंख्या यामुळें आशियांतील वसाहतींत डच इस्टइंडिजचें महत्व फारच आहे, ह्मणूनच जगांत त्यांचें महत्व गायिलें जातें. हिंदीमहासागरापासून पॅसिफिक महासागरापर्यंत आणि मलाया द्वीपकल्पापासून न्यूगिनायनापर्यंत जितके महत्वाचे प्रदेश आहेत, त्या

सर्वांवर बहुतेक हालंडचा अधिकार आहे. केवळ बोर्नियोचा थोडासा उत्तर भाग इंग्लंडच्या हातांत आहे आणि तिमोरचा पूर्वभाग पोर्तुगालच्या हातांत आहे. इंग्लंडच्या हातीं वसाहतीस योग्य अशी तेथें इतकी भूमि आहे कीं, पुष्कळ काळपर्यंत त्याला कोणत्याहि नव्या प्रदेशाची आवश्यकता पडणें शक्य नाहीं. डचांनीं तेथें शिक्षणाचा खूप प्रसार केला आहे आणि शेतकीचीहि खूप उन्नति केली आहे. १९१४ पासून तेथील मुद्दतबंदीची चालहि काढून टाकली आहे. याशिवाय डच लोकांनीं सर्व जगांतील लोकांना तेथें मुक्तद्वार ठेवलें आहे.

पण इतकें असूनहि डच लोकांना तेथें सुखानें राज्य करतां येत नाहीं. तेथील मूळनिवासी विशेषता सुमात्रा बेटांतील लोक कांहींना कांहीं उपद्रव देतात आणि त्यांना शांत करावें लागतें. डचांना तेथें लहान मोठीं युद्धें करावीं लागतात आणि त्यांत द्रव्याचा आणि लोकांचा पुष्कळ नाश होतो. समाजसत्तावादी आणि उदारमतवादीहि तेथील सरकारला सारखा त्रास देतात. १९०२ पासून १९०९ पर्यंत सुमात्रा बेटाच्या उत्तरभागांत अचीनियो लोकांनीं उपद्रव मांडला होता; सारखें तीन वर्षे लढूनहि डच सरकारला तें बंड शांत करतां आलें नाहीं, ह्मणून समाजसत्तावाद्यांनीं व उदारमतवाद्यांनीं पार्लमेंटांत सरकारवर उघड दोषारोप केले. ते ह्मणूं लागले कीं, डच सरकारनें अचीनमध्यें रानटीपणाचें वर्तन चालविलें आहे आणि तेथील खाणीचा फायदा घेण्याकरितां तेथील स्त्रिया आणि बालकें ह्यांची हत्या करीत आहे. त्यांनीं अशीहि सल्ला दिली कीं, जर हें युद्ध शांत होऊं शकत नाहीं, तर ती वसाहतच सोडून द्यावी. असल्या रक्तपातापेक्षां वसाहतच सोडून देणें अधिक हितावह आहे. आणि नसेल तर ह्या गडबडींत जर कोणत्याहि प्रबल राष्ट्रानें आमच्यावर स्वारी करून आमच्यापासून त्या वसाहती हिसकावून घेतल्या तर आम्हीं काय करणार ?

१९०५ मध्यें बोर्नियो, सुमात्रा आणि सेलिबीसमध्यें भयंकर रक्तपात माजून राहिला होता. तो १९०७ पर्यंत दूर झाला नाहीं. त्यावेळीं हेगच्या पार्लमेंटनें पुन्हां असा निकाल दिला कीं, सरकार तेथें भयंकर अन्याय करीत आहे. या प्रकारच्या नित्याच्या रक्तपातानें कंटाळून जावून तेथील राणी विलहेमिला हिनें ईस्ट इंडीजच्या स्थितीचें निरिक्षण करण्याकरितां आणि राज्यपद्धति सुधारण्याचे उपाय सांगण्याकरितां एक नवें बादशाही कमीशन पाठविलें जाईल असें घोषित केलें. हा वेळ-पर्यंत हालंडनें बंडाचा पुष्कळ बीमोड केला होता. त्यानें तेथील अत्याचारी सरदारांचें बल पुष्कळ कमी केलें. शेंकडो मैल नव्या सडका बनविल्या, नवे नवे बाजार आणि पेठा उघडल्या आणि अनेक बंडें शांत केलीं. परंतु हालंडनें त्या लोकांवर जुलूमहि पुष्कळ केला. शंभरवर्षांपूर्वीं देशी संस्थानांशीं जेव्हां हालंडनें तह केला, तेव्हां त्या तहान्वयें ठरलें होतें कीं, त्यांनीं आपला माल इच्छेस येईल तर हालंडास विकावा; पण हा करार हालंडनें लवकरच मोडला. पूर्वीं तेथील देशी संस्थानावर कोणत्याहि प्रकारची खंडणी नव्हती; पण नंतर त्यांच्यावर खंडणीहि बसविण्यांत आली. ह्या योगानें त्या संस्थानिकांत असंतोषाची वृद्धि झाली. बादशाही कमिशननें त्या सर्व सवलती पुन्हां त्यास बहाल केल्या आणि त्यांस पुष्कळ हक्क दिले. त्या सुधारणामुळें तेथील रहिवासी पुष्कळ संतुष्ट झाले आणि तेथील व्यापारादिकांची खूप उन्नति झाली. हें पाहून पुष्कळ देशी राजांनीं बंड करण्याचें सोडून दिलें आणि हालंडची सत्ता शांततेनें मान्य केली. त्या योगानें डच सरकारच्या शिरावरील बोजा हलका झाला.

१९१३ मध्यें एका कमीशननें अशी शिफारस केली कीं, हालंडनें वसाहतींच्या रक्षणाकरितां एक नूतन आरमार निर्माण करावें. हें आरमार बांधण्यांत येणार इतक्यांत महायुद्धास सुरुवात झाली व अजूनपर्यंत तें आरमार निर्माण झालेलें नाहीं. आज जरी त्याच्या वसाहती सुरक्षित

असल्या तरी कोणा शत्रूनें आक्रमण केल्यास आपलें सरंक्षण करणें त्याला शक्य नाहीं. यामुळेंच सर्व राष्ट्रांपेक्षां, राष्ट्रसंघ दृढ, होऊन त्यानें सर्वांच्या वसाहती संरक्षण करण्याचा भार आपल्या शिरावर घ्यावा अशी हालंडची फार इच्छा आहे. जर हालंड इस्ट इंडीजच्या संरक्षणाच्या चिंतेपासून मुक्त होईल, तर त्याला ह्यापेक्षांहि त्या वसाहतींची जास्त भरभराट करतां येईल. आतांपर्यंतहि हालंडला त्या वसाहतींमुळें फारसा फायदा मिळालेला नाहीं. जर सर्व जगांत शांति स्थापन झाली आणि शस्त्रसंन्यासाचा उपक्रम अंमलांत आला, तर ईस्ट इंडीजची पुष्कळ उन्नति होईल आणि हालंडलाहि पुष्कळ फायदा होईल. तेथें ऊंस, चहा, कोको, कोळसा आणि जस्त यांची उत्पत्ति पुष्कळ होते. परंतु सैन्यावर फाजील खर्च करावा लागत असल्यानें इतकेंहि उत्पन्न पुरत नाहीं.

---

# सयामचें भक्षण.

गत महायुद्धांत जेव्हां सयामनेंहि जर्मनीबरोबर युद्ध जाहीर केलें, तेव्हां त्यानंतर कांहीं दिवसांनीं सयामवंशांतील एका राजपुत्रानें एका जर्मन विद्वानाजवळ आपल्या राष्ट्राच्या आकांक्षांविषयीं पुढीलप्रमाणें सांगितलें होतें. आह्मीं राष्ट्रीय स्वातंत्र्यालाच सर्वांत अधिक मोलवान समजतों आणि त्याकरितां आपलें सर्वस्व बलिदान करण्यास तयार आहों. आमच्या लोकांत राष्ट्रीय जागृति होऊन चुकली आहे. आह्मांला कोणत्याहि प्रकारें परकीयांच्या आधिपत्याखालीं रहाण्याची इच्छा नाहीं. आम्हीं एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याला योग्य झालों आहोंत. जर सर्व राष्ट्रें दुसऱ्याचें पूर्ण स्वातंत्र्य कबूल करणार नाहींत, तर सर्व राष्ट्रीय नियमाचें केव्हांहि चांगल्याप्रकारें पालन आणि संघटण

होणार नाहीं. आजकाल बलवान राष्ट्र आपल्याहून दुर्बल असलेल्या राष्ट्रावर हुकमत गाजवितें आणि आपणच त्या दुर्बल राष्ट्राकरितां कायदे निर्माण करतें आणि ह्याचें कारण तें असें सांगतें कीं, आपण तुझ्यापेक्षां जास्त सुधारलेलें आहे. पण हा निव्वळ बहाणा आहे. नैतिक आणि मानसिक गुणाचा कांहीं विचारहि केला जात नाहीं. खरी गोष्ट ह्याहून निराळी आहे. मोठमोठ्या राष्ट्रांना असा भ्रम होणें साहजीक आहे. कारण जर कोणत्याहि सशक्त मनुष्याला कोणी अशक्त मनुष्य दिसला, तर त्याला स्वाभाविकपणेंच वाटतें कीं, आपण शारीरिक दृष्टीनें ह्यापेक्षां श्रेष्ठ असल्यानें नैतिक दृष्टीनेंहि श्रेष्ठ असलोंच पाहिजे. ह्यावर त्या जर्मन मनुष्यानें विचारलें कीं, जर्मनीविषयींहि आपलें हेंच ह्मणणें आहे काय ? तेव्हां तो राजपुत्र हंसून ह्मणाला "आह्मीं जर्मनीविषयीं कांहीं विशेष माहिती जाणत नाहीं. आह्मीं तर एका सरळ गोष्टीकरितां युद्धांत सामील झालों. चीनप्रमाणें आह्मींहि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानचें अनुकरण केलें आहे. राष्ट्रपति विलसननें आपलीं चौदा तत्वें घोषित केलीं आणि सांगितलें कीं, अमेरिका याच तत्वांकरितां लढत राहिली आहे. त्या तत्वांचा फायदा घेण्याकरितांच आह्मींहि लढूं लागलों. जर आपणाला तहपरिषदेंत सामील होण्यास आह्मीं कां इच्छित होतों हें समजून घ्यावयाचें असेल तर सयामच्या गेल्या वीस वर्षांतील इतिहासाचें नीट निरीक्षण केलें पाहिजे. लेखकाला तो इतिहास समजून घेण्याची इच्छा होती. याकरितां त्यानें राजपुत्राचे आभार मानले आणि त्यानें जो इतिहास सांगितला तो या प्रकरणांत अनुवादीत केला आहे.

दक्षिण आशियाचे पूर्वेस सयाम हें एकच द्विपकल्प आहे कीं, ज्यानें युरोपियनांच्या आक्रमणापासून आपलें स्वातंत्र्य रक्षण केलें आहे. एका बाजूनें इंग्रज व दुसऱ्या बाजूनें फ्रान्स त्याला दटावीत होते. तरीहि त्यानें आपलें थोडेंबहुत राज्य स्वतंत्र ठेवलें आहे, त्याचें कारण त्याच्या आसपासचे प्रबल सत्ताधारी आपसांत द्वेष बाळगीत असतात हेंच होय,

१९०४ मध्यें फ्रेंच आणि इंग्रज ह्यांच्यामध्यें जो तह झाला होता, त्यांत सयामचा विस्तार जितका संकुचित करणें शक्य होतें तितका संकुचित करून टाकला होता, तरीहि पुन्हा त्याची स्वतंत्रता ह्याच कारणामुळें राहिली होती कीं, सयामची राजधानी बँकोक यावर कोणाचें आधिपत्य असावें ह्याविषयीं त्यांचें एकमत होत नव्हतें. फ्रान्स आणि ब्रिटन यांनीं आपलें वसाहतीक साम्राज्य वाढविण्याकरितां हा बहाणा केला होता कीं, आह्मीं ब्रह्मदेश, कांबोडिया आणि अनाम येथील लोकांना सयामच्या आधिपत्याखालून मुक्त करण्यास इच्छित आहोंत. गेल्या तीस वर्षांत सयामकडून त्याचा समुद्रकिनारा आणि चीन व मॅक्यांग येथील मोठें अरण्य हिरावून घेण्यांत आलें आहे. आपलें प्रस्तुतचें थोडेंसें राज्य रक्षण करण्याकरितां सयामला पुष्कळ लढावें लागलें आणि पुष्कळ आर्थिक हानी सोसूनहि आसपासचा पुष्कळ प्रदेश सोडून द्यावा लागला. सयाममध्यें इंग्रजांनीं आणि फ्रेंचांनीं ज्या ज्या कारवाया केल्या आहेत त्यायोगानें ह्या गोष्टीची माहिती कळून येते कीं, आशियांत युरोपियनांचें वासाहतिक धोरण कसें आहे? ज्या ज्या मुत्सद्यांनीं आणि सेनापतींनीं सयामचा मुलूख गिळंकृत केला होता, त्यांच्या मनांत कधीं न्याय आणि नीति ह्यांचा विचारहि शिवला नाहीं. त्यांनीं नेहमीं केवळ शारीरिक बलानेंच कार्य केलें होतें.

जोंपर्यंत फ्रान्सनें इंडोचायनाच्या आंतील प्रदेशांत प्रवेश करण्यास आरंभ केला नव्हता, तोंपर्यंत सयाम आणि फ्रान्स यांमध्यें खूप मैत्री होती. जेव्हां कांबोडिया, अनाम आणि टांगकींगमध्यें फ्रेंचांना खूप राज्याधिकार प्राप्त झाले, तेव्हां ज्या खाणी व जंगलें आपणांस लाभावीं असें ते इच्छित होते त्या सर्व खाणी व जंगलें त्यांस मिळालीं. जेव्हां जेव्हां सयाम ह्या अधिकाऱ्यांस अडथळा करी तेव्हां तेव्हां फ्रान्स असें सांगत असे कीं, आह्मीं पूर्वींच हा प्रदेश जिंकला आहे; ह्मणून यावर आमचा अधिकार आहे; परंतु सयामला हा त्याचा अधिकार कबूल

नव्हता. यावर एका फ्रेंच आरमारानें बँकोकला वेढा घातला आणि गोळीबाराची धमकी देऊन सयामला एका तहावर सही करण्यास भाग पाडलें. आपणाला पाहिजे त्या अटी ठरविण्यास फ्रान्स इच्छित होता. नाइलाजानें सयामला त्याच्या पुढें मान वांकविणें भाग पडलें. ३ अक्टोबर १८९३ रोजीं जो तह झाला, त्यांतील सातवी अट अशी होती. "आपल्या प्रजेच्या रक्षणाकरितां जेथें जेथें वकील ठेवणें फ्रान्सला आवश्यक वाटेल तेथें तेथें त्याला आपले वकील ठेवतां येतील;" आतांपर्यंत केवळ बँकोक येथेंच फ्रेंच वकील रहात असे. सयाममध्यें युरोपियनांना असे कांहीं विशेष अधिकार मिळाले होते कीं, त्या योगानें बँकोकमध्यें राहणारे त्यांचे वकील आपापल्या लोकांचे खटले आपणच चालवीत असत. आशियाटिक आणि युरोपियन यांचे कायदे, धर्म आणि रीतिरिवाज यांत पुष्कळ अंतर होतें. याकरितां तेथें वसाहत करणाऱ्या विदेशी व्यापाऱ्यादिकांना सवलत ह्मणून तेथील वकीलामार्फत खटले चालविण्याचा अधिकार मिळाला होता. एशियाटिक राजांना हे अधिकार परकीयांस बहाल करण्यांत विशेष कांहीं वाटत नसे कारण या योगानें त्यांचा व्यापार सर्व जगाशीं चालत असे; पण जेव्हां दूर असलेल्या पूर्वेकडे फ्रान्सच्या वसाहति वाढूं लागल्या, तेव्हां तो या आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं लागला. सयाममध्यें वसाहत करणाऱ्या आपल्या चीनी प्रजेच्या बाबतींतहि त्या अधिकारांची अंमलबजावणी करण्याची फ्रान्सची इच्छा दिसूं लागली. फ्रेंच लोक त्या चिनी लोकांना सांगत असत कीं, तुह्मी आमच्या वकीलाच्या दप्तरांत नांवें नोंदा. या योगानें तुह्मालाहि फ्रेंच लोकांचे अधिकार प्राप्त होतील. परंतु चिनी लोक युरोपियन नसल्यामुळें त्यांना सयामचे कायदे मान्य करण्यास कांहीं हरकत नव्हती. ह्यामुळें फ्रान्स आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहे असें सयामनें त्याला निक्षून सांगितलें. हा दुरुपयोग करण्यांत फ्रान्सचा उद्देश असा होता कीं, सयामचा अधिकार कमी व्हावा आणि त्यायोगानें

त्याच्यावर आपली सत्ता स्थापन करतां यावी. १८९३ मध्यें फ्रान्सच्या संरक्षणाखालीं राहणाऱ्या लोकांची संख्या केवळ दोनशें होती; परंतु तीन वर्षांतच ती एकदम वाढून तीस हजार झाली आणि त्या तीस हजारांत फ्रेंचांच्या वीस पट चिनी लोकांची संख्या होती.

जेव्हां फ्रान्स आपल्या संरक्षणाखालीं सयामला आणूं पाहत आहे ही गोष्ट सर्वतोमुखीं झाली. तेव्हां सयामनें घोषित केलें कीं, एशियाटिकांना आपल्या संरक्षणाखालीं आणण्याचा फ्रान्सला कांहीं अधिकार नाहीं. त्यावर फ्रान्सनें उत्तर दिलें कीं, आमच्या वसाहतींतील लोकांना फ्रेंचांचे अधिकार स्वयं प्राप्त आहेत. यामुळें सयामनें आपल्या देशाकरितां नवे कायदे निर्माण करण्यास आरंभ केला आणि त्यांच्या अंमलबजावणी-करितां इंग्रजांचें सहाय्य मागितलें. इंग्रज लोक पहिल्यापासून सयामच्या कारभारांत ढवळाढवळ करण्यास संधीच पाहत होते. त्यांना फ्रान्सचें कृत्य आवडत नसे. ह्मणून लंडनमध्यें राहणाऱ्या सयामी वकीलामार्फत ग्रेट ब्रिटन आणि सयाम यांमध्यें १८९९ सालीं एक तह झाला, त्या योगानें इंग्लंड आणि सयाम यांच्यामधील संबंध निश्चित झाले. त्यावेळीं फ्रान्सहि इंग्लंडशीं मैत्री करण्यास इच्छित होता. ह्मणून सयाममध्यें राहणाऱ्या त्यावेळच्या फ्रेंच वकीलानेंहि आपल्या अधिकारांत परिवर्तन करण्याकरितां सयामशीं नूतन तह करण्याचें योजिलें; पण फ्रेंच सरकारनें त्याला मान्यता दिली नाहीं. यामुळें फ्रेंच लोकांच्या अधिकारांत कांहीं परिवर्तन होऊं शकलें नाहीं.

ह्यामध्यें फ्रेंच लोकांसंबंधीं असंतोषाच्या कांहीं नवीन गोष्टी उत्पन्न झाल्या. १८९३ सालच्या तहास अनुसरून सयामचें जें कांहीं कर्तव्य होतें, तें त्यानें पूर्णपणें पालन केलें होतें; परंतु फ्रान्सनें मात्र आपल्या अटींचें बरोबर पालन केलें नाहीं. १९०१ सालीं सयामनें फ्रान्सला कळविलें कीं, पूर्वीं ठरल्याप्रमाणें फ्रान्सनें कांहीं विशिष्ट प्रदेश खालीं करावे; परंतु ते अधिकार सोडून देण्याचें तर दूरच राहिलें आणि फ्रान्स आणखीहि नवे

अधिकार मागूं लागला व सयाम सरकारनें फ्रेंच लोकांना आपल्या राज्यांत नोकऱ्या दिल्या पाहिजेत असें ह्मणूं लागला. अक्टोबर १९०२ मध्यें सयामशीं तह करण्याच्या मिषानें फ्रान्स आणखीहि कांहीं अधिकार मिळविण्यास इच्छित होता; परंतु ते अधिकार फारसे जास्त नव्हते. फ्रान्सनें त्यावेळीं फारच जास्त अधिकार प्राप्त करून घेण्याकरितां अधिक जोर दिला नाहीं. त्याचें कारण असें होतें कीं, तो ब्रिटनशीं युद्ध करण्यास इच्छित नव्हता आणि याकरिताच संपूर्ण सयामला आपल्या संरक्षणाखालीं आणण्याचा विचार त्यानें रहित केला. परंतु तेथील वसाहतीक सरकारला फ्रान्सची ही वर्तणूक पसंत नव्हती. त्याच्या मनांत सयामवर आपला पूर्ण ताबा असावा असें होतें. याकरितां स० १९०३ मध्यें पुन्हां सयामनें इंग्रजांचें सहाय्य मागितलें. यावेळीं इंग्रज सयामशीं फारच गोड बोलले. यांत इंग्रजांचा असा स्वार्थ होता कीं, ते स्वतः पश्चिम आणि दक्षिण सयाममध्यें हातपाय पसरीत होते आणि फ्रान्सशीं असलेला सयामचा लढा मिटवूं इच्छित होते. १९०४ मध्यें इंग्रज आणि फ्रेंच ह्या दोन राष्ट्रांत एक तहनामा झाला आणि त्यास अनुसरून जगांतील त्यांच्या भांडणाचा उपशम झाला. त्याच तहानें सयामचा प्रश्नहि विल्हेवाटीस लागला. ह्या तहाच्या वेळीं इजिप्त आणि मोरोक्कोप्रमाणें सयामचीहि अनुमति घेण्यांत आली नव्हती. जेव्हां दोघे बलवान् मिळून कोणत्याहि देशाच्या भाग्याचा निर्णय करितात तेव्हां त्या अभागी दुर्बल देशाची अनुमति घेण्याची काय आवश्यकता आहे? दोघांचेंहि आपल्या राजकीय आणि आर्थिक स्वार्थावर लक्ष होतें. त्यांनीं आपसांत ठराव केला कीं, पूर्वेकडून फ्रान्सनें आणि पश्चिमेकडून इंग्लंडनें सयामची पाहिजे तशी गळचेपी करावी. कोणी कोणाच्या आड येऊं नये.

या तहावर सह्या होण्याच्या पूर्वीं जेव्हां सर्व बोलणेंचालणें झालें आणि आतां पूर्वेकडून इंग्लंड आड येणें शक्य नाहीं, असें जेव्हां

फ्रान्सला वाटलें; तेव्हां १३ फेब्रुवारी १९०४ रोजीं फ्रान्सला दटावून त्यानें एक तह करण्यास भाग पाडलें आणि त्या तहांत सयामला जितका खच्ची करणें शक्य होतें तितकें खच्ची केलें. त्यानें आठ हजार चौरस मैल भूमि घेतली. एक बंदरहि घेतलें. सयामच्या स्वतंत्र राज्यांत रेल्वे बांधण्याचा हक्क घेतला व आणखीहि कित्येक अधिकार आपणाकडे घेतले; परंतु मजा ही कीं, यावरही फ्रान्स संतुष्ट झाला नाहीं. त्याला सयामवर आपला पूर्णपणें अधिकार असावा असें वाटत होतें. यानंतर जेव्हां त्याला समजून आलें कीं, संपूर्ण सयामवर अधिसत्ता स्थापन केल्यास इंग्लंड आड येईल; तेव्हां तो थोडा दबला; पण निव्वळ गप्प राहिला नाहीं. तो अपहरणाच्या पराकाष्टेस जाऊन थांबला. १९०७ मध्यें फ्रान्सनें पुन्हां एक नवा तह सयामला सादर केला आणि त्याला सांगितलें कीं, मुळींच वादविवाद न करितां हा तह तुला मान्य केला पाहिजे. १९०४ च्या तहान्वयें सयाम पूर्णपणें खच्ची झालाच होता, त्या वेळीं नाईलाजानें महत्वाची भूमि आणि बंदर त्यास सोडावें लागलें होतें. यावेळीं आणखी बारा हजार चौरस मैल भूमि फ्रान्सला अर्पण करणें त्याला भाग पडलें. या भूमीचा मोबदला म्हणून त्याला पूर्वीं गेलेलें आपलें बंदर परत मिळालें आणि दहा वर्षांनंतर आपल्या देशांत वास करण्याचा एशियाटिक लोकांचा न्यायहि सयामनें करावा असें त्या तहान्वयें ठरलें.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत ब्रिटनशीं संबंध जोडल्यानें सयामचा कांहीं लाभ झाला होता आणि फ्रेंचांची कांहीं हानी झाली होती. त्यावेळीं इंग्रजांनीं कांहीं औदार्य आणि न्यायप्रियता दाखविली होती आणि सयामला फ्रान्सच्या पंजांतून सोडविलें होतें; परंतु त्यानें हें कृत्य कांहीं सयामच्या हिताच्या दृष्टीनें केलें नव्हतें. इंग्रजांनीं सयामच्या अधिकाराचें रक्षण करून स्वतः फारच मोठा फायदा करून घेतला. पुष्कळ दिवसांपासून इंग्रज लोक मलाया द्वीपकल्पावर अधिकार

करण्याकरितां गुपचुपपणें उत्तरेकडून पुढें सरत होते. या भूमिवर कदा-चित् फ्रान्स आपली सत्ता स्थापन करील अशी त्यांना भीति होती; पण जेव्हां १९०४ मध्यें इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यामध्यें तह झाला तेव्हां इंग्रज लोक सयामचे चार मांडलिक राजे आपलेच समजूं लागले; पण हा अनुचित स्वार्थ सयामला कसा चांगला वाटावा ? ह्मणून तेथें पुन्हां " जो बळी तो कान पिळी " न्याय सुरू झाला आणि मार्च१९०९मध्यें इंग्रजांनीं या चारी संस्थांनावर आपला पूर्ण अधिकार स्थापन केला. या वेळीं पुन्हां सयामच्या हातून पंधरा हजार चौरस मैल भूमि हिरावून घेण्यांत आली आणि समुद्र किनाऱ्यावर दक्षिण बाजूनें त्याचा थोडा संबंध राहिला. यांत सयामला इतकाच लाभ झाला कीं, परकीय लोकांचा न्याय करण्याचे जे हक्क इंग्रजांनीं उपटले होते, त्यांपैकीं थोडे परत करण्यांत आले.

जेव्हां हे लोक सयामला ह्याप्रकारें टोंचटोंचून खाऊं लागले. तेव्हां सयामहि नव्या युरोपियन पद्धतीनें आपल्या देशाची सुधारणा कर-ण्याच्या उद्योगास लागला. जेव्हां फ्रान्सनें त्याची भूमि गिळंकृत करण्यास आरंभ केला, तेव्हां अनेक प्रकारांनीं आपल्या देशाची उन्नति करण्यास, राजपद्धतींत नव्या सुधारणा करण्यास त्यानें पुष्कळ धन खर्ची घातलें. त्यानें दोन नव्या रेल्वे इंग्रज मक्तेदारांकडून तयार करून घेतल्या; पण फ्रान्सनें त्या खर्चाकरितां प्रजेवर नवीन कर मुळींच बस-विला नाहीं. सर्व पैसा आपल्या खजिन्यांतूनच दिला. त्याला कांहीं कर्ज नव्हतें आणि त्यानें १८९६ पेक्षां १९०४ मध्यें आपली पुष्कळ भरभराट केली होती आणि रेल्वे बांधल्यावरहि खजिन्यांत पुष्कळ रक्कम शिल्लक होती. जरी क्रीडागृहांपासून पूर्वी त्याला पुष्कळ उत्पन्न येत असे तरी त्यानें आपल्या देशांतील सर्व जुवेबाजी बंद केली. १९०४ नंतर त्यानें सुमारें पंधरा कोटी रुपये कर्ज घेतलें होतें, त्यांतल्या चार कोटी रुपयांची फेड करण्यांत आली आहे. आतां तेथें रेल्वे, तार,

कॉलेजें, विद्यालयें इत्यादि कमी नाहींत आणि एक विश्वविद्यालयही स्थापन झालें आहे. त्यानें युरोपियन आणि अमेरिकन तज्ज्ञांकडून आपल्या देशाचा पुष्कळ फायदा करून घेतला आहे. नाईलाज होऊन त्यानें आपले अनेक प्रांत जरी दुसऱ्यांना दिले आहेत तरी आपल्या राहिलेल्या देशांत कोणालाहि हात घालूं दिलेला नाहीं आणि आपल्या देशांतील कृषि आणि व्यापार यांची खूप उन्नति केली आहे. लष्क-रांतहि त्यानें थोडीबहुत सुधारणा केली आहे आणि फ्रेंच लोकांची राजकीय नीति जर अत्यंत अश्लाघ्य नसती तर यापेक्षांहि त्यानें जास्त उन्नति केली असती.

सन १९०० च्या पूर्वीं सयामचा चार पंचमांश व्यापार इंग्रजांच्या हातीं होता; पण यानंतर तो हळुहळु जर्मनीकडे जाऊं लागला. युद्धापूर्वीं तेथील बहुतेक सर्व व्यापार जर्मनीच्या हातांत गेला होता आणि तेथील बँका आणि रेल्वे यांवरहि त्याचा अधिकार झाला होता. ह्याचें कारण असें होतें कीं, जर्मन लोक सयामी लोकांना प्रत्येक बाबतींत सहाय्य करीत असत आणि त्यांच्या सुखदुःखांत भागीदारी घेत; परंतु युद्ध सुरू झाल्यावर सयामांत रहाणाऱ्या जर्मनांनीं इंग्लंडविरुद्ध हिंदुस्थानांत वगैरे क्रांति करण्याचा उद्योग सुरू केला. या आणि फ्रान्स व इंग्लंडच्या जबरदस्तीमुळें जुलै १९१७ मध्यें सयामनें जर्मनीशीं युद्ध जाहीर केलें. आतां जर्मनीचे तेथे हितसंबंध नाहींत. आतां फ्रान्स आणि इंग्लंड यांचा समज आहे कीं, सयामशीं आपण जो अनुचित व्यवहार केला होता तो सयाम विसरून गेला आहे; परंतु ही त्या लोकांची फार मोठी चूक आहे. ज्यावेळीं सयाम अनेक उपायांनीं आपल्या देशाची उन्नति करीत राहिला होता, तेव्हां तो आपल्या देशाची योग्य व्यवस्था ठेवीत नाहीं, या सबबीवर त्याची भूमि गिळंकृत करण्याचा ह्या राष्ट्रांस कोणताच हक्क नव्हता, पण काय करणार ? ही युरोपियन सुधारणाच अशी आहे कीं, ती दुसऱ्यांना सुधारण्याच्या मिषानें त्यांचे सर्वस्व हिरावून घेते.

फ्रान्सनें सयामच्या भावनांचा मुळींच विचार न करतां त्याचा पुष्कळसा प्रदेश छिनावून घेतला आहे. ह्मणून सयाम त्याचें भयंकर शत्रुत्व करितो. फ्रान्स तेथें आपले पाय पक्के रोवण्यास पाहत आहे; पण असा दिवस लवकर उजाडेल कीं, तेथून त्याला आपलें चंबुगवाळें आटोपून परत निघावें लागेल. जर तो आपल्या आपण तेथून न जाईल तर सयाम त्याला कोणत्या ना कोणत्या तरी उपायानें हांकलून लावील; पण इंग्रजांची गोष्ट वेगळी आहे;तथापि जेव्हां आशियाटिक आणि युरोपियन यांचें भावी युद्ध सुरू होईल, तेव्हां सयाम कोणत्याहि युरोपियनला आपला मित्र समजणार नाहीं. तहपरिषदेंत सयामचें ह्मणणें असें होतें कीं, आमच्या जुन्या तहाची सुधारणा करावी. ही सुधारणा दोन तऱ्हेची होती. सयामांत कोणत्याहि प्रकारचें न्यायाचें कार्य विदेशी लोकांच्या हातांत राहूं नये कारण त्यांत सयामचा अपमान आहे. यायोगानें खर्च फार येतो, देशांत वैमनस्य वाढतें, या योगानें अन्याय होतो यामुळें ही पद्धति निरर्थक आहे. दुसरी सयामची मागणी अशी होती कीं, सयामला पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य असावें. कारण यामुळें आपल्या सत्तेस अडथळा येतो, आमचें उत्पन्न कमी होतें. त्या योगानें धूम्रपानगृहें आणि क्रीडागृहें यांच्या उत्पन्नाकडे आम्हास दुर्लक्ष करतां येत नाहीं आणि आमच्या उन्नतीस अडथळा येतो. त्याचें ह्मणणें जरी योग्य, न्याय्य व उचित होतें तरी व्हर्सेलीसच्या तहानें इतकेंच निश्चित् झालें कीं, सयामांत आतां जर्मनीचा कोणत्याहि प्रकारचा हक्क राहूं नये. परंतु विजयी राष्ट्रें आपण गिळंकृत केलेले कोणतेहि अधिकार परत करण्यास तयार नाहींत. कारण आपल्या हातांत गवसलेली शिकार दुसऱ्याला देणें त्यांना मुळींच पसंत नाहीं.

# आशियांत फ्रान्स.

सोळाव्या आणि सतराव्या शतकांत स्पेन, पोर्तुगाल, हालंड आणि इंग्लंड यांच्याबरोबर वसाहतीच्या उत्कर्षासंबंधीं फरान्सची पुष्कळ स्पर्धा चालत असे आणि त्याला अनेक वसाहतीहि मिळाल्या होत्या; पण अठराव्या शतकांत नेपोलियनच्या युद्धामुळें त्याच्या हातांतील बहुतेक सर्व वसाहती इंग्रजांच्या हातांत गेल्या. आशियामध्यें हिंदुस्थानांतील दोन चार स्थळें सोडून त्याच्याजवळ कोणतीच भूमि राहिली नव्हती आणि हीच स्थिति अमेरिकेंत आणि आफ्रिकेंतहि होती; परंतु १८३० नंतर फ्रान्सनें वसाहति वाढविण्याचा आपला उद्योग पुन्हां सुरू केला. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानचे पांचवे अध्यक्ष जेम्स मनरो यानें असें तत्व ठरविलें होतें कीं, अमेरिकेनें युरोपच्या कोणत्याहि गोष्टींत हात घालूं नये आणि युरोप आदि अन्य देशांनीहि अमेरिकेच्या भानगडींत पडूं नये. यामुळें कोणत्याहि परकीय लोकांना संयुक्त संस्थानांत वसाहत स्थापन करणें बंद झालें. नाईलाज होऊन फरान्सनें आशिया आणि आफ्रिका येथें चंचुप्रवेश करण्यास सुरुवात केली आणि नेपोलियननंतर शंभर वर्षांच्या आंतच त्यानें इतक्या वसाहति मिळविल्या कीं, तितक्या इंग्लंडखेरीजकरून इतर कोणाच्याहि नाहींत. ह्या सर्व वसाहति १८७० च्या फ्रॅंकोजर्मन युद्धापूर्वींच मिळविल्या होत्या. जर त्यावेळीं जर्मनीला इच्छा असती तर त्याला फरान्सच्या कित्येक वसाहति आपल्या सत्तेखालीं आणतां आल्या असत्या; परंतु बिस्मार्कला वसाहतींची आवश्यकता वाटत नव्हती. जर्मनीनें या शतकाच्या आरंभींच वसाहति मिळविण्यास सुरवात केली होती.

भारतवर्षांत निरनिराळ्या ठिकाणीं फरान्सच्या पांच लहान लहान वसाहति आहेत. त्यांचें क्षेत्रफळ दोन हजार चौरस मैल आहे आणि

त्यांची लोकसंख्या सुमारें तीन लाख आहे. मलबारच्या किनाऱ्यावर माही, मद्रासजवळ कारीकल, पॉंडिचरी आणि यनाऊ व कलकत्त्याजवळ चंद्रनगर नावाचा एक लहान कसबा इतकीच भूमि फरान्सच्या हातांत आहे. या सर्वांचा राज्यकारभार पांडिचरीहून हांकला जातो. फरान्सनें हे सर्व प्रांत आपणास द्यावे आणि त्याच्या बदला अन्य देशांत भूमि घ्यावी असें इंग्लंडनें पुष्कळ वेळां बोलणें लावलें होतें; पण फ्रान्स मुळींच कबूल झाला नाहीं. कारण हीं ठिकाणें एक प्रकारें त्याच्या प्राचीन इतिहासाचीं स्मृतिचिन्हें आहेत. या शिवाय या वसाहतींत वास करणारे लोक इंग्रजांच्या आधिपत्याखालीं जाण्यास कबूल नाहींत. जेव्हां जेव्हां ह्यासंबंधीं बोलणें सुरू होतें तेव्हां तेव्हां हे लोक त्यास विरोध करतात. याचें कारण असें आहे कीं, तेथील लोकांना स्वराज्याचे पुष्कळ हक्क मिळाले आहेत. ब्रिटिश अंमलाखालीं आल्यास त्यांना पूर्ण गुलामगिरींत पडावें लागेल.

तिसऱ्या नेपोलियनच्या वेळीं फ्रान्सनें चीन आणि कांबोडिया यांमध्यें कांहीं अधिकार मिळविले होते. १८७० सालीं जर्मनीपासून पराभव पावल्यानंतर त्यानें रशियाच्या वायव्येस आपल्या वसाहति स्थापन करण्याचा विचार केला आणि कोचीन-चीनपासून पूर्व कांबोडियापर्यंत आपला अंमल स्थापित केला. १८८४ मध्यें अनाम आणि टॉंगकींग प्रांत त्यानें आपल्या संरक्षणाखालीं आणले आणि तेव्हांपासून तो सारखा पुढें जात आहे. १८९३ मध्यें त्यानें सयामकडून लाओसपासून कांबोडियापर्यंतचा सर्व समुद्रकिनारा आपल्या ताब्यांत घेतला. सयाम आणि इंडोचायना यांची स्वाभाविक सीमा मेकांग नदी ही आहे; परंतु फ्रान्सनें त्याच्यापासून सर्व कांबोडिया आणि आणखीहि कांहीं प्रांत हिसकावून घेतले. ज्या तऱ्हेनें अन्य युरोपियन लोक आपल्या वसाहति वाढवितात, तीच तऱ्हा फ्रान्सनेंहि अंमलांत आणिली. जेव्हां अनाम, कांबोडिया आणि सयाममधील लोकांनीं फ्रान्सच्या या लुटीला

विरोध केला, तेव्हां त्यांस बंडखोर ठरविण्यांत येऊन ठार करण्यांत आलें. याचें मुख्य कारण ते गोरे नसून काळे होते हेंच होय. फ्रान्सनें त्या लोकांची कितीहि सुधारणा केली, तरी त्यांचें जें स्वातंत्र्य हिरावून घेतलें त्याची निष्कृति होऊं शकत नाहीं. ह्या देशांत फ्रान्सनें जी सुधारणा केली आहे, त्याचे त्याला पुष्कळ फायदे मिळत आहेत आणि पुढेंहि जास्त प्रमाणांत मिळण्याचा संभव आहे. त्याशिवाय त्या वसाहतींतून त्याला पुष्कळ लष्करी साहाय्यहि मिळतें. तेथील एका प्रांतांतील सैन्याकडून दुसरे प्रांतहि तो आपल्या आधिपत्याखालीं आणीत आहे. एका प्रांतांतील गुलाम लोक आपल्या शेजारच्या प्रांतांतील लोकांना गुलाम बनविण्याकरितां फ्रेंचांना महत्वाची मदत करितात. गेल्या महायुद्धांत इंग्रजांनीं ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतून ऐन वेळीं आपल्या मदतीकरितां फौज नेली होती, त्याचप्रमाणें फ्रान्सनेंहि आपल्या अंकित प्रदेशांतून फौज नेली होती. कांहीं वेळां तर अशी स्थिति दिसून आली कीं, ह्या देशांच्या रक्षणाकरितां फ्रेंच सैनिक पाठविण्यांत आले आणि तद्देशीय सैन्य युरोपांत बोलावण्यांत आलें. त्याचें कारण असें आहे कीं, फ्रेंचांचा तद्देशीय सैन्यावर विश्वास नव्हता; परंतु त्याच्या मदतीशिवाय गत्यंतर नव्हतें, ह्मणूनच त्यांना युद्धभूमिवर उभें करण्यांत आलें.

कसेंहि जरी असलें तरी यांत संदेह नाहीं कीं, कांबोडिया, अनाम आणि टांगकिंग येथील रहिवाशांनीं कधींहि फ्रेंचांचें आधिपत्य स्वीकारलें नाहीं. आमची अशी खात्री आहे कीं, आपण होऊन कोणीहि पारतंत्र्य कबूल करणार नाहीं. मग आशियाटिकच त्याला अपवाद कसे असतील? फ्रेंच लोक आपल्या वसाहतींतून सैन्य निर्माण करितात, त्या फौजेच्या मनांत राज्यकर्त्यांविषयीं प्रेम उत्पन्न करितात; परंतु हें प्रेम आणि भक्ति थोड्याशा तरुण सैनिकांमध्येंच असते. तेथील सामान्य जनतेंत आपल्या परकीय राज्यकर्त्यांविषयीं प्रेम उत्पन्न होऊं शकत नाहीं. याला एक कारण आहे तें हेंच कीं, बहुतकरून फ्रान्समधील उच्च कुलीन

आणि प्रतिष्ठित फ्रेंच लोक आपल्या वसाहतींतील सिविलसर्विसमध्यें जात नाहींत. जे वसाहतींत जातात ते कनिष्ठ दर्जाचे लोक जातात. आपल्या वसाहतींत नोकरीस जाणें ह्मणजे एकप्रकारची शिक्षा आहे, असें फ्रेंच लोक समजतात. इंग्रज लोक आपल्या वसाहतींतील नोकऱ्या प्रतिष्ठित समजतात आणि तेथें जाण्यास घाबरत नाहींत. तसें फ्रेंचांचें नसतें. याच कारणामुळें फरान्सची इंडो चायनामधील राज्यपद्धति तितकी संतोषजनक नाहीं. तेथें रहाणारे फ्रेंच लोकहि या पद्धतिविषयीं कुरकुर करतात. कारण सर्वांबरोबर त्यांनाहि त्रास भोगावे लागतात. तेथील फ्रेंच राज्यकर्ते आपल्या प्रजेची भाषा आणत नाहींत आणि त्यांच्याविषयीं सहानुभूतीहि बाळगीत नाहींत. या कारणामुळें राज्यकर्त्यां-विषयीं जनसमाजांत अप्रियता वास करीत आहे.

अनाम आणि टांगकिंगमधील लोक स्वराज्याकरितां प्रयत्न करीत आहेत. कारण फ्रेंच लोक त्यांच्यावर मन मानेल तसे कर लादीत आहेत आणि त्यांना दुसऱ्या देशांशी व्यापार करूं देत नाहींत. सारांश तेथें फ्रेंचांनी मन मानेल तसें लुटण्याचें धोरण स्वीकारलें आहे. तेथील लोक सैन्यांत भरती होण्यास किंवा कर देण्यास तयार नाहींत. कारण तेथील खाणी आणि अरण्यें ह्यांच्या योगानें केवळ फ्रेंच लोकांचाच फायदा होतो. तद्देशीयांना त्याचा कांहीं वांटा मिळत नाहीं. जपाननें रशियावर विजय मिळवून आशियाटिकांत नवचैतन्याचा संचार केल्यापासून तेथील जनता जागृत झाली आहे. १९०८ मध्यें क्रांतिकारक चळवळी-मुळें फरान्सला आपलें सैन्य वाढवावें लागलें होतें आणि १९१० मध्यें पुष्कळ खटाटोप करून पुष्कळ क्रांतिकारकांना देशांतून हद्दपार करणें फरान्सला भाग पडलें. एप्रिल १९१३ मध्यें तेथील अनाम नगरांत अधि-काऱ्यांत एक बॉंब फेंकण्यांत आला होता. त्या योगानें दोन फ्रेंच आणि कांहीं युरोपियन मरण पावले. खटला झाल्यावर कळून आलें कीं, फ्रेंचांची सत्ता झुगारून देण्याकरितां एक कटहि करण्यांत आला होता.

इंडो चायनाच्या फ्रेंच राज्यकारभाराला सर्वांत लांछनास्पद जर कोणती गोष्ट असेल, तर तेथील रहिवाशांच्या शिक्षणाची कांहीं संतोषजनक व्यवस्था फ्रेंचांनी केलेली नाहीं. जरी तेथें आज पंचेचाळीस वर्षें फ्रेंचांचें राज्य आहे, तथापि तेथें केवळ आठ हजार विद्यार्थ्यांच्याच शिक्षणाची व्यवस्था आहे. कांबोडियामध्यें चार हजारांहून कमी आणि अनाममध्यें साडेतीन हजार विद्यार्थी प्रस्तुतकालीं शिक्षण घेत आहेत; परंतु यांत फरान्सचा दोष आहे. इंडोचायनामध्यें राज्य करणाऱ्या फ्रेंच लोकांचा नाहीं. तेथील फ्रेंच अधिकारी सारखी शिक्षणवर्धनाबद्दल खटपट करीत आहेत; परंतु फ्रेंच पार्लमेंट त्याची दादहि घेत नाहीं. तेथील विद्यार्थ्यांना फरान्समधील विद्यापीठांत शिक्षण घेण्याची सवलत आहे; पण अतिशय लांब पल्ल्यामुळें आणि खर्चाच्या अतोनात बाबीमुळें इंडो चायनांतील विद्यार्थी फरान्समध्यें फारसे जात नाहींत. कांहीं दिवसांपूर्वीं तेथील रहिवाशांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा देण्यास फ्रेंचांनीं सुरवात केली आहे.

जर इंडोचायनाला लवकरच स्वराज्य मिळालें नाहीं आणि साम्राज्यवादाचें भूत अन्य युरोपियन राष्ट्रांप्रमाणें फरान्सच्या अंगात संचरूं लागेल तर जपान पुढें सरून फरान्सला तेथून हांकलून देईल, असा बराच संभव आहे. कदाचित् अनाम आणि टांगाकिंग चीनी लोकसत्तेंत सामील होतील किंवा स्वतंत्र रहातील आणि तसें झाल्यास लाओस टांगकींगच्या हातांत जाईल. फरान्सचा तेथें कांहीं उपाय चालणार नाहीं.

---

## मलायाचें भक्षण.

आशियाखंडाच्या दक्षिणेस जें मलाया द्वीपकल्प आहे तें भौगोलिक दृष्टीनें इस्ट इंडीज द्वीपांतर्गच समजण्यांत येतें. इस्ट इंडीज बेटांपैकीं सर्व प्रदेशांतील लोक डचांच्या आधिपत्याखालीं राहत असत व

त्या स्थितींत ते खुषी होते. दुसऱ्या अनेक ठिकाणांप्रमाणें तेथेंहि इंग्रज लोक समुद्रांतील मार्गावर आधिपत्य मिळविण्याकरितां अविरत परिश्रम करीत होते आणि आतां मलाया द्वीपकल्प इंग्रजांच्या ताब्यांत आल्यानें त्या परिश्रमाचें सार्थक झालें आहे. ब्रह्मदेशच्या दक्षिणेकडून जाऊन पश्चिम किनाऱ्यावरील सयाम देशावर आपला अधिकार त्यांनीं स्थापन केला आहे. यामुळें उत्तर व दक्षिण दोन्हींहि द्वीपकल्पांवर इंग्रजांची सत्ता स्थापन झाली आहे, आणि मधला थोडासा प्रदेश सयाम देशच्या राजाच्या ताब्यांत आहे. याशिवाय दक्षिणेकडे बोर्निओ बेटाच्या उत्तर भागावर व बोर्नियोजवळ असलेल्या चिनी समुद्राच्या किनाऱ्यावरहि इंग्रजांचाच अधिकार आहे.

मलाया द्वीपकल्पाच्या शेवटच्या टोंकास सिंगापूर नांवांचा लहानसा प्रदेश आहे. या द्वीपकल्पाच्या दुसऱ्या टोंकास पेनांग प्रदेश आहे. ब्रिटिश उत्तर बोर्नियोजवळ चिनी समुद्रांत लाबुआन प्रदेश आहे. हिंदुस्थानाहून हॉंगकॉंगला समुद्रावरून जी तारायंत्राची योजना केली आहे ती ह्या तिन्ही प्रदेशांतून जाते व हे तिन्ही प्रदेश इंग्रजांच्या ताब्यांत आहेत. हे तीनहि प्रदेश आणि मलाया द्वीपकल्पाचा दक्षिण भाग हे चारहि प्रांत मिळून स्ट्रेट्स सेटलमेंटस वसाहत बनविली आहे. पूर्वी हे चारहि प्रांत हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांत होते; पण १८६७ मध्यें हे प्रत्यक्ष ग्रेटब्रिटनच्या ताब्यांत देण्यांत आले. या प्रदेशावर पूर्वी तेथील राजांचा अधिकार होता; पण नंतर इंग्रजांनीं त्यांना पेनशन देऊन घरीं बसविलें व हे सर्व प्रांत खालसा केले. सध्यां या वसाहतींत तेथील मुळचे रहिवाशी मलाई लोक फारच कमी आहेत. तेथें कांहीं चिनी व कांहीं हिंदी लोक जाऊन राहिले आहेत. ह्या वसाहती आसपासच्या सर्व टापूंच्या बाजारासारख्या आहेत. येथूनच सर्व व्यापार जात व येत असतो. आशियांतील या भागांत इंग्रजांचे जितके प्रदेश आहेत त्या सर्वांचा कारभार सिंगापूर येथून होत असतो. तेथें एक

गव्हरनर असतो तोच मलाया द्वीपकल्पाचा हाय कमिशनर असून उत्तर बोर्नियोतील पोलिटिकल एजंटहि तोच आहे.

स० १९११ पासून ह्या वसाहतींत सुमारें २ लाख इंग्रजांनीं जावून वस्ती केली आहे. वसाहतीपासून इंग्रजांना किती फायदा मिळत असतो त्याचें ही वसाहत हें एक प्रत्यक्ष प्रमाण आहे. १९१६ मध्यें युद्धाला सहाय्य ह्मणून ह्या वसाहतीनें १२ कोटी रुपये मंजूर केले होते. अक्टोबर १९१४ मध्यें हिंदुस्थानांत धुमाकूळ उडविलेलें जर्मनीचें एमडेन क्रुझर पहिल्याप्रथम पेनांग येथें प्रकट झालें होतें आणि तेथें त्यानें एक रशियन व एक फ्रेंच जहाज बुडविलें होतें. फेब्रुवारी १९१५ मध्यें सिंगापूर येथील कांहीं हिंदी शिपायांनीं बंड करून आपल्या वरिष्ट लष्करी अधिकाऱ्यांना मारून टाकिलें होतें. यावेळीं फ्रेंच, रशियन व जपानी जहाजें इंग्रजी आरमाराच्या मदतीस जावून त्यांनीं तें बंड शांत केलें. कांहीं बंडवाले रानांत जावून लपून राहिले होते. रानटी लोकांच्या मदतीनें पकडून हाल हाल करून इंग्रजांनीं त्यांना ठार मारिलें. ह्या बंडांत सुमारें ७०० गोरे लोक मारले गेले.

सिंगापूरच्या उत्तरेस जोहोर ह्मणून एक प्रांत आहे. तेथें बहुतेक चिनी लोकांची वस्ती आहे. १९१० मध्यें तेथील राजाच्या विनंतीवरून इंग्रजांनीं तोहि प्रांत आपल्या संरक्षणाखालीं घेतला. जोहोरच्या उत्तरेस आणखी चार लहान लहान देशी राज्यें होतीं. त्या सर्वांनीं १८९६ मध्यें एकत्र होऊन आपला एक संघ बनविला आणि इंग्रजांचें संरक्षण स्विकारलें. हा इंग्रज सल्लागारांच्या वीस वर्षांच्या सतत परिश्रमाचा फायदा होता. ह्याशिवाय पुष्कळशीं देशी राज्यें होतीं. त्यांनींहि ह्या चार राजांचें अनुकरण करून एक संघ बनविला आणि सर्वांनींच इंग्रजांचें संरक्षण पत्करिलें. ह्या सर्व देशी राज्यांचें क्षेत्रफळ २७ हजार मैल आहे आणि त्या सर्वांत मिळून दहा लाख लोकवस्ती आहे. ह्यांत

अर्धे चिनी व अर्धे मलाई आहेत. जस्त व सोनें ह्या धातूंच्या खाणी ह्या वसाहतींत मुबलक असल्यानें ह्या वसाहतीपासून इंग्रजांना अतिशय फायदा होतो. १९१६ मध्यें येथील खर्च भागून २५ कोटी रुपये फायदा राहिला होता. हिंदुस्थानांतूनहि तेथें पुष्कळ लोक जातात, त्यांना तेथें कांहीं सवलतीहि दिल्या आहेत. यामुळें सध्यां तेथें ⅙ वस्ती हिंदी लोकांची आहे. युद्धाचे वेळीं ब्रिटिश वसाहतीच्या संरक्षणाकरितां सैन्याचें सहाय्य पुरविण्यास तेथील संरक्षित संस्थानें तहानें बांधलेलीं आहेत. ह्या संघटित संस्थानचे उत्तरेस असलेली सयाम देशाची भूमि अन्यायानें बळकावून इंग्रजांनीं आपल्या वसाहतीचा विस्तार केला आहे. १९०९ मध्यें आपल्या अंकित असलेलीं चार संस्थानें नाइलाजानें इंग्रजांच्या स्वाधीन झालीं. त्यांत दहा लाख मलाई मुसलमानांची वस्ती आहे. रेल्वे बनविली गेल्यामुळें ह्या संस्थानांचीहि व्यापारवृद्धि झाली आहे.

१८४२ मध्यें सर जेम्स ब्रुक यानें ब्रुनेईच्या राजापासून बोर्नियाच्या उत्तरेस असलेली खाडी, किनारा व नदी यांवरील कांहीं अधिकार मिळविले. हळु हळु त्या अधिकारांचा व अधिसत्तेखालीं असलेल्या भूमीचा विस्तार होऊं लागला, आणि १८९० मध्यें ब्रुक वंशांतील लोकांजवळ सुमारें ४०० चौरस मैल भूमि आली व ब्रुनेइच्या राजाजवळ त्याहिपेक्षां थोडी शिल्लक राहिली. सर जेम्स ब्रुक हा आतां राजाची पदवी धारण करूं लागला व त्यानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. ह्या राज्याचें नांव त्यानें सर्वक असें ठेविलें. ह्यानंतर हें सर्वक व ब्रुनोईचें शिल्लक उरलेलें राज्य इंग्रजांनीं आपल्या संरक्षक वसाहतींत समाविष्ट केलें. १९१२ मध्यें सर्वक येथील राजानें दुसऱ्या युरोपियन राष्ट्रांच्या हल्ल्यापासून सुरक्षित राहण्याकरितां एक कौन्सिल बनविलें. त्याचें मुख्य कार्यालय लंडन येथें आहे. ह्या राज्यांत कोळसे, तेल, सोनें वगैरे उपयुक्त जिनसांच्या खाणी असल्यानें ह्या वसाहतीची उत्पादक शक्ति आणखीहि वाढण्याचा संभव आहे.

ब्रिटिश उत्तर बोर्नियाचा कांहीं भाग ब्रुनोईच्या सुलतानापासून व कांहीं भाग सुलूच्या सुलतानापासून इंग्रजांना मिळाला. पूर्वीं हा प्रदेश बऱ्याच रानटी स्थितींत होता. इंग्रज लोकांनीं येथील जंगलें तोडून व जमीन साफ करून प्रदेश वस्तीयोग्य केला. १८८८ मध्यें तेथील सुलतानांकडून आणखी कांहीं जमीन गिळंकृत करून ती वसाहत संरक्षित देशांत सामील केली. ही जमीन अत्यंत सुपीक असल्यानें इंग्रजांना ह्या जमिनीपासून बराच फायदा मिळण्याचा संभव आहे. जेव्हां इंग्रज लोक युक्तिप्रयुक्तीनें आपलें राज्य वाढवून ब्रुनोईच्या सुलतानास फारच उपद्रव देऊं लागले, तेव्हां लाचार होऊन त्याला आपलें राज्य ब्रिटिश संरक्षणाखालीं द्यावें लागलें. ब्रुनोई, सर्वक आणि ब्रिटिश बोर्नियो यांच्या इतिहासावरून एक गोष्ट मात्र ढळढळीतपणें दिसून येते ती हीच कीं, युरोपियन लोक कोणत्या कारवाईनें वसाहती आपल्या हस्तगत करितात आणि तेथील मूळच्या अधिकाऱ्यांना दाबांत ठेवून त्यांना गुलामाप्रमाणें कसे वागवितात हें कळून येतें.

# आशियांत इंग्लंड.

मध्य समुद्रांतील अरबस्थानचे पश्चिमेस असलेल्या सायप्रस बेटापासून चीनच्या पूर्वभागीं असलेल्या वेईहईवैपर्यंत आशियाखंडांतील दक्षिणार्धांत जितके प्रांत, जितकीं बेटें, बंदरें आणि दुसरीं युद्धोपयोगी ठिकाणें आहेत, तीं सर्व इंग्रजी सत्तेखालीं असून त्यांवर इंग्लंडचा झेंडा फडकत असलेला दिसून येतो. समुद्रांतील ज्या ज्या मार्गांवर अधिकार ठेवतां येतो. त्या त्या सर्व मार्गांवर एकट्या इंग्रजांचाच अधिकार आहे हें नकाशा पाहिला असतां तत्काळ दिसून येतें. जर इंग्लंड. जवळ सर्वांत अधिक बलाढ्य आरमार नसेल तर दक्षिण आशियावरील

आपली सत्ता स्थिर राखणें त्यास अत्यंत कठिण जाईल. इंग्लंड हें समुद्रावर अजिंक्य आहे. त्याला कोणत्याही प्रतिस्पर्ध्याचें भय नाहीं. तें जी कोणती आज्ञा करील त्याचें पालन सर्व आशियाटिकांनीं हूं कां चूं न करितां केलें पाहिजे. आशियावरील या विस्तृत व पूर्ण सत्तेमुळें इंग्लंडला जो आर्थिक व व्यापारी लाभ होत आहे तो अगणित आहे. त्याचा अदाज सुद्धां मुळींच करतां येत नाहीं. जे कारखानदार आणि व्यापारी इंग्लंडांत जन्म घेतात ते अत्यंत भाग्यवान आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं; कारण दुसऱ्या ठिकाणापेक्षां दक्षिण आशियांत त्यांच्या मालाला मुबलक गिऱ्हाईक सांपडतें. तुर्कस्थानापासून चीनपर्यंत त्यांच्या अधिकारांत सायप्रस, स्वेज, एडन, मेसापोटेमिया, पलेसटाइन, इराक, दक्षिण इराण, इजिप्त, हिंदुस्थान, लखदीव, मालदीव, सिलोन, ब्रह्मदेश, निकोबार, मलाया द्वीपकल्प, सिंगापुर, हॉंगकॉंग, उत्तर बोर्नियो आणि वेइहइवै इत्यादि सर्व ठिकाणें आहेत.

सायप्रसमुळें भूमध्य समुद्र, सीरिया आणि इजिप्त यांचें रक्षण होतें. एडनमुळें बॅबेल मांडेल आणि तांबडा समुद्र यांवर नजर राखितां येते. लखदीव, मालदीव आणि सिलोन यांमुळें हिंदुस्थानचें चांगल्याप्रकारें रक्षण होतें. सिंगापुर हातांत राखिल्यानें मलाया द्वीपकल्पाचें उत्तमप्रकारें रक्षण करितां येतें. हॉंगकॉंग तर चीनच्या दक्षिणेकडील सर्वांत मोठें बंदर आहे; आणि वेइहइवै मध्यें इंग्रज सेना असल्यानें जपानापासून फारशी भीती उरत नाहीं. याशिवाय दक्षिणआशियामध्यें युद्धोपयुक्त दुसरें स्थान तरी कोणतें राहिलें ?

सन १९१४ नंतर तुर्ककडून वगैरे जो प्रदेश इंग्रज लोकांस मिळाला आहे तोहि सोडून दिल्यास आशियाखंडांत इंग्रजांच्या ताब्यांत २१ ०००० चौरस मैल भूमि आहे, आणि त्यांत ३६,००,००,००० मनुष्यें आहेत. इतक्या विस्तृत प्रदेशांत केवळ १७,०००० इंग्रज लोक त्यांच्यावर अधिकार गाजवितात. यांतील सरकारी कामगार आणि मिशनरी सोडून

दिल्यास केवळ दोन तृतीयांशच लष्करी लोक राहतात, अर्थात थोड्याशा इंग्रज लष्कराचें दक्षिण आशियावर पूर्ण प्रभुत्व आहे.

ब्रिटिश साम्राज्यामध्यें चार प्रकारचे देश आहेत. स्वतंत्र म्हणजे स्वराज्योपभोगी देश, वसाहती, संरक्षक आणि अंकित अर्थात जिंकून घेतलेले देश. यांतील शेवटच्या वर्गाची सुबोध व्याख्या करितां येत नाहीं. यांत असे कित्येक देश आहेत कीं, जे प्रत्यक्षपणें इंग्रजांच्या ताब्यांत नाहींत. किंवा नियमानुसार संरक्षक देशांत सामील केले गेले नाहींत, पण त्यांच्यावर अप्रत्यक्षपणें इंग्रजसरकारचा दाब आहे. असें असल्यानें अन्य राष्ट्रांना त्या प्रदेशांकडे ढुंकूनहि पाहतां येत नाहीं.

हिंदुस्थानसरकार हळु हळु स्वतंत्र व स्वावलंबी होत चाललें आहे. कारण त्याचीं कार्यें व धोरण ह्यांवर इंग्लंड सरकारचा व पार्लमेंटाचा प्रत्यक्ष अधिकार नाहीं. इतकेंच नव्हे तर केव्हां केव्हां कांहीं कांहीं बाबतींत हिंदुस्थानसरकार आणि ब्रिटिश परराष्ट्रविभाग यांत विरोध पडलेला दिसून येतो. स्वतः हिंदुस्थानसरकार जरी पुष्कळ बाबतींत स्वतंत्र असलें, तरी त्याचा कांहीं अंशसुद्धां हिंदी लोकांस मिळालेला नाहीं. कारण देशाच्या राज्यकारभारांत त्यांना कांहींच महत्वाचा हक्क नाहीं. हिंदुस्थानांतील अज्ञ देशी राजांच्या मदतीनें कांहीं धूर्त इंग्रजी अधिकारी भारतवर्षांत मनमानेल तसा राज्यकारभार हांकीत आहेत असें ह्मणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. हिंदुस्थानाबाहेरील ब्रह्मदेश, अंदमान व निकोबार हे प्रदेश हिंदुस्थानांतर्गतच प्रांत आहेत. बलुचिस्थानचा कांहीं भाग संरक्षित देशाच्या रूपानें व कांहीं भाग अंकित देशाच्या रूपानें हिंदुस्थानसरकारच्या स्वाधिन आहे. एडनवर मुंबई इलाख्याचा व लखदीव मालदीव यांवर मद्रास इलाख्याचा अधिकार आहे. याशिवाय बेहरिन प्रदेश, सिकिम इत्यादि प्रांतां-वर हिंदुस्थान सरकारचा अप्रत्यक्षपणें अधिकार चालतो. सिलोन, मालदीव, सायप्रस, हॉंगकॉंग, मलाया द्वीपकल्प इत्यादि वसाहती आहेत आणि त्यांवर ग्रेटब्रिटनचा प्रत्यक्ष अधिकार आहे, आशियांतील या सर्व प्रांतांवर इंग्रजांनीं

कोणत्या अन्याय्य तऱ्हेनें आपली सत्ता स्थापन केली ती पुढें संक्षिप्त रीतीनें कथन करण्यांत येत आहे. यावरून बेलजमच्या संरक्षणा-करितां आपण गेल्या महायुद्धांत सामील झालें म्हणून ढोंग करणारें इंग्लंड किती उलट्या काळजाचें आहे हें कोणाच्याहि प्रत्ययास येईल.

नेपोलियन बोनापार्टाशीं सामना देण्यांत डच लोक गुंतले आहेत, व त्यांची शक्ति थोडीशी कमकुवत झाली आहे असें पाहून इंग्रजांनीं लब्ध-प्रतिष्ठितपणें छापा घालून सिलोनबेट आपल्या आधिपत्याखालीं आणिलें आणि एकुणिसाव्या शतकाच्या आरंभीं ती आपली वसाहत केली. तेथील लोकांवर डचांचा कांहीं विशेष अधिकार नव्हता. परंतु इंग्रजांनीं कांहीं ठिकाणी स्वतः लढून आणि बहुतेक ठिकाणीं तेथील राजांना एकमेकां-विरुद्ध मदत करून सर्व देश पूर्णपणें आपल्या अंकित केला. गेल्या शंभर वर्षांत तेथील राज्यकारभारांत इंग्रजांना कांहींच अडथळा आलेला नाहीं. तेथें सुमारें ४५ लाख मनुष्यवस्ती आहे. त्यांत विशेषेंकरून सिंहली व तामील लोकांचा भरणा आहे. हे लोक हिंदुस्थानांतून येथें आले होते आणि त्यांनीं येथील लोकांना मारून रानांत पिटाळून लाविलें होतें. ही वसाहत पुष्कळ दृष्टीनें संपन्न आहे आणि तिला कोणत्याहि बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागत नाहीं. ही आपल्या सर्व गरजा आपल्या आपणच पुरवूं शकते. हिचा बहुतेक व्यापार हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांशीं आहे आणि हिच्या संरक्षणार्थ असलेल्या लष्कराचा खर्च तेथील लोकांनीं दिलेल्या करानें पूर्णपणें भागतो. इंग्रजांनी येथील प्रजेला पिळून काढून हिची आर्थिक स्थिति उत्तम आहे असें जगास भासविण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला आहे; पण अंदरकी बात कांहीं औरच आहे. शिक्षणा-करितां तेथें इंग्रजांकडून कांहींच प्रयत्न करण्यांत आलेला नाहीं. ख्रिस्ती व बौद्ध प्रजेंत आपसांत कलागती लावून फोडा व झोडा या न्यायानें राज्यकारभार चालविण्याचा धूर्त अधिकाऱ्यांचा प्रयत्न अहर्निश झटून चालू असतो. ह्या जुलमास कंटाळून १९१५ मध्यें राज्यक्रांतीचा प्रयत्न

तेथील कांहीं लोकांकडून करण्यांत आला होता; पण त्यावेळी इंग्रजसरकारनें वेळींच मार्शल लॉ पुकारून क्रांतीच्या बहुतेक पुढाऱ्यांस गोळ्या घालून ठार मारिलें व कांहीं लोकांस कैदेंत ठेवून ती चळवळ तेथेंच दाबून टाकिली. १८७८ मध्यें कॉन्स्टंटिनोपल येथें एक गुप्त तह झाला होता. त्या तहान्वयें सायप्रस बेट इंग्रजांच्या आधिपत्याखालीं आलें. तुर्कस्थानचा सुलतान हा प्रदेश बिलकुल देत नव्हता, परंतु नाइलाजामुळें त्यानें इंग्रजांच्या आधिपत्याखालीं कांहीं वर्षांच्या करारानें दिला. त्यानंतर पांच वर्षांनीं इंग्रजांनीं इजिप्तमध्यें आपलें बस्तान बसविलें. गतमहायुद्धापर्यंत सायप्रस आणि इजिप्त ह्यांची स्थिति एकसारखीच होती. दोन्हीहि प्रदेश तुर्की साम्राज्याच्या अंगभूतच होते. पण महायुद्धांत जेव्हां तुर्कांनीं जर्मनीची बाजू घेतली, तेव्हां ५ नव्हेंबर १९१४ मध्यें इंग्रजांनी सायप्रस बेट पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतलें. तेथील लोकसंख्या सुमारें तीन लाख आहे. त्यांत चार पंचमांश लोक ग्रीक आहेत. हें बेट ग्रीसच्या ताब्यांत असावें ह्याविषयीं त्यांची तेथें पुष्कळ काळापासून चळवळ चालू आहे. १९१५ मध्यें इंग्रजांनीं त्यांना अभिवचन दिलें होतें कीं, जर या युद्धांत ग्रीस आम्हांला सहाय्य करील तर हें बेट आम्हीं त्यांच्या ताब्यांत देऊं; परंतु ग्रीसचा राजा कॉन्संटाइन यानें ही गोष्ट कबूल केली नाहीं. नंतर कॉन्संटाइन राजाला पदच्युत करून ग्रीसराष्ट्र दोस्तांच्या मदतीस आलें तेव्हां तेथील लोकांना सायप्रस बेट ग्रीकांच्या ताब्यांत जाईल अशी फार आशा होती. पण इंग्रजांनीं आपलें वचनभंगाचें अनादिसिद्ध ब्रीद यत्किंचितहि ढळूं दिलें नाहीं.

हाँगकाँग प्रदेश चीनांतील कँटन नदीच्या मुखापाशीं आहे. हा प्रांत इंग्रजांनी अफूसंबंधीं झालेल्या १८४१ सालच्या लज्जाजनक युद्धाचे वेळीं घशाखालीं घातला. वीस वर्षांनंतर त्याच्या जवळच्या कालूंग नामक द्वीपकल्पावर जुलुमानें सत्ता स्थापन करून इंग्रजांनी या वसाहतीचा आणखीहि विस्तार केला. जेव्हां जपानाशीं युद्ध करून चिनीराष्ट्र कमकुवत

झालें, तेव्हां इंग्रजांनीं त्याच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन चीन देशाची तीन हजार चौरसमैल भूमि भाडेपट्ट्यानें घेतली व आपल्या वसाहतीचा विस्तार पूर्वीपेक्षां पांचपट केला. प्रस्तुतकालीं ५ लाख चिनी लोक ब्रिटिश अधिराज्याखालीं राहत आहेत. स. १९०० पासून इंग्रज लोक चीनदेशांत आर्थिक व राजकीय अधिकार प्राप्त करून घेण्याकरितां अतोनात अन्याय्य कृत्यें करीत आहेत. १९०१ मध्यें वालगन येथील प्रकाशगृह वसाहत सरकारनें आपल्या अधिकाराखालीं घेतलें. त्याचप्रमाणें १९०४ मध्यें एक मोठा प्रदेश केवळ युरोपियनांनांच राहण्याकरितां राखून ठेवण्यांत आला. १९०५ मध्यें वूचेंगच्या सुभेदाराला कांहीं रक्कम कर्जाऊ देवून इंग्रजांनी आपलें प्रभुत्व आणखीहि वाढविलें. हे रुपये त्यानें अमेरिकन राष्ट्राचे जे हक्क चीनांतील रेल्वेवर होते ते परत मिळविण्याकरितां घेतले होते. १९१६ मध्यें जेव्हां चीनी लोक स्वखर्चानें ब्रिटिश वसाहतीं बाहेरील कँटन प्रांतांत रेल्वे बांधण्याची योजना करूं लागले, तेव्हां इंग्रज लोकांनीं त्यांना भयंकर विरोध केला. जेव्हां चीनांत, लोकसत्ताक राज्यपद्धतीची चळवळ जोरावूं लागली, तेव्हां चीनी लोक इंग्रजांविरुद्ध चळवळ करूं लागले. ते हाँगकाँगवरसुद्धां आपला अधिकार असावा असें ह्मणूं लागले; कारण ते लोक हाँगकाँग हें आपल्या देशांतील एक महत्वाचें बंदर आहे हें जाणून होते. क्रांतिकारक चळवळ सफल झाली असें जेव्हां चीनी लोकांनी पाहिलें तेव्हां राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा फैलाव हांगकांगच्या चीनी लोकांनहि झाला आणि ते आपल्या घरावर आनंदानें चानचा राष्ट्रीय झेंडा फडकावूं लागले. इंग्रजांनीं मोठ्या कडकपणानें तीं चळवळ दाबून टाकिली आणि शांततारक्षणाच्या सबबीवर खास जुलुमी कायदे पसार करून त्यांची निर्दयपणें अंमलबजावणी केली. जुलै १९१२ मध्यें जेव्हां वसाहतीचा एक नवा गव्हरनर तेथें पोंहोंचला, तेव्हां तेथील चीनी लोकांनी त्याचा वध करण्याचा प्रयत्न केला. आरोपीनें कोर्टांत निर्भयपणें सांगितलें होतें कीं, मी कोणाच्याहि सांगण्यावरून हें कृत्य केलें नाहीं,

तर केवळ देशप्रेमानें प्रेरित होऊन मी हें कृत्य केलें आहे. ह्यानंतर एक महिन्यानें हॉंगकॉंगच्या आसपासचीं दीपगृहें व पोलिस स्टेशनें यांवर चीनी देशभक्तांनीं आक्रमण करून तेथें पुष्कळ नासधूस केली. १९१२ मध्यें आपल्या वसाहतींत चीनी नाणें वापरण्याची जेव्हां इंग्रजसरकारनें बंदी केली तेव्हां चीनी लोकांनीं इंग्रजी मालावर बहिष्कार पुकारला होता. त्यामुळें इंग्रज सरकारला बरेंच नुकसान आलें. प्रस्तुतकालीं चीनचा राष्ट्रीय पक्ष व चंगत्सोलिन यांचा झगडा चालू आहे. इंग्रजांनी आपलें पुष्कळसें सैन्य शांघाय येथें एकत्र करून चीनी लोकांस धाक दाखविण्याचा बराच प्रयत्न केला; पण फ्रान्स व अमेरिका यांनीं तटस्थता स्वीकारल्यानें इंग्रजांस मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें. चीनांत प्रस्तुतकालीं जी राष्ट्रीय चळवळ चालली आहे त्यावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, चीनांतील आजची नाहीं तर पुढची पीढी आपल्या देशांतील राजकीय अधिकार बळकावून बसलेल्या सर्व परकिय लोकांस स्वदेशाबाहेर हांकून लाविल्याशिवाय कदापिहि राहणार नाहीं. चीनी तरुणांचा मुख्य उद्देश स्वदेश पूर्ण स्वतंत्र करण्याचा आहे.

याचप्रमाणें वेईहईवैवरहि १८१८ सालच्या अन्याय्य युद्धानंतर इंग्रजांनीं आपली सत्ता स्थापन केली. वेईहईवैमध्यें तेथील बंदर आणि खाडी ह्यांशिवाय ल्युकुंग व खाडीच्या आसपासचा सर्व प्रदेश सामील आहे. पूर्वी हा प्रदेश युद्धविभागाच्या अधिकाराखालीं होता. पण १९०१ मध्यें हा प्रदेश वसाहतींत सामील केला गेला; आणि हांगकांग येथील कायद्याप्रमाणें तेथील राज्यकारभार करण्याचा हुकूम देण्यांत आला व तेथें एका कमिशनराची नेमणूक करण्यांत आली. शांघाय बंदर ताब्यांत घेऊन इंग्रज लोक तेथें तटबंदी करतील असा लोकांचा तर्क होता; परंतु इंग्रज सरकारनें १९०२ मध्यें एक जाहीरपत्रक काढून प्रसिद्ध केलें कीं, शांघाय येथें तटबंदी करून तेथें सैनिक बंदोबस्त ठेवण्याचा आपला विचार नाहीं. आपले दुसरे युरोपियन प्रतिस्पर्धी चीनच्या किनाऱ्यावरील आपापल्या बंदरांची तटबंदी करून आपल्या व्यापारास धोका आणितील

अशी इंग्रजांस भीति पडली असावी. पन्नास वर्षांतच हांगकांगमध्यें त्यानें आपले हात पाय पसरल्याने चीनी लोक इंग्रजांवर दांत ओठ खात होते. अशा स्थितींत शांघायवर पूर्ण अधिकार केल्यास गोष्ट जड जाईल हें इंग्रजांनी जाणिलें. आणि तेथें विमानांचें एक लहानसें गृह आणि खाडी-मध्यें लहान लहान जहाजें ठेऊन आपल्या व्यापाराच्या संरक्षणाची तजवीज केली. रुसो-जपानी युद्धानंतर जेव्हां चीनदेशानें जाहीर केलें कीं, पोर्टआर्थर बंदरांत आपण जे अधिकार रशियाला दिले होते ते जपाननें घेण्यास हरकत नाहीं,तेव्हां धूर्त इंग्रजांनी मनांत खूण गांठ बांधिली कीं, शांघायचाहि निकाल होऊन चुकला. कारण इंग्रजांना शांघायबंदर अशा अटींवर देण्यांत आलें होतें कीं,जेव्हां रशियाकडून पोर्टआर्थरचा अधिकार चीनला परत देण्यांत येईल तेव्हां इंग्रजांनीं शांघायहि चीनचें चीनला परत द्यावें. पण जेव्हां पोर्टआर्थर बंदराचा जपानला कायमचा अधिकार मिळाला तेव्हां आपणालाहि शांघाय बंदर पचलें म्हणून इंग्रजांना अतोनात आनंद झाला. त्यांनीं उघडपणें शांघाय बंदर वसाहतींत सामील केलें आणि अप्रत्यक्षपणें चीनला कळविलें कीं, ज्याप्रमाणें हांगकांग बंदराची आशा तूं सोडून दिली आहेस. त्याचप्रमाणें या प्रांताचीहि सोड म्हणजे झालें. शाटुंग प्रांतांत ज्याप्रमाणें जपानी लोक वर्तन करतील त्याचप्रमाणें आम्हींहि या प्रांतांत करूं. जर शाटुंग प्रांतांत जपानानें आपलें आरमारी-ठाणें निर्माण केलें तर आम्हींहि या बंदरांत आरमारी काफिला निर्माण केल्या-शिवाय राहणार नाहीं. अति दूर असलेल्या पौर्वात्य भागीं शांघायसारखें उत्तम हवापाणी असलेलें दुसरें ठिकाण नाहीं. असलें उत्तम ठिकाण सुखासुखी सोडण्यासारखे इंग्रज बोंडल्यानें दूध पीत नाहींत. प्रस्तुतकालीं परदेशी विशेषतः इंग्रजी मालावर बहिष्कार पुकारून चीननें या इंग्रजी अन्याय्य व जुलुमी राजनीतीला उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. शांघायच्या आसपासच्या टापूनें. रणक्षेत्राचें स्वरूप धारण केलें आहे. भविष्यकालीं शांघाय कोणाच्या ताब्यांत राहील हा कालाच्या उदरांतील प्रश्न असल्यानें त्याविषयींची चर्चा येथें न करणेंच बरें.

# रूसो-जपानी युद्ध.

जेव्हां जपाननें चीनावर विजय मिळविला, तेव्हां युरोपियन राष्ट्रांनीं मध्यें पडून जपानला विजयाचा फायदा मिळूं दिला नाहीं. ह्या विनाकारण आपल्या योग्य हक्का आड येणाऱ्या राष्ट्रांत रशिया प्रमुख आहे हें जपाननें पूर्णपणें ओळखलें होतें. जेव्हां रशियानें मंचुरिया आणि लिआटंग द्वीपकल्पांत पुढें घुसण्याचा उद्योग सुरु केला, तेव्हां जपान पूर्णपणें समजून चुकला कीं, चीन किंवा कोरिया यांच्याप्रमाणें आह्मीं रशियाच्या आधिन व्हावें किंवा सर्व सामर्थ्य एकवटून रशियांशीं युद्ध करावें, याशिवाय आपणाला तिसरा मार्ग मोकळा नाहीं. रशियानें पोर्ट-आर्थरची तटबंदी करून जणूं काय जपानला युद्धाला निमंत्रणच दिलें. जपान्यांनीं पाहिलें कीं, जेव्हां आपण चीनांत पाय रोवण्यास पाहत होतों, तेव्हां युरोपियन राष्ट्रांनीं आपणास अडथळा केला; पण आतां रशियानें पोर्टआर्थरमध्यें तटबंदी केली असतांहि त्यास कोणी विचारित नाहीं. जेव्हां रशियानें ट्रान्स सैबेरियन रेल्वे तयार करून कोरियांतील यालू नदीच्या तीरावर आपले पाय रोवले, आणि बरोबर जपान देशाच्या समोर असलेलें मेसेनपो बंदर आरमाराचें मुख्य ठिकाण करण्याकरितां कोरियापासून उपटलें, तेव्हां जपानला फक्त दोनच मार्ग राहिले. एक हा कीं, रशियाबरोबर युद्ध करावें आणि दुसरा हा कीं, रशियाला पूर्वआशियाचें सर्व वर्चस्व देऊन टाकावें. पण दुसरी गोष्ट स्वाभिमानी जपानच्या स्वप्नींहि आली नाहीं. चीनबरोबर युद्ध केल्यानंतर आठ दहा वर्षेपर्यंत चीन, मंचुरिया आणि कोरिया यांस रशियाच्या मगरमिठींतून सोडविण्याचें जपाननें जीव तोडून परिश्रम केले. याकरितां त्यानें पुष्कळ द्रव्य, खर्च करून आपली जलसेना व स्थलसेना वाढवून जय्यत तयार केली. आर्थिक उन्नतिशिवाय लष्करी सत्ता वाढूं शकणार नाहीं, हे त्यानें पूर्णपणें ओळखलें. ह्याकरितां त्यानें आपल्या व्यापाराचीहि फार उन्नति

केली. जपानी लोक उत्साह, व्यवस्था आणि स्वार्थत्याग ह्याचें महत्व जाणून होते. त्या गुणांतहि त्यांनी श्रेष्ठत्व दाखविलें. ह्याचा परिणाम असा झाला कीं; थोड्याच अवधींत युरोपियन राष्ट्रांस टक्कर देण्या-इतकी जपानची तयारी झाली. चीनबरोबर युद्ध केल्यानंतर त्याच चीन व दुसऱ्या परकीय राष्ट्रांशीं वागण्याचें धोरण कोणतें होतें, हें न पाहतां रशियाशीं जपानचा प्रत्यक्ष संबंध कसा होता हेंच येथें दाखविण्याचा विचार आहे.

१९०३ मध्यें रशियाचा युद्धमंत्रि कुरोपाटकीन जपानच्या राजाचा पाहुणा या नात्यानें जपानला गेला होता. तेथें त्याचें पुष्कळ आदरानें व मित्रत्वानें आतिथ्य झालें होतें. जपानी मुत्सद्यांनीं जपान कधींहि रशियाचे सख्य तोडूं इच्छित नाहीं, या गोष्टीवर जोर दिला होता. तिकडे रशियाचीं वृत्तपत्रेंहि सख्यत्वप्रदर्शक भाषा बोलत असत. पण स्वतः राशियन मुत्सद्यांत सर्व युरोपियन मुत्सद्यांप्रमाणें एक मोठा दोष होता, तो हा कीं, ते मित्रत्वाच्या खूप लंब्याचवड्या गप्पा झोंकण्यांत पूर्ण निष्णात होते; पण दिलेल्या अभिवचनाची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे; याची त्यांना जाणीव नव्हती. ते मित्रत्वाचा सूर उच्च स्वरांत आळवितच होते; पण यालू नदीवरील आपली प्रगति मात्र थांबवित नव्हते. पोर्टआर्थरची किल्लेबंदी चालूच होती, आणि पॅसिफिक महासागरांत आपलें आरमार वाढविण्याच्या खटपटीला खंड पडला नव्हता. त्याचबरोबर चीनच्या मंचुरिया प्रांतांत त्यांनीं पाय रोवण्यास सुरुवात केली होती. तात्पर्य जपानला आपल्या मित्रत्वाच्या भ्रमांत ठेवून आपला स्वार्थ पूर्णपणें साधण्याच्या खटपटींत राशिया होता. जपानलाहि तो आशियांतील अन्य राष्ट्रांप्रमाणें दुधखुळें राष्ट्र समजत होता, आणि त्याच्यावरहि आपलें युरोपियन जाळें टाकूं पहात होता. आपले डावपेंच पूर्णपणें ओळखणारें एक राष्ट्र, आपणच खोदलेल्या खड्ड्यांत आपणासच गाडणारें एक राष्ट्र, आशियाखंडांत जिवंत आहे याची त्याला जाणीव नव्हती.

१२ आगस्ट १९०३ मध्यें मंचुरिया आणि चीनमध्यें जपानचा आणि रशियाचा संबंध कसा राहावा हें एकदां निश्चित् ठरणें चांगलें असें पेट्रोग्राड येथें असलेल्या जपानी वकीलांनीं बोलणें काढलें. १८९४ मध्यें जपाननें आणि रशियानें ज्या तहावर सह्या केल्या होत्या, तो तह पुरा व्हावा अशी जपानची इच्छा होती. त्या तहांत कोरिया स्वतंत्र राहावा अशी अट होती, ती पुरी व्हावी व त्या तहांत कोरियांत रेल्वे बांधण्याचा जपानला जो हक्क दिला होता, तो पुरा व्हावा अशी त्यानें इच्छा प्रदर्शित केली. कांहीं महिनेपर्यंत रशियानें ह्या बोलण्याला जबाबच दिला नाहीं. यानंतर १९०३ च्या आक्टोबरमध्यें जपानचें मंत्रिमंडळ आणि तेथील वयोवृद्ध मुत्सद्दी यांची एक परिषद् भरली. त्यांत शक्य तोंपर्यंत रशियांशीं सख्य ठेवावें असा मंत्रिमंडळास वृद्ध मुत्सद्द्यांनीं उपदेश केला.

परंतु त्यावेळीं जपानचें लोकमत फारच क्षुब्ध झालें होतें. ह्याप्रकारें बोलणें चालणें करण्यांत वेळ घालविला तर मंचुरिया आणि लिआओटंग यांमध्यें युद्धाची तयारी करण्यास रशियास मुबलक वेळ मिळेल, असें लोक ह्मणूं लागले. लोक असेंहि ह्मणूं लागले कीं, कदाचित् रशिया आज कोरियाचें स्वातंत्र्य तोंडानें कबूल करील आणि नंतर चांगल्या प्रकारें युद्धाची तयारी करून मंचुरिया व कोरिया यांवर आक्रमण करील. एर्वी तेर्वी आपणाला रशियाशीं लढाई केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. ह्मणून आज लढाई टाळून शत्रूला लढाई करण्यास वेळ देणें युक्त नाहीं. शेवटीं जपानी मंत्रिमंडळानें रशियाला कळविलें कीं, चीन व कोरिया यांच्या स्वातंत्र्यांत आपण कांहीं ढवळाढवळ करणार नाहीं असें रशियानें उघडपणें जाहीर करावें आणि त्याप्रमाणें वर्तन करावें. जपानचें असेंहि सांगणें होतें. मंचुरियांत रशियाचे विशेष हक्क आहेत असें आपण कबूल करितों, पण त्या मोबदला कोरियांतहि जपानचे विशेष हक्क आहेत हें त्यानें कबूल करावें आणि ह्या दोन्ही देशांत दोघांनाहि व्यापार

करण्याचें समान अधिकार आहेत असें समजून त्याप्रमाणें वर्तन करावें. सगळा नवंबर महिना संपला, तरी रशियानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. यानंतर ५ डिसेंबरला जपानी पार्लमेंटचें अधिवेशन भरलें. ह्यांत मंत्रिमंडळावर पूर्ण विश्वास प्रकट करण्यांत आला व मंत्रिमंडळानें रशिया व जपान यांच्या तेढीचा प्रश्न भिजत न ठेवतां त्याचा लवकर सोक्षमोक्ष करण्यांत यावा अशी विनंति केली. १० डिसेंबरला जपानी राजानें पार्लमेंटला सांगितलें कीं, आमचें मंत्रिमण्डळ जपानच्या हिताच्या बाबतींत कसूर करणार नाहीं. यावर पार्लमेंटानें एकमतानें उत्तर दिलें कीं, ह्यावेळीं जी संधी आली आहे, तिचा लाभ मंत्रिमंडळ घेत नाहीं. ह्यावर राजानें ताबडतोब पार्लमेंट बरखास्त केलें. या अवधींत रशियाचें जें उत्तर आलें, तें कोणत्याहि प्रकारें संतोषजनक नव्हतें. मंचुरियामध्यें आपलें सैन्य पाठविण्याचें रशियानें मुळींच बंद केलें नाहीं. तर तें जास्तच प्रमाणांवर पाठवूं लागला. ही गोष्ट तत्काळ उघडकीस आल्यामुळें रशियाशीं ताबडतोब युद्ध जाहीर करावें अशी जपानी वृत्तपत्रांनीं एकच ओरड केली.

२१ डिसेंबरला पुन्हां एकदां रशियाला लिहिण्यांत आलें कीं, तुह्मीं आपल्या उत्तरावर फिरून एकवार विचार करा; यावर ६ जानेवारीला रशियानें उत्तर दिले कीं, मंचुरिया आणि लिआओटंग यांमध्यें जपाननें कोणत्याहि प्रकारचा हस्तक्षेप करूं नये. कोरियाच्या कोणत्याहि प्रांतांत किंवा भागांत जपाननें आपलें सैन्य ठेऊं नये. या उत्तराचा जपाननें निषेध केला. रशियाला अशी घमेंड होती की, जपान एकाएकीं लढण्यास तयार होणार नाहीं. पण ६ फेब्रुवारी १९०४ मध्यें जेव्हां पेट्रोगाड येथें राहणाऱ्या जपानी वकीलानें स्वदेशीं परत जाण्यास परवानगी मागितली तेव्हां रशियांतील मंत्रिमंडळाच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. जपानी मंत्रि आणि जपानी सरकार यांच्या ह्या कारवाईचा निषेध करून ९ फेब्रुवारी रोजीं रशियन सरकारनें मानभावीपणानें एक जाहीर

पत्रक प्रसिद्ध केलें. हें जाहीर पत्रक प्रसिद्ध करण्यांत आपण जपानशीं लढावयास इच्छित नसून जपानच आपणावर आक्रमण करीत आहे, असें भासविण्याचा रशियाचा उद्देश होता; परंतु जपानची या बाबतींत कोणतीच आगळीक नव्हती. केवळ स्वसंरक्षणाकारितां प्रथम राशियावर चालून जाणें जपानास भाग पडलें होतें.

ज्या दिवशीं जपानी वकीलानें पेट्रोग्राड येथून प्रस्थान हलविलें. त्याच्या दुसऱ्या दिवशीं जपानी अॅडमिरल् युरियो यानें चेमलपो बंदरांत जाऊन तेथें असलेल्या दोन रशियन जहाजांना चोविस तासांच्या आंत येथून मुक्काम हलविण्याची आज्ञा केली. त्यावेळीं त्या बंदरांत फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, इटली इत्यादि देशाचीं जीं जहाजें होतीं, त्यांच्यावरील कप्तानानें ह्या जपानी अॅडमिरलच्या हुकुमाला विरोध केला पण अॅडमिरल युरियोनो या विरोधाकडे बिलकुल लक्ष न देतां युरोपांतील प्रबळ राष्ट्रांना ही गोष्ट स्पष्टपणें कळविली कीं, आतां आपण कोणत्याहि बाबतींत तुमची पर्वा करीत नाहीं. चीन-जपान युद्धाच्या दहा वर्षानंतर आशियांत एक नवें राष्ट्र जन्मास आलें आहे ही गोष्ट त्यानें त्यांच्या प्रत्ययास आणिली. दोन्हीहि रशियन जहाजांनीं निसटून जाण्याचा बेत केला; पण जेव्हां त्यांना निसटून जातां येईना, तेव्हां त्यांनीं बंदरांत येऊन आपल्या आपणच स्वतःस बुडवून घेतलें. त्याच-दिवशीं जपानी आरमारानें पोर्टआर्थरमधील रशियन आरमारावर हल्ला केला, आणि त्याचें बरेंच नुकसान करून जपानी क्रुझरें परत आलीं. अॅडमिरल् टोगो यानें दोन महिनेपर्यंत रशियन आरमाराला बराच त्रास दिला आणि रशियाचीं कांहीं क्रुझरें बुडविलीं टोगोची अशी इच्छा होती कीं, आपण पोर्टआर्थरच्या मुखावर राहून येईल तें रशियाचें क्रुझर बुडवून तेथून रशियन क्रुझरें बाहेर निघण्याचें बंद करूं पण टोगोची ती इच्छा सफल झाली नाहीं. तरीहि बंदरावर गोळ्यांचा वर्षाव करण्यास त्यानें सुरुवात केली, व एकहि जहाज बंदरांतून बाहेर

निघूं दिलें नाहीं. रशियाच्या व्लाडिव्होस्टाक येथें असलेल्या आरमारानें जपानी समुद्रावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला होता; पण तो प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. जपानी लष्कर कांहीं अडथळा न येतां बरोबर कोरियाला जात येत असे इकडे जपानानें सर्व समुद्र आपल्या सत्तेखालीं आणला आणि तिकडे कोरियावर पूर्ण अधिकार बसवून तेथून मंचुरियामध्यें रशियांवर आक्रमण करण्याची पूर्ण तयारी केली. एप्रीलच्या शेवटीं जमिनीवरील युद्धांत जपाननें पहिला विजय प्राप्त केला, आणि रशियाला मागें हटवीत हटवीत ते यालू नदीच्या किनाऱ्यावर पोंहोंचलें. यानंतर जेव्हां जपानी लोक आणखीहि पुढें येऊं लागले, तेव्हां रशियन आपली पुष्कळशी युद्धसामग्री तेथेंच टाकून पळून गेले. मध्यंतरी जपानी लष्कराची एक दुसरी तुकडी लिआवोटंग द्वीपकल्पांत जाऊन उतरली. या सैन्यानें पुढें जाऊन पोर्टआर्थर बंदरापर्यंत जाणाऱ्या रेलवेच्या कांहीं भागावर आपली सत्ता बसविली आणि तिसरें एक जपानी लष्कर पोर्टआर्थरवर हल्ला करण्यास गेलें. आगस्टमध्यें जेव्हां हें सैन्य आर्थर बंदराजवळ पोहोंचलें तेव्हां जपानी लष्कराच्या भीतीनें रशियन आरमार बंदर सोडून बाहेर निघालें. पोर्टआर्थरमधील आरमार बाहेर निघतांच व्लाडिव्होस्टाक येथील रशियन आरमारानेंहि बाहेर निघावें, व ह्या संयुक्त आरमारानें जपानी आरमाराला तोंड द्यावें असें पूर्वी निश्चित ठरलें होतें. पण कांहीं गफलत होऊन व्लाडिव्होस्टाक बंदरांतील आरमार बाहेर निघूं शकलें नाहीं, व त्यामुळें आर्थर बंदरांतून निघालेल्या आरमाराचा जपानी आरमारानें सहजपणें पराजय केला. कांहीं रशियन क्रुझरें बुडविण्यांत आलीं, कांहीं पळून चीनी बंदरांत जावून लपून राहिलीं आणि कांहीं फिरून आपल्या पूर्वीच्या ठिकाणीं गेलीं. ह्या लढाईनंतर तीन दिवसांनीं रशियाच्या व्लाडिव्होस्टाक येथील आरमाराचा जपानानें पराभव केला. एक क्रुझर तेथेंच बुडलें आणि दोन पूर्णपणें निकामी झालीं. जपानाचा हा विजय फार महत्वाचा होता. युरोपांतून रशियन

क्रुझरें पॅसिफिक महासागरांत येण्यास निघालीं होतीं; पण तीं येण्यास बराच वेळ होता. ह्या वेळांत जपानी लोकांस फिरून पूर्ण तयारी करण्यास अवसर मिळला. या विजयामुळें जपानी लोकांचा उत्साह दुणावला होता. कोरिया आणि मंचुरिया येथें रशियाशीं समोरासमोर लढण्याची ताकद जपानच्या अंगांत नव्हती. कारण मंचुरियांत रशियाचें पुष्कळ सैन्य होतें. पूर्व आशियांतील रशियन आरमारांत जपानी आरमारापेक्षां अधिक क्रुझरें होतीं आणि त्यांत तोफाहि अधिक होत्या. जर त्यावेळीं युरोपमधील आरमारहि येऊन त्यांस मिळालें असतें, तर जपानला अत्यंत संकटांशीं सामना द्यावा लागला असता; पण रशियांतील आरमार येऊन पोहोंचण्यापूर्वींच जेव्हां पूर्व आशियांतिल आरमाराचा जपाननें पराभव केला, तेव्हां त्यांची हिंमत वाढली, व त्यांना समजून आलें कीं, आतां रशियाला आमच्याकडून विजय प्राप्त होत नाहीं.

आगस्टपासून अक्टोंबरपर्यंत जपानला कोणता ना कोणता तरी विजय मिळत होता. परंतु त्यांना पोर्टआर्थर आपल्या ताब्यांत घेतां आलें नाहीं. मंचुरियामध्यें रशिया खूप सैन्य पाठवीत होता आणि तेथें युद्धाची धुमश्चक्री चालली होती. पासिफिक महासागरांत रशियन आरमार पोहोंचण्यापूर्वींच आपण पोर्टआर्थर ताब्यांत घ्यावें अशी जपानची इच्छा होती, कारण तें आरमार येऊन पोहोंचल्यावर पोर्टआर्थर ताब्यांत घेणें अत्यंत कठीण आहे हें त्यांना पूर्णपणें ठाऊक होतें. ह्मणून पोर्टआर्थरवरच त्यांनीं आपला सर्व जोर दिला आणि आतां पोर्टआर्थरचें रक्षण करितां येणें शक्य नाहीं असें त्यांनीं थोड्याच दिवसांत तेथील लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें. १ जानेवारी १९०५ रोजीं पोर्टआर्थर जपानच्या स्वाधिन झालें.

आतां सर्व लिआयोटंग द्वीपकल्प आणि मांचुरियाचा कांहीं भाग जपानच्या हातांत येऊन चुकला होता. परंतु युद्धास आरंभ होण्याच्या वेळीं मंचुरियामध्यें रशियाची जितकी युद्धसामग्री व तोफा होत्या त्यापेक्षां

१९०५ सालच्या प्रारंभीं रशियाचें मंचुरियांत जास्त युद्धोपयोगी साहित्य होते. मार्चच्या आरंभीं जपाननें मुकडेनवर एक महत्वाचा विजय मिळविला. त्याचवेळीं तें जर त्वरित पुढें घुसलें असतें, तर रशियन सेना पूर्णपणें शरण येऊन युद्धाचा निकाल लागला असतां; पण तीन आठवडे अखंड राहिल्यानें जपानी सेना थकली होती. यामुळें त्यांना त्वरित पुढें जातां आलें नाहीं.

१५ अक्टोबर १९०४ रोजीं लिंबा बंदराहून आपले बाल्टिक समुद्रांतील आरमार पॅसिफिक महासागरांत पाठविलें होतें. पण हें आरमार एकत्र न येतां विभागून आलें व त्याला मार्गांत पुष्कळ वेळ लागला. शेंवटीं हें आरमार २७ मे १९०५ मध्यें कोरियाच्या समुद्रकिनाऱ्यावर पोहोंचलें, पण निकराच्या लढाईत या आरमारानें जपानी आरमारापुढें एक तासहि टिकाव धरिला नाहीं, आणि त्यांतील क्रुझरें तुटून फुटून पळूं लागलीं. त्या आरमारांतील छत्तीस जहाजांपैकीं बावीस जहाजें बुडविलीं गेलीं, सहा पकडलीं गेलीं, सहा क्रुझरें तटस्थ देशांच्या बंदरांत जाऊन लपून बसलीं आणि केवळ दोन जहाजें पळून व्लेडिव्होस्टाकला पोचूं शकलीं. या युद्धांत जपानची किती हानि झाली तर टारपेडो मारणाऱ्या फक्त तीन बोटी बुडाल्या.

जुलै महिन्यांत जपाननें संघेलीन प्रदेश जिंकून घेतला आणि व्लोडेव्हेस्टाकवर आक्रमण करण्याकरितां फौज पाठविली पण तेथें पूर्ण विजय मिळेल अशी जपानला आशा नव्हती. तिकडे व्लेडिव्हेस्टाक हातांतून निघून जाईल म्हणून रशियाहि भीतिग्रस्त होता. म्हणून दोन्हीं पक्षांच्या मनांतून युद्ध बंद करावयाचें होतें म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रुजवेल्ट यानें दोन्ही पक्षांस तह करण्याची विनंति केली. रशियन आरमार नष्ट झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं रुजवेल्टची ही सूचना मान्य करण्यांत आली आणि मंचुरियाचें युद्ध बंद करण्यांत आलें.

# फिलिपीनोचें पारतंत्र्य.

एकुणिसाव्या शतकाच्या शेवटीं आशियांत स्पेनची कोणतीहि वसाहत राहिली नाहीं. पॅसिफिक महासागरांतील त्यांच्या वसाहती जर्मनी आणि अमेरिका ह्यांनीं घेतल्या. ११ एप्रिल १८९९च्या तहास अनुसरून फिलिपाईन्सचा द्वीपसमूह सुमारें सहा कोटी रुपयांस स्पेननें अमेरिकेच्या हातीं सोंपविला. आगस्ट १८९८ मध्यें अमेरिकेनें हवाई प्रांतांवर सत्ता स्थापन करून पॅसिफिक महासागरांत आपला विस्तार करण्यास आरंभ केला. यानंतर फेब्रुवारी १९०० मध्यें ब्रिटन, जर्मनी आणि अमेरिका यांमध्यें एक करारनामा झाला. त्यांत असें ठरलें कीं, सामोअन टापू जर्मनी आणि अमेरिका यांनीं वांटून घ्यावा.

हवाई बेटांवर सत्ता स्थापन करितांच अमेरिकेनें त्यांना तावडतोब कित्येक स्वराज्याचे अधिकार देऊन टाकले आणि आपल्या कॉंग्रेस-मध्येंहि त्यांचे प्रतिनिधि घेतले. परंतु सामोअन टापूची राज्यपद्धति साधारण पूर्वीप्रमाणेंच राहिली. तेथील रहिवासी अमेरिकेच्या राज्य-पद्धतिमुळें कधीं असंतुष्ट झाले नाहींत. ग्वाम हा अतिशय लहान प्रांत आहे. आणि त्यांत केवळ चौदाहजार लोकवस्ती आहे. तेथील सर्व रहि-वासी अमेरिकनांत एकरूप झाले आहेत आणि तेथें सर्वांना सक्तीचें शिक्षण दिलें जातें. तेथें आरमाराचें एक स्टेशन मात्र आहे. तेथील राज्यकारभार अमेरिकन आरमारांतील एका अधिकाऱ्याच्या हातांत आहे. सामोआ, हवाई आणि ग्वाम यांवर अमेरिकेनें तेथील प्रजेच्या संमतीनें अधिकार केला आहे. पण फिलिपाइन्सवर सत्ता स्थापन करते-वेळीं तेथील प्रजेची संमति घेतली नव्हती, जेव्हां अमेरिकेनें फिलिपाइन्स मध्यें स्पेनवर आक्रमण केलें. त्यापूर्वींच तेथील रहिवाशांनीं स्पेनविरुद्ध राज्यक्रांति करण्यास सुरुवात केली होती आणि ते स्वतंत्र होण्यास

इच्छित होते. त्यांना अशीहि आशा होती कीं या स्वातंत्र्ययुद्धांत अमेरिका आपला पक्ष घेईल व स्पेनचा पराभव करील. अमेरिकन लोक केवळ स्पॅनिश लोकांना तेथून हांकलून लावण्याकरितां तेथें गेले होते. स्वत: तो प्रांत गिळंकृत करण्याकरितां गेले नव्हते. हीच स्थिति मनिला येथील लोकांचीहि होती. प्रथम क्रांतिकारकांनीं अमेरिकनांचें स्वागत केलें, पण जेव्हां त्यांना कळून आलें कीं, आह्मीं फसलों आहोंत तेव्हां त्यांनीं अमेरिकेच्या विरुद्धहि शस्त्रधारण केलें. फिलिपाइन्सवर अधिकार करूं नये अशीं कांहीं अमेरिकन लोकांनींहि चळवळ चालविली होती; परंतु त्यांस यश आलें नाहीं. बहुतेक अमेरिकनांनीं फिलिपाइन्स बेटें अमेरिकन आधिपत्याखालीं आणण्यास संमति दिली. अमेरिकेला वसाहती स्थापन करण्याची इच्छा नव्हती; पण अनायासें हीं बेटें त्यांच्या हातीं आलीं. फिलिपाइन्स द्वीपसमूहांत लहान मोठीं मिळून तीन हजार बेटें आहेत आणि त्यांत एक कोटी लोकवस्ती आहे. त्यांत बहुतेक मलाई लोकांचाच भरणा आहे. त्यांतील बहुतेक लोकांस स्पेननें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली आहे ते स्पॅनिश भाषा बोलतात. त्याशिवाय तेथें देशभाषा बोलणाऱ्या अनेक जाति आहेत. मुसलमान लोक दहा लाख आहेत. पूर्ण रानटी लोकहि कांहीं कमी नाहींत. स्पेनच्या राजवटींत तेथें चीनी, जपानी आणि हिंदु फारच कमी होते. अमेरिकेनें आतां कायद्यानें एशियाटिकांस तेथें जाण्याची बंदी केली आहे.

अमेरिकेनें फिलिपाइन्सवर सत्ता स्थापन करतेवेळीं असें घोषित केलें कीं, तेथील लष्करी राज्यपद्धति मोडून आपण लवकरच फिलिपिनास स्वातंत्र्य देऊं; पण तेथील क्रांतिकारकांच्या मतें जर अमेरिकेनें फिलिपाइन्समध्यें हस्तक्षेप केला नसता तर आम्हीं स्पेनची सत्ता झुगारून देऊन अवश्य स्वतंत्र झालों असतों आणि ह्मणून ते पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याकरितां प्रयत्न करूं लागले. जेव्हां अमेरिकेनें फिलिपाइन्सवर ताबा करण्याचा प्रयत्न केला, तेव्हां तेथील लोक अमेरिकनांशीं लढूं लागले.

काहीं उदारमतवादी अमेरिकनांनींहि त्यांना प्रोत्साहन दिलें. अमेरिका तेथें शांतता स्थापन करण्यास पहात होती. पण कांहीं अमेरिकनच त्याला विरोध करून फिलिपिनोच्या स्वातंत्र्यास उत्तेजन देत होते. हा विरोध फार भयंकर होता आणि अजूनहि तो कायम आहे. सन १९०० मध्यें अमेरिकेनें तेथें सुव्यवस्था करण्यास आरंभ केला. त्यावेळीं पुष्कळ ठिकाणीं बंडेंहि झालीं. त्या बंडवाल्यांत असेहि पुष्कळ लोक होते कीं, जे केव्हां केव्हां अमेरिकन सीमेच्या बाहेर जाऊन अमेरिकन फौजेशीं लढत आणि पुन्हां शांत नागरिक बनून अमेरिकन हद्दींत येत. १८९९ नंतर एकाच वर्षांत तेथें अमेरिकेला आपल्या सैनिक छावण्यांची संख्या वाढवून ५३ होती ती ४१३ करावी लागली आणि तीचे सुमारें दोन हजार शिपाई मेले किंवा निकामी झाले. तेथें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करणें अतिशय कठिण आहे असें अमेरिकन सेनापति सांगत असत. यामुळें तेथील सर्व अधिकार अमेरिकन सेनापति मॅकऑर्थर ह्यास देण्यांत येऊन तेथील सैन्य वाढविण्यांत आलें. स. १९०१ मध्यें जरी पूर्ण शांतता झाली नाहीं, तरी सर्व राज्यसत्रें अमेरिकेनें आपल्या हातांत घेतलीं आणि मोठ्या द्वीपांत सुभेदार नेमण्यांत येऊन त्यांना संपूर्ण अधिकार देण्यांत आला. न्यायालयें आणि विद्यालयें वगैरे स्थापित होऊं लागलीं आणि सडका निर्माण होऊं लागल्या; पण पुन्हांहि तेथें पन्नास हजार सैनिकांची आवश्यकता भासूं लागलीच.

आणखी दोन वर्षेपर्यंत बंड चालू राहिलें. १९०३ मध्यें तेथील एका सेनापतीनें चौकशी करून असा रिपोर्ट केला कीं, अमेरिकन अधिकारी तेथील रहिवाशांशीं निर्दयतेनें वागत आहेत.

या रिपोर्टानें संपूर्ण अमेरिकेंत मोठी गडबड झाली. पुन्हां चौकशी करण्यांत आल्यावर समजून आलें कीं, वरील रिपोर्टांत फारसें तथ्य नाहीं. परंतु त्या योगानें अमेरिकेंत फिलिपाइन्सविषयीं सहानुभूति वाढीस लागली. अमेरिकेनें वसाहती स्थापन करूं नयेत आणि सर्व लोकांस

स्वतंत्र होण्यास मदत करावी असा तेथील काँग्रेसमध्यें एकसारखा घोष होऊं लागला. यावर त्यावेळचे अध्यक्ष रुजवेल्ट यानें घोषित केलें कीं, फिलिपाइन्समध्यें जितके राजकीय कैदी आहेत, तितकेही सोडून देण्यांत यावे, लष्करी कायदा दूर करावा, आणि जेव्हां पूर्ण शांतता स्थापन होईल, तेव्हां तेथें एक प्रतिनिधी सभा स्थापन करावी आणि तेथील कायदे त्या प्रतिनिधिसभेकडूनच निर्माण करण्यांत यावे. तरीहि नंतर बहुतेक श्रेष्ठ अधिकार अमेरिकन कमिशनच्याच ताब्यांत ठेवण्यांत आले. ह्याचें कारण आपल्या १९०४ च्या डिसेंबरमध्यें केलेल्या भाषणांत असें सांगितलें कीं, फिलिपिनो लोक अजूनपर्यंत आपल्या देशाचा राज्यकारभार स्वतः पहाण्यास लायक झालें नाहींत. आम्ही त्यांना सुधारलेले व सुशिक्षित बनविण्याकरितांच हा सर्व खटाटोप करीत आहोंत. त्यांना यावेळीं पूर्ण स्वातंत्र्याची आवश्यकता नाहीं तर चांगले कायदे, चांगला राज्यकारभार आणि व्यापारी उन्नति यांची आवश्यकता आहे आणि अमेरिकन भांडवल फिलिफाइन्समध्यें गुंतल्याशिवाय फिलिपिनोची उन्नतीच होणें शक्य नाहीं.

अध्यक्ष रुजवेल्टचा गोऱ्याच्या कर्तबगारीवर फाजील विश्वास होता. साम्राज्यवादी सरकारच्या नेहमींच्या सबबी पुढें करून त्यानें फिलीपिनो लोकांस धुडकावून लावलें अमेरिकेला वसाहती स्थापन करण्याची इच्छा नव्हती. पण अनायासें लाभलेले प्रांत सोडून देणें तिच्या जिवावर आलें अमेरिकन लोकांना स्वातंत्र्याकरितां प्राण पणास लावून झटणाऱ्या लोकांविषयीं सहानुभूति वाटते यांत संशय नाहीं; परंतु तत्कालीन अध्यक्ष रुझवेल्ट हा पक्का साम्राज्यवादी होता, याविषयीं संदेह नव्हता. तरी फिलिपाइन्समध्यें त्यांच्यापुढें तीन बिकट प्रश्न उभे राहिले होते. एक असा होता कीं, सर्व ठिकाणीं स्पनिश लोकांजवळ मोठमोठ्या जमिनी होत्या आणि स्पेनचा संबंध सुटल्यानें स्पेनच्या बाजारांत ज्या सवलतीच्या दरानें फिलिपाइन्सचा माल विकण्यांत येत असे त्याचप्रमाणें

अमेरिकेंतहि तो विकण्यांत यावा अशी फिलिपिनो लोकांनीं मागणी केली होती.

मुसलमानी देशावर राज्य करणाऱ्या सर्व पाश्चात्य देशांना या गुलामगिरीच्या कठिण प्रश्नानें भंडावून सोडलें आहे. आफ्रिकेंत ब्रिटनला आणि फ्रान्सला याच प्रश्नानें भंडावून सोडलें होतें. गुलामगिरी प्रचारांत असणें त्यांच्या तत्वाच्या आणि नीतीच्याविरुद्ध होतें आणि बंद केल्यास देशांत बंड होण्याचा संभव होता. जेव्हां मेजर जनरल उडसुल फिलिपाइन्सचा गव्हर्नर झाला, तेव्हां त्यानें ही दास्यत्वाची चाल बंद करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्यामुळें मूर लोकांचा भीषण विरोध दिसून आला. १९०२ मध्यें तथील गव्हर्नर जनरल टैफट स्वत: रोम येथें गेला आणि तेथं त्यानें स्पॅनिश साधूंना अर्पण करण्यांत आलेल्या भूमिविषयीं पोपशीं बोलणें चालणें केलें, त्यानें पोपास सांगितलें कीं, आम्हीं स्पॅनिश साधु जमीनदारांना तेथून धार्मिक कारणांवरून काढून टाकण्यास इच्छित नसून राजकीय आणि आर्थिक कारणांवरून काढून टाकण्यास इच्छित आहोंत. शेवटीं स्पॅनिश साधु आपल्या जमीनी स्पॅनिश सरकारच्या ताब्यांतून काढून अमेरिकन सरकारच्या ताब्यांत देण्यास कबूल झाले. अमेरिकन सरकारनें त्या जमिनी हळु हळु खरीद करून फिलिपाइन लोकांच्या ताब्यांत दिल्या आणि हा एक बिकट प्रश्न चांगल्यारीतीनें सोडविला.

व्यापारासंबंधीं पडलेला लढाहि कांहीं कमी नव्हता. फिलिपाइन्स लोकांचें ह्मणणें असें होतें कीं, आमच्या व्यापाराची वृद्धि करण्याकरितां कोणत्याहि देशाच्या आयात व्यापारावर कर बसविण्याचा आह्मांस हक्क असावा, परंतु अमेरिकन लोकांना सर्वांना मुक्तद्वार असणें व्यापारवृद्धीस जास्त हितावह आहे असें वाटत होतें. शेवटीं असें ठरलें कीं, जोंपर्यंत काँग्रेसनें कांहीं नियम केले नाहींत. तोंपर्यंत अमेरिका आणि फिलिपाइन्स या उभय राष्ट्रांनीं एकमेकांस व्यापारसंबंधीं मुक्तद्वार ठेवावें.

हवाई बेटें या ठरावांतून मुक्त करण्यांत आलीं; परंतु अनुभवानें ही पद्धति फिलिपिनो लोकांस अहितावह होऊं लागली. यामुळें फिलीपिनो लोक अधिक अधिकार मागूं लागले. कारण त्या ठरावांतील नियम असें करण्यांत आले होते कीं, त्यायोगानें अचूक अमेरिकनांचेंच हित होत असे. पण हळु हळु त्या नियमांत सुधारणा करण्यांत आल्या आणि फिलिपिनो लोकांशीं समानतेनें व्यवहार होऊं लागला.

अमेरिकन राज्यकारभाराच्या पंधरा वर्षांत फिलिपाइन्सला बराच लाभ झाला, याविषयीं संदेह नाहीं; परंतु स्वराज्याची तहान सुराज्यानें कधींहि भागत नाहीं. अमेरिकेनें त्यांच्यावर आपलीं मनरो तत्वें व तेथील रहिवाशांची इच्छा एकीकडे गुंडाळून ठेऊन फिलीपाइन्सवर सत्ता स्थापन केली होती. अमेरिकन लोक तत्वत: सर्वांस समान समजतात आणि प्रतिनिधित्वाचा अधिकार दिल्याशिवाय कोणापासूनहि कर घेणें अनुचित समजतात. अशा स्थितींत त्यांनीं फिलिफाइन्स ह्या संबंधीं आपण केलेल्या अधम प्रकाराचें आणि कारवायांचें समर्थन करूं पाहणें व्यर्थ आहे. ह्या सबबी सर्वच युरोपियन पुढें पुढें आणितात. न्यायत: त्यांत मुळींच तथ्य नसतें. १९०४ मध्यें अध्यक्ष रुझवेल्टनें फिलिपिनो लोक स्वराज्यास अपात्र आहेत असें ठांसून सांगितलें होतें, पण दोन वर्षांच्या अवधींत त्याला असें कबूल करावें लागलें कीं, हळु हळु फिलीपिनो लोकांना स्वराज्याचे अधिकार देणें आमचें कर्तव्य आहे. १९०७ मध्यें तेथील प्रतिनिधि सभेला ठराव आणण्याची परवानगी देण्यांत आली पण प्रतिनिधि निवडून देणाऱ्या मतदारांचें क्षेत्र अतिशय संकुचित होतें. त्यावेळीं तेथील सुमारें एक लाख लोकांना मत देण्याचा अधिकार होता.

१९१० मध्यें बहुतेक सर्व आशिया खंडांत राष्ट्रीयत्वाची भावना उचंबळून आली. त्यावेळीं फिलिपाइन्समध्येंहि कांहीं गडबड झाली. ती गडबड शमविण्याकरितां जादा सैन्य ठेवावें लागलें. १९१२ मध्यें पुन्हां फिलिपाइन्सला स्वातंत्र्यदान करण्याची चर्चा जारीनें होऊं लागली. फिलि-

पिनो लोकांना त्वरित स्वातंत्र्यदान करण्याविषयीं एक बीलहि तयार करण्यांत आलें होतें. आणि २९ आगस्ट रोजीं तें बीलहि पास करण्यांत आलें. परंतु त्यायोगानें फिलिपिनो लोकांचें समाधान झालेलें मुळींच दिसून येत नाहीं. जरी तेथील प्रतिनिधि सभेची निवडणूक करण्याचें पूर्णपणें फिलिपिनो लोकांच्या हातांतच आहे तरी वरिष्ठ अधिकार अमेरिकेनें आपल्या हातांत ठेवलेला आहे.

परंतु अमेरिकन सत्तेमुळें फिलिपिनो लोकांचें पुष्कळच हित झालें आहे. गेल्या तीस वर्षांत तेथें शिक्षणाची पुष्कळच वाढ झाली आहे. तेथें सुमारें ७ हजार शाळा असून त्यांत ९ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सर्व विद्यालयांत इंग्रजींतून शिक्षण देण्यांत येतें यांशिवाय सुमारें दोनशें खासगी विद्यालयें आहेत. त्या विद्यालयांतून तीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत असतात. ह्या शिक्षण प्रचाराचें पूर्ण महत्व त्या बेटांच्या आसपास असलेल्या इंडोचायना आणि इस्टइंडिज या फ्रान्सच्या आणि हालंडच्या वसाहतींत त्या राष्ट्रांनीं शिक्षणप्रसाराची किती हेळसांड केली आहे त्यावरून कळून येतें. फिलिफाइन्सपेक्षां इजिप्त देश अधिक संपन्न आहे आणि तेथील उत्पन्नहि अधिक आहे; संपन्नताहि फिलिपाइन्सपेक्षां कमी नाहीं. तरीहि प्रस्तुतकालीं तेथील इंग्रजी स्कुलांत केवळ चाळीस हजार विद्यार्थी आहेत आणि प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दोन लाखांपेक्षां जास्त नाहीं इजिप्तच्या इंग्रजीसत्तेविरुद्ध मुख्य हीच तक्रार आहे. शिक्षणप्रसाराकरितां अमेरिकेनें जितके प्रयत्न केले आहेत तितके अन्य कोणत्याहि युरोपियन राष्ट्रानें आपल्या वसाहतींत केलेले नाहींत.

साम्राज्यवादाचे पक्षपाती सांगतात कीं, अंकित देशांतील लोकांना शिक्षण देण्याचा परिणाम चांगला होत नाहीं. कारण जे लोक स्वातंत्र्या-करितां प्रयत्न करीत असतात ते बहुतकरून सुशिक्षितच असतात.

ह्या स्थितींत अंकित देशांतील लोकांना आपली स्थिती समजून न यावी ह्मणून त्यांना अशिक्षितच ठेवणें योग्य आहे. साम्राज्यवादी लोक अंकित राष्ट्रांतील लोकांना अशिक्षित ठेऊन त्यांच्या धनाचें अपहरण करूं इच्छितात.

अमेरिकेनें फिलिपाइन्समध्यें शिक्षणप्रसाराचें जें प्रशंसनीय कार्य केलें आहे, त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आतां तेथील रहिवासी पूर्ण स्वातंत्र्याची चळवळ करीत आहेत. अमेरिकेनेंहि इतर राष्ट्रांच्या मानानें आपल्या वसाहतीला पुष्कळ स्वराज्याचे अधिकार दिले आहेत. फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्य चळवळीस अमेरिकेचा फारसा विरोध नाहीं. गत महायुद्धानंतर जी तहपरिषद् झाली त्यावेळीं स्वराज्याची चळवळ करण्याकरितां एक फिलिपिनो पुढाऱ्यांचें कमिशन अमेरिकेंत गेलें होतें. तेथील वर्तमानपत्रें आणि अधिकारी यांनीं त्या शिष्टमण्डळाचें उत्तम स्वागत केलें. परंतु अजूनहि तेथील स्वातंत्र्याची चळवळ शांत झालेली नाहीं. अमेरिकेनें तत्वांचा कितीहि घोष केला, तरी डॉलर हाच परमेश्वर समजण्याची त्यांची प्रवृत्ति मुळींच नष्ट होत नाहीं.

—०—

# आशियांत रशिया.

रशियन साम्राज्याचें जन्मस्थान आणि केंद्र मास्को शहर हें आहे. रशियानें पहिल्या प्रथम येथूनच आपले हातपाय पसरण्यास आरंभ केला होता. आसपासचे प्रांत आपल्या हस्तगत करीत करीत आणि ते प्रांत आपल्या साम्राज्यांत मिळवीत मिळवीत तो पुढें चालूं लागला. ही आपली प्रगति त्यानें इतक्या विस्तृत प्रमाणांवर चालविली होती कीं, स. १९१४ सालीं रशियन साम्राज्यांत जितक्या भूमीचा अंतर्भाव होत होता तितका अन्य कोणत्याहि साम्राज्यांत होत नव्हता. पित समुद्रापर्यंत

पोहोंचण्याकरितां रशियानें हे परिश्रम चालविले होते. सन. १९१७ सालीं रशियांत राज्यक्रांति झाली नसती तर संपूर्ण चीनदेशहि रशियाच्या साम्राज्यांत समाविष्ट होण्याचा संभव होता. परंतु त्या राज्यक्रांतिमुळें रशियन साम्राज्याचा विस्तार संपुष्टांत आला. रशियन साम्राज्य संपुष्टांत येण्याचें कारण इतर राष्ट्रांनीं त्याचे प्रांत हिरावून घेतले हें नसून त्यानेंच आपल्या जुन्या धोरणाचा पूर्णपणें त्याग केला हें आहे. तहपरिषदेनें रशियन साम्राज्यांतील फिनलंड, बाल्टिक प्रांत, लिथुआनिया, पोलंड, उक्रेनिया, जार्जिया आणि आर्मिनिया या प्रांतांची मुक्तता केली होती. परंतु रशियन साम्राज्याचा फार मोठा भाग रशियामध्यें होता ह्याच कारणामुळें रशियांत झारशाहीचा अंत झाल्यावर आशियांतील प्रत्येक देशाच्या भवितव्यतेवर त्याचा फार परिणाम झाला आणि त्यानंतर आशियांतील प्रत्येक देशाला स्वातंत्र्याचीं सुखस्वप्नें फार मोठ्या प्रमाणावर पडूं लागलीं. जेव्हां रशिया आणि जपान ह्यांचें युद्ध झालें, तेव्हां आशियांतील पुष्कळ लोकांना समजून चुकलें कीं, आतां युरोपियनांचें वर्चस्व नष्ट होण्याच्या पंथास लागलें पण १९१७ च्या रशियन राज्यक्रांतिनंतर स्वतः रशियानेंच घोषित केलें कीं, आम्हीं अन्य राष्ट्रांवर अनुचित वर्चस्व ठेऊं इच्छित नाहीं. सध्या रशियांत जी नवी परिस्थिती उत्पन्न झाली आहे, तिचें चांगल्या रीतीनें ज्ञान होण्यास रसियानें आशिया खंडांत कोणत्या रीतीनें आपल्या साम्राज्याचा विस्तार केला होता, त्याचें यथातथ्य ज्ञान होणें आवश्यक आहे.

आशियाखंडांत रशियाच्या आधीन केवळ दहा कोटी लोक आहेत; परंतु त्याच्या अधिसत्तेखालीं साठ लाख चौरस मैल भूमि म्हणजे सर्व आशियाखंडाचा एक तृतियांश आहे. रशियाची हद्द इराण, अफगाणिस्थान, चीन आणि जपान ह्यांच्या सरहद्दींना मिळाली आहे आणि आशियाखंडांत रशियन साम्राज्याच्या आधिन सायबेरिया, काकेशिया आणि तुर्कस्थान इत्यादि प्रांत आहेत. आशियाचे उत्तरेस युराल पर्वता-

पासून पॅसिफिक महासागरापर्यंत सायबेरिया देश पसरला आहे, यांत पुष्कळ विस्तृत प्रांत आणि प्रदेश आहेत; परंतु तो देश थोडा नापीक आहे. त्याचें क्षेत्रफळ सुमारें पन्नास लक्ष चौरस मैल आहे आणि ट्रान्स सायबेरियन रेलवे होण्यापूर्वी तेथें सुमारें पन्नास लक्ष लोकवस्ती होती. अर्थात तेथें एका चौरस मैलास एक मनुष्य वास करीत होता. यांत दहा लक्ष लोक तेथील मुळचे रहिवासी होते, व सुमारें तीन चतुर्थांश लोक युरोपियन रशियाच्या हद्दीजवळ असलेल्या प्रदेशांतून तेथें येऊन राहिले होते. यांत आपल्या मुलांबाळांना घेऊन एकुणिसाव्या शतकाच्या शेवटीं सैबेरियांत येऊन राहिलेल्या रशियन शेतकऱ्यांचीच जास्त संख्या होती.

टॉन्स सैबेरियन रेलवे तयार करण्यास १८९५ सालीं आरंभ झाला आणि १९०३ सालीं ती पूर्ण झाली. ही रेलवे झाल्यानंतर पंधरा वर्षांतच तेथील लोकवस्ती दुप्पट झाली, व जसजशी ती रेलवे पूर्वेकडे वाढूं लागली तसतसी सैबेरियाची भरभराट होऊं लागली. जरी रशियानें नवीन कायदे निर्माण करून परकीय लोकांनीं सायबेरियांत वस्ती करून राहण्याच्या मार्गांत पुष्कळ अडचणी आणल्या तरी सायबेरियाच्या पूर्वभागांत पुष्कळ चिनी, जपानी, मंचु आणि कोरियन लोक येऊन राहिलेच. रूसो-जपानी युद्धांत रशियाचा पराजय झाल्यामुळें ह्या पूर्व सायबेरीयावर फारच परिणाम झाला व तो १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर दिसून आला. ह्या क्रांतिनंतर बैकल सरोवराच्या पूर्वेस रशियाची सत्ता ह्मणून नाहींशीच झाल्यासारखी झाली व ट्रान्स बैकलिया, आमूर आणि मेरिटाइम हे प्रांत जपानच्या हातांत गेल्यासारखेच झालें. फक्त यार्कटुस्क प्रांतानें मात्र मे १९१८ मध्यें आपलें स्वातंत्र्य घोषित करून बोलशेविक पद्धतिवर राज्यकारभार सुरू केला.

ही झाली पूर्व सायबेरियाची गोष्ट परंतु पश्चिम सायबेरियानें सर्व बाबतींत रशियाचेंच अनुकरण केलें. जरी टोमस्क येथें डिसेंबर १९१७

मध्यें सायबेरियन लोकसत्तेची घोषणा झाली, तथापि त्यानें आपली सर्व राज्यव्यवस्था रशियाच्याच धर्तीवर सुरू केली व रशियाचेंच राष्ट्रीय निशाण स्वीकारलें. ५ फेब्रुवारी १९१८ रोजीं रशियाच्याच धर्तीवर तेथें ड्युमा स्थापन करण्यांत आली आणि मंत्रिमंडळहि बनविण्यांत आलें. परंतु सायबेरियाच्याच या नव्या सरकारास आपल्या देशाची सुधारणा करतां आली नाहीं, किंवा योग्य व्यवस्थाहि ठेवतां आली नाहीं. पेट्रोग्रॅड-हून राज्यक्रांतिमुळें जे पुष्कळ लोक सायबेरियांत पळून आले होते, त्यांनी तेथील ड्युमा सभेत आपलें बहुमत केलें व कांहीं दिवसांनीं त्यांनी तो प्रांत बोलशेविक रशियांत सामील केला. सायबेरियाच्या अन्य प्रांतांत कांहींहि जरि झालें, तरी पश्चिम सायबेरिया नेहमीं रशियांतच समाविष्ठ होऊन राहणार यांत संशय नाहीं. कारण तेथील लोकवस्तीपैकीं शे. ९० लोक रशियन आहेत व त्यांना पूर्णपणें ठाऊक आहे कीं, रशियाशीं फटकून राहिल्यानें सायबेरीयाची आर्थिक हानि झाल्याशिवाय राहणार नाहीं. तेथें गव्हांची लागवड फार होत असते व त्यांत नफाहि चांगला राहतो. आसपासच्या रशियनांच्या आगमनानें तेथील शेतकीची भरभराट होत आहे व त्याचबरोबर जनतेची संपन्नताहि वाढत आहे. जर रशियाची बोलशेविक राजवटीमुळें चाललेली भरभराट अशीच कायम राहिली तर पूर्वेकडील प्रांत जे रशियांतून फुटून निघाले आहेत, ते त्यांत समाविष्ट होण्याचा बराच संभव आहे. परंतु मंगोलिया व मांचुरिया हे प्रांत मात्र पुन्हां युरोपियनांच्या अधिसत्तेखालीं जातील असें वाटत नाहीं. रशियानें मनांत कितीहि जरी मांडे खाल्ले, तरी तो आतां पॅसिफिक महासागरापर्यंत हातपाय पसरूं शकत नाहीं. आणि कित्येक वर्षांपासून तो आचरणांत आणीत असलेलें साम्राज्यशाही विनाशनाचें धोरणहि त्यास अनुसरून नाहीं. आतां २५ वर्षांपूर्वीं रशियाचा पराभव करून जपाननें मनांत जी आशा बाळगिली होती, ती पूर्ण होण्याच्या पंथास लागली आहे. कारण जर युरोपियन राष्ट्रें बोलशेविकाविरुद्ध युद्ध आरंभतील तर

जपानला पुढें सरून आपली पुष्कळ दिवसांची आशा पूर्ण करण्यास संधि मिळेल.

ट्रान्स-काकेशिया प्रांत कॉकेशस पर्वताच्या दक्षिणेस व काळासमुद्र आणि कास्पियन समुद्र यांच्यामध्यें आहे. तेथील जमीन अतिशय सुपीक आहे. त्या देशांत सुमारें एक लक्ष चौरस भूमि आहे. त्यांत कांहीं डोंगराळहि जमीन आहे. या देशाची लोकवस्ती सुमारें पंचाहत्तर लक्ष आहे. यांत अनेक धर्मांचे, अनेक जातींचे आणि अनेक सांप्रदायाचे लोक आहेत. ह्या देशाची सीमा इराण आणि टर्की यांच्याशीं भिडते. इराणची व या देशाची जी हद्द आहे ती नैसर्गिक दृष्टीनें तर योग्य आहेच. परंतु ऐतिहासिक व राष्ट्रीय दृष्टीनेंहि योग्य आहे; पण तुर्कस्थानशीं जी हद्द भिडलेली आहे, ती बिलकूल योग्य नाहीं. कारण ती १८७७ च्या युद्धानंतर मनमानेल तशी आंखून घेण्यांत आली होती. या हद्दीमुळें आर्मिनियन लोकांचें पूर्णपणें विभक्तिकरण होत आहे. ट्रान्स काकेशियावर रशियानें पुष्कळ काल खपून मोठ्या परिश्रमानें सत्ता स्थापन केली होती. प्रथम टर्कीकडून रशियानें दोन वेळां संग्राम करून हा प्रांत जिंकून घेतला; पण येवढ्यानेंच त्याचा कार्यभाग झाला नाहीं. पुन्हां त्याला येथील रहिवाशांशीं पुष्कळ काळपर्यंत लढावें लागलें. रशिया जसजसा तुर्कांचा मुलूख गिळंकृत करीत चालला तशतशी त्याची भूमितृष्णा अधिकाधिकच वाढत चालली. प्रथम हळु हळु करतां करतां रशिया काळ्यासमुद्रालगत पोहोंचला; पण तेथें जातांच ट्रान्स काकेशियाची सुपीक भूमि त्याच्या दृष्टिपथांत आली आणि जेव्हां त्यानें ट्रान्सकाकेशियावर सत्ता स्थापन केली, तेव्हां त्यास पुढें जाण्यास आणखीहि दोन मार्ग दिसूं लागले. एक मार्ग इराणांतून इराणच्या खाडीपर्यंत जाण्याचा होता आणि दुसरा तुर्कस्थानांतून भूमध्य समुद्राकडे जाण्याचा होता. साम्राज्याचा विस्तार करीत करीत रशिया ट्रान्स काकेशियापर्यंत आला व तेथें पोहोंचतांच त्याला पुढें येण्याची अनिवार

इच्छा झाली. साम्राज्यतृष्णेचा असा एक अबाधित नियम आहे कीं, तीची दृष्टी तहाच्याद्वारें निश्चित झालेल्या हद्दीच्या बाहेर राहते आणि ट्रान्स काकेशियांत तर रशियाला अपेक्षेपेक्षां जास्त लाभ झालेला. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून त्या देशांतील तेलाच्या खाणी जगांतील सर्व खाणीपेक्षां अधिक तेल देऊं लागल्या. तेथील तेलाची आयात अमेरिकेच्या निंपट होऊं लागली. रशियन राज्यक्रांति-पूर्वी तेथें दहाकोटी मण रूई पिकत असे. सुमारें एक कोटी एकर तेथें जंगलच आहे, त्यापासून खूप उत्पन्न मिळत असे व तें दिनप्रतिदिन वाढत जात होतें. कोळशाच्याहि तेथें पुष्कळ खाणी होत्या. आर्थिक आणि राजकीय ह्या दोन्ही दृष्टीनें ट्रान्सकाकेशियाचें महत्व पुष्कळ होतें. यामुळें रशियानें तेथें रेल्वे बनविल्या, बाटूम व बाकू येथील बंदरें दुरुस्त केलीं आणि कास्पियन समुद्रांत मोठ्या आगबोटी नेण्यास प्रारंभ केला. ज्या रेल्वे बनविल्या होत्या त्यांपैकीं एक फांटा तुर्की सरहद्दीपर्यंत आणि दुसरा फांटा इराणच्या सरहद्दीपर्यंत नेला.

गत महायुद्धाच्या प्रारंभीं रशियानें उत्तर इराणांत आपली सत्ता स्थापन केली होती व बगदादच्या उत्तरेस ते इंग्रजांशीं भिडले होते. १९१६ मध्यें त्यानें तुर्कांवर चांगला विजय मिळविला होता. १८७७ मध्यें ज्या आर्मिनियाला घशांत टाकण्यास त्यानें प्रारंभ केला होता त्यास यावेळीं त्यानें पूर्णपणें घशांत टाकलें. ट्रेबिझांड, अर्झरूम, वान आणि बिटलीस इत्यादि शहरें त्याच्या हस्तगत झालीं; पण मार्च १९१७ च्या राज्यक्रांतीनें इराण व तुर्कस्थान यांतून रशियानें आपले हात काढून घेतले, आणि तो आजरबायझन व आर्मिनिया प्रांत सोडून देता झाला. जेव्हां बोलशेविक लोक अधिकारारूढ झाले, तेव्हां त्यांनीं जास्तच औदार्य प्रकट केलें. बेस्टालिस्टोविस्क येथें जो तह झाला त्यास अनुसरून रशियानें महायुद्धांत नवे जिंकलेले नव्हे तर १८७७ सालीं जिंकलेलेहि प्रांत सोडून दिले, आणि सोव्हियेट सरकारनें स्पष्टपणें असें

घोषित केलें कीं, रशिया बळजबरीनें कोणताहि प्रांत आपल्या अधिसत्तेखालीं ठेऊं इच्छित नाहीं. जेव्हां बाटूमवर तुर्कांची सत्ता स्थापन झाली तेव्हां त्यानें ब्रेस्ट लिस्टोविस्क येथें निश्चित झालेल्या हद्दीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं व बोलशेविकांच्या औदार्याचा फायदा घेऊन बाकूच्या रोखानें पुढें येण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं बाकूमध्यें थोडेसे आर्मिनियनहि होते. त्यांच्या मदतीच्या निमित्तानें कास्पियन समुद्र उल्लंघन करून इराणांतील कांहीं इंग्रज लोकांनीहि त्या शहराकडे आपला मोर्चा वळविला; परंतु तुर्कांची संख्या अधिक असल्यानें आर्मिनियनाचें व इंग्रजांचें त्यांच्यापुढें कांहीं चाललें नाहीं व त्यावेळीं तुर्कांनीं तें शहर सर केलें; पण हा विजय तुर्कांना जास्त काळ अनुभवावयास सांपडला नाहीं, पॅलेस्टाइन आणि सिरिया यांमध्यें तुर्कांना चेपीत चेपीत इंग्रज लोक पुढें सरूं लागले आणि जेव्हां युद्ध बंद झालें, तेव्हां तुर्कांस आपल्या पूर्वीच्या हद्दीपर्यंत तहास अनुसरून मागें परतावें लागलें. तेव्हां इंग्रजांनीं पुन्हां बाकूवर सत्ता स्थापन केली व तहपरिषदेच्या सुमारास ट्रान्सकाकेशिया प्रांतांत शहरोंशहरीं आपली फौज रक्षणार्थ ठेवली. युद्धाच्या अंतिम दिवसांत ट्रान्सकाकेशिया प्रांतांत दोन राज्यें स्थापन झालीं होतीं व आर्मिनिया आणि दुसरें जॉर्जिया युद्ध बंद होण्याच्या कांहीं पूर्वीं हीं दोन्हीं राज्यें दोस्तांच्या वतीनें युद्धांत समाविष्ट झालीं होतीं व त्यामुळें तहपरिषदेंत त्यांना आपला प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकारहि मिळाला होता.

आशियाखंडांत रशियानें जे विजय मिळविले होते. ते बहुतेक आर्मेनियन लोकांच्या सहाय्यानें मिळविले होते. त्यांच्या मदतीशिवाय रशियाला तुर्कांवर कधींच विजय मिळाला नसता. तुर्कांनीं आपल्या सत्तेखालील आर्मिनियन लोकांवर जे अत्याचार केले होते त्यांची वार्ता तेथून पळून आलेल्या लोकांकडून ऐकून ट्रान्सकाकेशियां-

तील आर्मिनियन लोकांना फार चेव आला होता, आणि त्या भीषण जुलमापासून स्वबांधवांचें रक्षण करण्याकरितां ते पुढें घुसले होते. त्याच-मळें रशियाला तुर्कांवर विजय मिळाला. जेव्हां रशियन झारशाही नष्ट झाली, तेव्हां बोलशेविकांनीं अनेक प्रयत्न केले, तरी आर्मिनियन लोकांनीं आपल्या संघटणाचा त्याग केला नाहीं. युद्धाच्या अंतिम दिव-सांत मध्य आशियांत केवळ या आर्मिनियन लोकांचाच दोस्त राष्ट्रांना प्रबल पाठिंबा मिळाला. ट्रान्सकाकेशियांत वीस लाख आर्मिनियन वस्ती होती. तुर्कस्थानांतून पळून आलेल्या आणखीही कित्येक लक्ष लोकांची त्यांत भर पडली. बेस्ट लिस्टोविस्क येथील तहाचे वेळीं हे रशियाचे सहाय्यक होते. पण या तहान्वयें रशियानें त्यांचा परम शत्रु असा जो टर्की त्याच्या अधिसत्तेखालीं आर्मिनिया प्रांत दिला. या घटनेमुळें त्या लोकांनीं आपलें एक स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन केलें, आणि मोठ्या परिश्रमानें अनेक विपत्तींपासून त्या राज्याचें संरक्षण केलें. तह-परिषदेंत त्यांच्या प्रतिनिधीनें सांगितलें होतें कीं, भूमध्यसमुद्रापासून काळ्यासमुद्रापर्यंत एका सामर्थ्यसंपन्न आर्मिनियन राष्ट्राची स्थापना करावी अशी आमची इच्छा आहे.

जार्जियन सरकारच्या प्रतिनिधीनेंहि तहपरिषदेंत अशी आशा प्रदर्शित केली होती कीं, राज्यक्रांतिनंतर रशियाच्या सत्तेखालीं सर्व प्रांतास स्वयंनिर्णयाच्या तत्वावर स्वातंत्र्य मिळावें, आह्माला रशियापासून विभक्त होण्याची इच्छा नाहीं; परंतु बोलशेविक राजवटींत रशियाला स्वास्थ मिळेल असें आह्माला वाटत नाहीं. ह्मणूनच आह्मी स्वतंत्र लोक-सत्ताक राज्य स्थापन केलें होतें; पण रशिया व टर्की यांनीं अनेक कारस्थानें करून तें राज्य नष्ट केलें. ब्रेस्टालिस्टोविस्कच्या तहानंतर तार्तार लोक तुर्कांना मिळाले. जेव्हां जॉर्जियनांनीं त्या तहांतील अटी पाळण्याचा इन-कार केला, तेव्हां तुर्कांनीं कार्स व बाटूम हीं शहरें आपल्या ताब्यांत घेतलीं आणि तेथील जार्जियनांची व आर्मिनियनांची अमानुष कत्तल

केली. यामुळें जेव्हां जून १९१८मध्यें ख्रिस्ती लोकांचें रक्षण करण्याच्या निमित्तानें जर्मनीनें त्या देशाच्या राज्यकारभारांत हात घातला तेव्हां आर्मिनियनांना आणि जॉर्जियनाना कळून चुकलें कीं, जर्मनीच्या कक्षेंत गेल्याशिवाय तार्तारापासून आपलें रक्षण होऊं शकत नाहीं, तेव्हां त्यांनीं टिफलीस येथें स्थापन केलेली आपली लोकसत्ता नष्ट केली व आपलीं भिन्न भिन्न राज्यें स्थापन केलीं. जरी जॉर्जियाचें सरकार स्वतंत्र होतें तरी त्यावर ट्रास काकेशियाची वरिष्ठ सत्ता ठेवण्याचें निश्चित झालें. या व्यवस्थेमुळें त्या उभय राष्ट्रांची पुष्कळ हानी झाली, व त्याच्या एकीकरणांत मोठें विघ्न आलें; पण नाइलाजाने त्यांना ती व्यवस्था त्या वेळीं मान्य करावी लागली.

ट्रान्स काकेशियांतील आर्मिनियन व तुर्कस्थानांतील आर्मिनियन जर एक झालें तर भविष्यकालीं त्यांचें फार कल्याण होण्याचा संभव आहे. परंतु जार्जियन लोकांना आपल्या नव्या प्रदेशाचें भावि जागतिक महायुद्धांत संरक्षण करितां येईल कीं नाहीं. याबद्दल जबरदस्त संशय आहे. आर्मिनियन लोक तुर्त कोणत्याही मोठ्या राष्ट्राच्या संरक्षणाखालीं जाण्यास तयार आहेत; परंतु जार्जियनाना ती गोष्ट पसंत नाहीं पण ही त्यांची चूक आहे; कारण जो प्रांत जार्जियन लोकांना आपल्या अधिसत्तेखालीं राखण्याची घमेंड आहे. तेथील लोकसंख्या चाळीस लक्ष आहे; व त्यांत केवळ जार्जियनांची लोकवस्ती तेरा लक्षच आहे. त्यांच्यापेक्षां तुर्कांची व तार्तारांची लोकवस्ती त्यांत जास्त आहे आणि त्याशिवाय तेथें कांहीं इराणी लोकहि आहेत. वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, ह्या प्रांतांत अनेक जातींचे लोक राहत असल्यानें कोणत्याहि एका जातीच्या हातीं मुख्य सत्ता असणें कोणालाहि पसंत नाहीं. जार्जियन लोक जरी तेथें एक स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या उद्योगांत असले तरी तेथें झालेल्या अनेक जातींच्या मिश्रणामुळें त्यांना पुष्कळ अडचणी आहेत, एक वेळ आर्मिनियन, जार्जियन आणि तार्तार मिळून

संयुक्त सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न झाला होता, पण आपणांतील चुरशीमुळें तो कारभार औट घटकाहि टिकला नाहीं. यासंबंधीं तह परिषदेनें दिलेला निर्णयहि अतिशय घोंटाळ्याचा आहे; कारण रशियाशीं त्या देशाचा घनिष्ठ संबंध आहे. त्या देशाची सर्व प्रकारची उन्नति व राजकीय महत्व रशियावरच अवलंबून आहे. त्याला रशियाशीं फटकन वागणें शक्य नाहीं.

परंतु ही परिस्थिति पूर्णपणें जाणूनहि स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्या-करितां दुर्बल देशाच्या संरक्षणाच्या नांवाखालीं इंग्रजांनीं तेथें जी कारवाई चालविली आहे ती पाहून कोणाहि नीतिमान मनुष्यास चीड आल्याशि-वाय राहणार नाहीं. स. १९१९ च्या प्रारंभीं ब्रिटिश सैनिक विभागानें निश्चित केलें होतें कीं, सैन्याच्या जोरावर ट्रान्स—काकेशिया कबजांत घ्यावा व त्यावरील रशियाची सत्ता अजिबात उडवून टाकावी. यांत इंग्रजांना दोन मोठे फायदे आहेत. एक फायदा असा आहे कीं, बाकू येथील तेलाच्या खाणी इंग्रजांच्या ताब्यांत येतील आणि दुसरा असा कीं, पुढें मागें रशिया इराणांत घुसण्याची भीति राहणार नाहीं याकरितां इंग्रजांनीं आर्मिनियनाची उपेक्षा करून तातारांची मनधरणी करण्याचें धोरण अंगिकृत केलें व आपल्या संरक्षणाखालीं तातारांचे आझरबायझन येथें लोकसत्ताक राज्य स्थापन केलें या प्रदेशांत पूर्व काकेशिया व तेलाच्या मुख्य खाणीं यांचा समावेश होत होता. याप्रकारें एका लोक-सत्ताक राज्याची स्थापना करून आपला आणखीहि एक पित्ता इंग्रजांनीं तहपरिषदेंत घुसविला. त्याचप्रमाणें काराबाग येथें सुभेदार म्हणून एका ताताराची नेमणूक केली. खरोखर पहातां काराबाग प्रांत हा आर्मियाचा प्रांत होता; पण मुद्दाम फोडा आणि झोडा ह्याच तत्वावर तेथें सत्ता गाजविण्यास गेलेल्या इंग्रजांना त्याचें काय होय ? यानंतर एका इंग्रज अधिकाऱ्यानें आर्मिनियनांवर जुलूम करण्यास या तातारास भर दिली आधींच त्या दोन जातींत द्वेष वसत होता, त्यांत ही भर मिळाल्यामुळें

शुसा नामक स्थानीं ह्या तार्तार सुभेदारानें आर्मिनियन लोकांची भयंकर कत्तल केली. इकडे बोलशेविकांवर जें जनरल डेनिकीन यानें आक्रमण केलें होतें, त्यास कांहीं इंग्रज मदत करीत होते, तर तिकडे रशियाचें जूं झुगारून देण्यास ते तार्तार व जॉर्जियन लोकांसहि चिथावणी देत होते. अशा घरफोडीच्या धोरणानें रशियाची सत्ता तेथें साफ नामशेष करून इंग्रजांची सत्ता त्या प्रांतांत दृढ करावी असा त्यांचा इरादा होता ते इकडेहि सहाय्य देत आणि तिकडेहि मदत करीत ह्यावरून साम्राज्य-तृष्णेनें व्याकूल बनलेल्या लोकांचीं तत्वें आणि नीति कोणत्या प्रकारची असते. ह्याचा चांगला बोध होतो. कदाचित् त्यांचा असा ठाम सिद्धांत असेल कीं, साम्राज्य वृद्धीकरितां कसलींहि नीच कृत्यें केलीं तरी तीं क्षम्य आहेत. त्यांत अनौचित्य किंवा अन्याय ह्याचा प्रवेशहि होऊं शकत नाहीं.

मध्य आशियांतील कांहीं प्रदेश ज्यांत यूरालस, तुरगई अकमोलिन्स्क आणि सेमीपेलाटिन्स्क या प्रदेशांचा समावेश होतो, त्या प्रांतांस तुर्कस्थान असें म्हणतात. तेथें इतकी विलक्षणता व गुप्तता आहे कीं, त्या देशाचें भवितव्य काय होईल हें निश्चित सांगतां येत नाहीं. भविष्यकालीं त्याचे राजकीयसंबंध कसे आणि कोणत्या राष्ट्रांशीं घडून येतील याचाहि अंदाज करतां येत नाहीं. या सर्व प्रांतांत मिळून कित्येक जातींची सुमारे चाळीस लाख लोकवस्ती आहे. युरालसमध्यें तेथील मूळ रहिवाशी राहतात व ते बहुतेक मासळी मारून आपला उदरनिर्वाह करितात. अकमोलिन्समध्यें पुष्कळ रशियनलोकांनीं जाऊन वस्ती केली आहे व ते शेतकीवर आपला चरितार्थ चालवितात तेथील डोंगरांत तांबे, कोळसा आणि सोनें ह्यांच्या खाणी असल्यानें अन्य युरोपियन लोकहि तेथें फार मोठ्या प्रमाणांत जाऊन राहूं लागले आहेत; या चारी प्रदेशांत कांहीं मुसलमान तुराणीहि आहेत. ते जनावरें पाळतात व आपली उपजिविका करितात. त्या देशांत पाण्याची फारच टंचाई आहे. जर तेथें पाण्याची विपुलता करतां येईल, तर उत्कृष्ट शेती होण्यायोग्य जमीन विपुल आहे.

आणि दळणावळणाचे सोयीस्कर मार्ग तयार झाले तर तेथील खाणीहि फार फायदेशीर होण्यासारख्या आहेत. त्यांची भौगोलिक स्थिति लक्षांत घेतां कांहीं कालानें युरालस युरोपियन लोकांची वसाहत बनेल; पण बाकीचे तीनहि प्रांत सर्व दृष्टीनें आशियाटिकच राहतील यांत संशय नाहीं.

तुर्कस्थानची भूमि वाळवंटांनीं व पहाडांनीं व्यापून गेलेली आहे. त्याच्या पश्चिमेस खिवा व दक्षिणेस बुखाऱ्याचें संरक्षित राज्य आहे. यांत अगदीं तुरळक लोकवस्ती आहे. कास्पियन समुद्रापासून इराण आणि अफगाणिस्थान ह्यांच्या सरहद्दीपर्यंत जितका प्रांत आहे, त्याला ट्रान्स कास्पियन असें नांव आहे. पूर्वीं या देशाचा बहुतेक भाग उजाड होता. पण आतां तेथें रेल्वे वगैरे झाल्यानें आर्थिक आणि राजकीय दृष्टीनेंहि त्याचें महत्व वाढलें आहे. ही रेल्वे कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यापासून इराणच्या उत्तर सरहद्दीपर्यंत जाऊन बुखारा, खोकंद मार्गानें अफगाणिस्थानच्या सीमेपर्यंत आली आहे, थोड्याशा परिश्रमानें आणि खर्चानें ती इराणच्या खुरासान व अफगाणिस्थानच्या हिरात प्रांताला भिडवितां येत होती; पण इंग्रजांना रशियाची भीति वाटत होती, ह्मणून रेलवेचा हा संयोग होऊं शकला नाहीं. इराणचा व अफगाणिस्थानचा रेल्वेमुळें जरी कितीहि फायदा झाला तरी इंग्रज लोक आपल्या प्रतिस्पर्ध्यानें त्या देशांत रेल्वे बांधणें कधींहि सहन करणार नाहींत. कारण इंग्रज बलवान् आहेत जर त्यांना आपला लाभ कधीं-काळीं होणार अशी आशा वाटली तर इराण आणि अफगाणिस्थान यांना आपला फायदा करून घेण्यास अनेक कारस्थानांनीं प्रतिबंध करणें ही त्यांची नेहमीची कारवाई आहे.

मध्य आशियामध्यें बुखारा आणि खिवा हीं दोन देशी संस्थानें आहेत. त्यांत उजबेक लोकांची वस्ती आहे. हीं दोन्हीं संस्थानें पूर्वीं रशियाच्या संरक्षणाखालीं होतीं. तैमूरच्या विशाल साम्राज्याचे अवशेष ह्मणून केवळ हीं दोन संस्थानेंच शिल्लक आहेत. तीनहि बाजूनें आंत घुसून रशियानें

ग्रा संस्थानची भूमि संपुष्टांत आणिली होती. खीवाचा पुष्कळ प्रदेश हिरावून घेऊन ट्रान्स कास्पियन प्रांत व बुखारापासून कित्येक प्रांत, हिरावून घेऊन तुर्कस्थान देश बनविण्यांत आला. स. १८७३ मध्यें बुखारा रशियाचे संरक्षणाखालीं आला आणि तेथील अमिरानें असें कबूल केलें कीं, रशियाच्या परवानगीशिवाय आपण कोणत्याहि परकीय लोकांना आपल्या संस्थानांत थारा देणार नाहीं. खीवाच्या खानानें १८७० मध्यें झारचें प्रभुत्व मान्य केलें. १८७२ मध्यें रशियानें खीवावर आक्रमण केलें आणि त्याच्याजवळ देणें शक्य नाहीं• इतकी खंडणी मागितली. त्यायोगानें व रशियन रेलवेमुळें तें राज्य पूर्णपणें रशियाच्या ताब्यांत आलें, १८७७ सालच्या तुर्की–रशियन युद्धापूर्वी जेव्हां खीवा आणि बुखारा यांत रशियानें प्रवेश केला, तेव्हां इंग्रज लोक समजून चुकले कीं, रशियाला पायबंद घातल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. मध्य आशियांत रशियानें रेलवे तयार केल्यामुळें आणि इराणच्या कारभारांत हस्तक्षेप केल्यामुळें इंग्रज लोक रशियाविषयीं फार साशंकित होते. विसाव्या शतकाच्या आरंभींहि रशियाचें व इंग्लंडचें युद्ध होण्याचा संभव होता; परंतु १९०७ च्या अँग्लो–रशियन तहामुळें तें टळलें.

एप्रील १९१७ मध्यें बुखाऱ्याचा अमीर व खीवाचा खान दोघांनीहि रशियन राज्यक्रांतीचा फायदा घेऊन रशियाची सत्ता झुगारून दिली आणि आपल्या प्रजेला लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्याचें वचन दिलें. या दोघांनीहि असेंहि घोषित केलें कीं, रशियानें आमचे जे प्रांत पूर्णपणें आपल्या राज्यांत स्थापन केलें आहेत ते परत मिळविण्याचीहि आमची इच्छा आहे. परंतु १९१७ च्या शेवटीं मध्य आशियांतहि बोलशेविझम पसरण्यास सुरवात झाली. ताश्कंद आणि मर्व यांत बोलशेविक राज्यपद्धति स्थापन झाली. जेव्हां महायुद्धानंतर तुर्कांनीं केमालपाशाच्या आधिपत्याखालीं स्वातंत्र्यार्थ युद्धास आरंभ केला, तेव्हां असें जाहीर केलें होतें कीं, तुर्कलोक सर्व तुराणी मुसलमानांचा एक संघ

बनविणार असून त्यांत मध्य आशिया व अफगाणिस्थानहि सामील होणार आहे. परंतु तुर्कांनां ती गोष्ट साध्य न झाल्यानें मर्वमध्यें इंग्रजांनीं आपलें कांहीं सैन्य पाठविलें आणि अफगाणिस्थानचे अमीर हबीबुल्लाखान यांच्या द्वारें इंग्रजांनीं मध्य आशियाच्या मुसलमानी संघावर आपलें वर्चस्व राहावें व हिंदुस्थान सरकारच्या हातीं त्या सर्व संघाचीं सूत्रें यावीं असा उद्योग आरंभीला, पण फेब्रुवारी १९१९ मध्यें हबिबुल्लाखानाचा वध झाला. त्याच्या पश्चात राज्यारूढ झालेला अमानुल्लाखान इंग्रजांचा विरोधी होता, यामुळें नाइलाज होऊन मर्व येथून इंग्रजांनां आपलें सैन्य परत न्यावें लागलें; आतां मध्य आशियांत त्याला कोणी विचारीत नाहीं. त्यामुळें असा संभव उत्पन्न झाला आहे कीं, युरोपियनाच्या प्रभुत्वाला विरोध करण्याकरितां भविष्यकालीं मध्य आशियांतील सर्व मुसलमान एक होतील.

---

# कोरियाचें पारतंत्र्य.

आशियाखंडांतील कोरिया द्वीपकल्प जपानी समुद्र आणि पिंवळा समुद्र यांमध्यें आहे. जितकें उत्तर समुद्राचें महत्व इंग्लंडला आहे, तितकेंच जपानला जपानी समुद्राचें आहे. कोरिया ही जपानच्या हृदयावर रोखलेली कट्यार आहे असें ह्मणतात आणि तें खरेंहि आहे. जर कोरिया कोणत्याहि युरोपियन राष्ट्राच्या हातांत असता, तर जपानला अत्यंत अनिष्ट झालें असतें. जर कोरियांत कोणातरी युरोपियन राष्ट्राचें प्रावल्य झालें, तर तें राष्ट्र जपानला चीनपासून अलग करून उत्तर जपानावर सहज आक्रमण करूं शकतें.

अनेक शतकांपासून जपानप्रमाणें कोरियांतहि परकीय लोकांना पूर्ण मज्जाव होता. मिशनरी व व्यापारी यांनीं कोरियांत घुसण्याचा

अनेक वेळां प्रयत्न केला; पण प्रत्येक वेळीं कोरियन लोकांनीं त्यांचा वध केला; जपानमध्यें परकीयांचा प्रवेश झाल्यावर पुष्कळ दिवसांनीं कोरियांमध्यें विदेशीय लोकांचा प्रवेश झाला व त्यांनीं तेथें निवास करण्यास सुरुवात केली. याच एका कारणानें आशियाचा हा भाग युरोपियनाच्या पंजांतून बचावला. ज्यावेळीं आशियांतील इतर देशांप्रमाणें कोरियाहि युरोपियनाच्या दृष्टिपथांत आला. त्यावेळीं जपान चांगला बलवान् झाला होता व त्यानें युरोपियनांचें साम्राज्य वर्धन करण्याच्या नीतीचें चांगलें परिशिलन केलें होतें. या योगानें इतर राष्ट्रांना तो जपान लगतच देश हस्तगत करतां आला नाहीं. रशिया किंवा इंग्लंड कोरियांत घुसून आपणाला त्रास देतील अशी जपानला सकारण भीति वाटत होती. ह्मणून स्वतः त्यानेंच कोरियांत घुसण्यास आरंभ केला. याकरितां त्यानें दोन मोठीं युद्धें केलीं आणि शेवटीं सर्व कोरिया द्वीपकल्प आपल्या सत्तेखालीं आणलें.

१८७२ ते १८९६ पर्यंत कोरियाचे जपान, अमेरिका, जर्मनी, ब्रिटन, इटली, रशिया, फ्रान्स आणि आस्ट्रिया-हंगेरी यांच्याशीं तह झाले. त्यास अनुसरून परकीय लोकांना त्या देशांत राहण्यास व व्यापार करण्यास परवानगी मिळाली. मग काय हवें होतें. त्या परकीय लोकांनीं आपण इतर देशांत अनुसरण केलेली नीति त्या देशांत अनुसरण्यास आरंभ केला व अनेक कारस्थानें करून तेथील राजकीय हक्क मिळविण्यास आरंभ केला. आशियांतील अन्यदेशांमधील रीतीप्रमाणें ते लोक राज्यकारभारांत व्यत्यय आणूं लागले व तेथील प्रजेला बंड करण्यास उत्तेजन देऊं लागलें तेथें असणारे अन्यदेशांतील वकील त्या देशांत राज्यक्रांति घडून यावी ह्मणून उद्योग करीत असत आणि अत्याचारी क्रांतिकारकांना आपल्या वकीलातींत आश्रय देत. त्याचबरोबर ते लोक कोरिया बंदरांत जास्त हक्क मिळविण्याचा व त्या बंदरांत आपलें आरमार ठेवण्याचा हक्क संपादन करण्याचा उद्योग करीत असत व

दुसरीं राष्ट्रें असाच प्रयत्न करीत असल्यास त्यास अडथळा आणण्याचें कार्य करीत. या त्यांच्या प्रयत्नामुळें जपानला भीति वाटूं लागली आणि कांहीं काळपर्यंत कोरियाला पूर्णपणें स्वतंत्र्य ठेवण्याची त्यानें पराकाष्ठा केली. जीं युरोपियन राष्ट्रें कोरियामध्यें आपलें प्रभुत्व स्थापन करण्यास इच्छीत होतीं; त्यांचें त्यानें परम शत्रुत्व स्वीकारलें. जेव्हां त्या राष्ट्रांना कळून चुकलें कीं, जपानच्या पुढें कोरियांत आपली डाळ शिजणार नाहीं. तेव्हां त्यांनीं चीनाकडून आपला दुष्टउद्देश सिद्धीस नेण्याचा खटाटोप आरंभिला, कोरिया पूर्वीं चीनचा अंकित देश होता. हे मीषहि त्यांना उत्तम मिळालें. चीन देशानें या परकीयांच्या चिथावणीनें कोरियावर आपला अधिकार पुन्हां प्रस्थापित करण्यास आरंभ केला. तिकडे कोरियाहि जपानला भीत होता. यामुळें तोहि सहजच फसला आणि जपानला सोडून त्यानें चीनाची कास धरिली.

परकीयाच्या या कारवाईने मे १८९४ मध्यें एक बिकट परिस्थिति उत्पन्न केली. कोरियामध्यें एक बंड झालें आणि तें शांत करण्याकरितां त्यानें चीनचें सहाय्य मागितलें. जपानबरोबर चीनचा जो पूर्वीं तह होता त्यास अनुसरून चीननें जपानला सूचना दिली कीं, आपण कोरियांत दोन हजार सैनिक पाठवीत आहे. त्यानें जपानहि तेथें आपलें सैन्य पाठविणार आहे कीं नाहीं या गोष्टीचा मुळींच विचार केला नाहीं. किंवा जपानच्या उत्तराची मार्गप्रतिक्षाहि केली नाहीं. त्यानें एकदम कोरियांत सैन्य पाठविलें; पण चीनाचा हा अतिक्रम साहजीकच जपानी लोकांना आवडला नाहीं. त्यानेंहि ह्या चिनी सैन्याला प्रतिबंध करून कोरियांतील बंदरावर अधिकार करण्याकरितां बारा हजार जपानी सैन्याची रवानगी केली.

या मध्यंतरीं आणखीहि एक नवी घटना घडून आली. ती वेळ अशी होती कीं, जपान व चीन यांनीं मिळून युरोपियन राष्ट्राच्या साम्राज्य-तृष्णेला आळा घालण्याची त्यावेळीं परम आवश्यकता होती. पण युरो-

पियनाच्या कारवाईस बळी पडून चीननें मूर्खपणानें जपानशीं शत्रुत्व आरंभिलें. युरोपियन लोक चीनवरील आपली सत्ता वाढवीत चालले होते व त्याचा एकेक प्रांत घशांत कोंबीत होते. जपानला त्या योगानें फार दुःख वाटत असे, पण चिनी सरकारच्या अज्ञानापुढें त्याचा कांहींच इलाज चालत नव्हता. जपाननें खूप विरोध केला, तरी चिनी सरकार परकीयांना सारखे हक्क देतच होतें. ह्या अज्ञानाचा इतका अतिरेक झाला कीं, पूर्व आशियांत युरोपियन राष्ट्रांचे स्वामित्व पूर्णपणें स्थापीत होईल कीं काय अशी भीति जपानला वाटूं लागली चीनला ह्या गोष्टीचें ज्ञान नव्हतें कीं, आपल्या दुर्बलतेच्या अविचारामुळें आपण स्वतः बरोबर शेजारच्या देशांचाहि नाश करीत आहोंत. शेवटीं तर चीनानें अविचाराचा कळसच केला. त्यानें एकदम कोरियाच्या उत्तरे जपानी सागरावर अधिकार करण्यास रशियाला परवानगी दिली. चीनला असा भ्रम होता कीं, कोरियाची पाहिजे ती विल्हेवाट लावण्याचा आपणास अधिकार आहे, म्हणून आपणाला परकीय लोकांनांही त्या देशांत घुसवितां येईल. परंतु जपाननें त्याचा हा अधिकार मुळींच जुमानला नाहीं. त्याला पूर्णपणें ठाऊक होतें कीं, जर कोरियावर कोणत्याहि प्रबल युरोपियन राष्ट्रानें आपली सत्ता स्थापन केली, तर आपली धडगत नाहीं. म्हणून त्यानें चीनला सामोपचारानें कळविलें कीं, चीन आणि जपान मिळून कोरियाची सुधारणा होतील असें प्रयत्न करूयां. कोरिया परकीयांच्या ताब्यांत दिल्यास परिणामीं दोघांसहि बाधक होईल. ते उपाय योग्य होतें आणि अंमलांतहि आणण्यास सुलभ होते. त्यास अनुसरून कार्य केल्यास चीनालाहि फायदेशीरच होतें. परंतु त्यानें युरोपियन राष्ट्रांच्या चिथावणीनें विनाकारण असा प्रश्न उत्पन्न केला कीं, कोरियावर आज कोणाचें स्वामित्व आहे व पुढें कोणाचें राहील? त्याचा प्रश्न असा होता कीं, ज्या देशांत जपानला कोणताच अधिकार नाहीं, त्या देशाची चिंता करून त्या देशाच्या सुधारणेचे उपाय योजण्यास जपानला कोणता अधिकार

आहे ? ह्मणून चीनचें असें ह्मणणें पडलें कीं, प्रथम जपाननें कोरियांत विनाधिकार पाठविलेलें आपलें सैन्य परत बोलवावें; कारण जपानला त्या देशांत सैन्य पाठविण्याचा मुळींच अधिकार नाहीं, अथवा चीननें किंवा कोरियानें त्याच्याजवळ मदतीची याचनाहि केली नाहीं. कोरिया पाहिजे तर आपल्या देशांत सुधारणा करील किंवा आपला देश परक्याच्या ताब्यांत देईल. त्याची पंचाईत त्रयस्थ अशा जपानला कशाला?

या बेगुमान उत्तरामुळें जपाननें चीनशीं युद्ध जाहीर केलें. १८९४ मध्यें जपानी सैन्य व आरमार कोणत्या कुशलतेनें लढत आहे हें जगानें प्रथमच पाहिलें. युद्धांत चीनचा पूर्ण पराभव झाला व आपणास पाहिजे तसा तह घडवून आणण्याची जपाननें खटपट चालविली. तेव्हां अन्य युरोपियन राष्ट्रानें मध्यें हस्तक्षेप करून जपानच्या तोंडांतला घांस काढून घेतला. मध्यंतरी कोरियानें असें जाहीर केलें कीं, आपण चीनच्या अंकित मुळींच नाहीं, तर आपण जपानशींच सहकार्य करूं. हा कोरियाचा जाहीरनामा जपानास अत्यंत अनुकूल झाला आणि त्या योगानें युद्धाच्या कारणांचा निकाल लागला ह्मणून जपाननें आपला पूर्ण विजय झाला असें पाहून अन्य युरोपियन राष्ट्रांशीं जास्त वांधा घातला नाहीं आणि घालणेंहि त्याला शक्य नव्हतें. यानंतर चीन आणि जपान ह्या दोघांनीं मिळून कोरियांत ज्या सुधारणा करण्याचें जपाननें निश्चित केलें होतें, त्या एकट्या जपाननें करण्यास सुरवात केली आणि कोरियांत हळूहळू आधुनिक तऱ्हेची व्यवस्था चालू झाली. एक तर युरोपियन लोक जपानचें युद्धकौशल्य पाहून चकित झाले होते आणि आतां त्यांच्या अवलोकनांत आलें कीं, अवघ्या कांहीं महिन्यांतच जपाननें कोरियाची घडी नीट बसविली. तेव्हां त्यांना आणखीहि आश्चर्य वाटलें आणि कळून चुकलें कीं, पूर्व आशियांत आह्मांला एक प्रबल प्रतिस्पर्धि उत्पन्न झाला. जपाननें सर्व राष्ट्रांना आपल्या कर्तबगारीनें जाहीर केलें कीं, आपण युरोपियनाप्रमाणें केवळ युद्धकलेंतच

चतुर आहे असें नाहीं, तर आपलें साम्राज्य कसें वाढवावें हेंहि ज्ञान आह्मांस झालें आहे. जपाननें सुरू केलेल्या सुधारणा चांगल्या होत्या; पण त्या अमलांत आणण्याची रीती मात्र चांगली नव्हती. थोडक्याच अवधींत कोरियनांना कळून चुकलें कीं, चीनवर विजय मिळवूनहि जपानची इच्छा पूर्ण झालेली नाहीं. ह्मणून तो आतां आपणावर त्याचा व्चपा काढीत आहे. तिकडे रशियाहि कोरियांत कांहीं अधिकार मिळविण्याकरितां उद्योग करीत होता. जपानच्या साम्राज्यतृष्णेमुळें त्या विषयीं कोरियन लोकांत तिरस्कार उत्पन्न होत चालला होता. शेवटीं १८९५ मध्यें जेव्हां जपानी सैन्यानें कोरियाच्या राजवाड्यास वेढा घालून तेथील महाराणीचा वध केला, तेव्हां कोरियन लोकांना जपानी लोकांचा अतिशय चेव आला. रशियन लोकांनीं या संधीचा फायदा घेण्याचें योजिलें व जेव्हां कोरियाचा राजा आपल्या राजवाड्यांतून पळून गेला, तेव्हां रशियानें आपल्या वकिलातींत त्याला आश्रय दिला. यानंतर रशियाच्या मदतीनें कोरियाच्या राजानें जपाननें योजलेल्या पुष्कळ सुधारणा रद्द केल्या व पुन्हां स्वतंत्रतापूर्वक राज्य करण्यास आरंभ केला. चीनी-जपानी युद्धाच्यापूर्वी कोरियांत परकीयांचीं जितकीं कारस्थानें होत असत. त्याहिपेक्षां एकुणिसाव्या शतकाच्या अखेरीस तीं अधिक होऊं लागलीं. सर्व युरोपियन राष्ट्रें अधिकार मिळविण्याच्या कामांत एकमेकांना कुत्र्याप्रमाणें चावे घेण्यास पहात होतीं; परंतु विसाव्या शतकाच्या प्रारंभीं अन्य सर्व राष्ट्रांनीं कोरियाच्या कारभारांतून आपलें अंग काढून घेतलें आणि केवळ रशिया व जपान यांचीच कोरियांत प्रतिस्पर्धिता राहिली.

मार्च १९०० मध्यें रूसो जपानी युद्धाचें पहिलें कारण उत्पन्न झालें. कोरियाचें महत्वाचें बंदर मेसेनपो हें कोरियानें रशियाला अर्पण केलें आहे व त्यांत रशियन आरमार वास्तव्य करणार असें रशियानें जाहीर केलें. त्याचप्रमाणें कोजी प्रांतहि रशियन संरक्षणाखालीं देण्यांत आला

आहे. असें तो ह्मणूं लागला. या घटनेमुळें जपानी समुद्रापासून पिवळया समुद्रापर्यंत सर्व प्रदेश रशियाच्या हातांत जात होता व त्या योगानें जपानावर महत्तम आपत्ति येण्याचा संभव होता. त्याचवेळीं रशिया आणि जपान यांत युद्ध सुरू झालें असतें; परंतु मध्येंच कोरियानें जाहीर केलें कीं, मेसेनपो बंदर रशियाला अर्पण करण्याचा आमचा विचार आतां बदलला आहे; पण एक वर्षपर्यंत अनेक बोलणीं चालणीं झाल्यानंतर असें निश्चित् झालें कीं, मेसेनपोमध्यें रशिया आणि जपान यांना सारखेच अधिकार असावे. त्याच सुमारास कोरियनाच्या आणि जपानच्या एका संयुक्त कंपनीनें कोरियाची राजधानी स्थूल येथून पूसन नामक बंदरापर्यंत रेल्वे बनविण्याचा अधिकार मिळविला. हें पूसन बंदर मेसेनपोच्या जवळच होतें व जपानी लोकांचा असा विचार होता कीं, ही रेल्वे पूर्ण झाल्यावर मेसोनपो बंदर पूर्णपणें आपल्या ताब्यांत आल्याशिवाय राहणार नाहीं. १९०३ मध्यें रशियानें कोरियांत पुढें घुसण्याचा आणखी एक नवा उपाय योजिला व यालू नदीच्या किनाऱ्यावर आपल्या लोकांची वसाहत करण्यास सुरुवात केली. कोरियन सरकारनें ह्या कृत्याला अत्यंत विरोध केला. यावर त्यानें उत्तर दिलें कीं, १८९६ मध्यें आपणाला कोरियाकडून अरण्यांतील लांकडें तोडण्याचा जो अधिकार मिळाला आहे. त्याच्या अंमलबजावणीकरितां ही वसाहत करणें आवश्यक आहे. पूर्वीं जें अधिकार पत्र दिलें होतें, त्यांत या वस्तीविषयीं मुळींच कांहीं लिहिलें नव्हतें ह्मणून रशियाची अशी इच्छा होती कीं, याच पत्रांत परिशिष्टादाखल कांहीं अन्य बाबी वाढवाव्या व ज्या भूमिवर रशियानें वसाहत केली आहे ती भूमि रशियास बहाल करावी; परंतु यावेळीं ब्रिटन आणि अमेरिका यांची संमति घेऊन जपाननें कोरियाची बाजू उचलून धरली व रशियाला विरोध केला; पण त्यावेळीं अवसानघात करून कोरियन सरकारनें आपली विलक्षण दुर्बलता प्रगट केली. त्याला दोघांचीहि भीति वाटत होती ह्मणून त्यानें गप्प राहण्याचें

योजिलें. त्यानें रशियनांनीं तेथून आपली वस्ती उठवावी ह्मणून जोराचा प्रयत्नहि केला नाहीं, किंवा परिशिष्टरूपानें पुढें आलेल्या नूतन तहावरहि सही केली नाहीं. तिकडे जपानला आखाड्यांतून दूर करण्याकरितां रशियानें कोरियाला कळविलें कीं, जपाननें तुमच्या राजधानींत आपली बँक काढून ज्या नोटा प्रसृत केल्या आहेत त्या बंद कराव्या. कोरियामध्यें स्थापन झालेली ही पहिलीच बँक होती. कोरियास ही सूचना पसंत पडली आणि जपानी बँकेच्या नोटा गैर कायदा आहेत असें त्यानें जाहीर केलें; परंतु त्याचबरोबर त्यानें ह्या नोटा बंद करण्याचा कांहींच उपाय केला नाहीं. यामुळें कोरियानें पक्षपात केला असें कोणालाहि ह्मणतां येईना. त्यानें दोघांनाहि विरोध केला आणि दोघांनाहि आपलें सुरू केलेलें कार्य बंद करण्यास भाग पाडलें नाहीं. तात्पर्य हेंच कीं, कोरिया आपलें रक्षण करण्यास असमर्थ असल्यामुळें कोणालाहि नाराज करण्याची त्याची प्राज्ञा नव्हती. त्यानें दोघांहि प्रबलांपुढें बक्षीस ठेविलें होतें. आणि त्यांपैकीं जो जास्त बलवान् आहे त्यानें तें न्यावें अशी त्याची अंतस्थ इच्छा होती. ज्यावेळीं युद्धास प्रारंभ होण्याची वेळ येऊन रूसो जपानी युद्धास सुरुवात झाली. त्यावेळीं जपानच्याप्रमाणें रशियाची युद्धाची तयारी चांगली नव्हती, ह्मणून जपाननें कोरियावर सहज आपली सत्ता स्थापन केली. स्वतः कोरियानें तर जपानला कांहींच विरोध केला नाहीं. २२ फेब्रुवारी १९०४ रोजीं कोरियाच्या राजाला एका तहावर सही करणें भाग पडलें. त्यास अनुसरून कोरियाची राज्यव्यवस्था जपानच्या संमतीनें चालावी असें ठरलें आणि ज्यावेळीं कोरियावर कोणतेंहि परकीय राष्ट्र आक्रमण करील किंवा कोरियांत जर बंडाची उठावणी होईल तर कोर्यांतील महत्वाचीं स्थानें जपाननें आपल्या ताब्यांत घ्यावीं असेंहि ठरलें. ह्या फायद्याच्या मोबदलयांत जपाननें कोरियाला अशी हमी दिली कीं, कोरिया यापुढें पूर्ण स्वतन्त्र राहील व त्याची भूमि कोणीहि हिरावून घेणार नाहीं.

रशियावर विजय मिळविण्यापूर्वीच जपाननें कोरिया आपल्या ताब्यांत घेतला होता. कोरियाची भौगोलिक स्थितीच अशी होती कीं, त्यामुळें जपानला युद्धांत फार फायदा झाला आणि मंचुरियामध्यें रशियाशीं लढण्याकरितां जपाननें तेथें आपली छावणी केली. तसेंच कोरियाच्या राजधानींतहि जपाननें आपला रेसिडेंट व पुष्कळ सैन्य ठेवलें व पूसनपासून यालू नदीपर्यंत एक युद्धोपयोगी रेल्वे झटपट तयार करण्यांत आली. कोरियाच्या बंदरांत जपानी आरमार सज्ज झालें. कोरियाच्या किनाऱ्यावर महत्वाच्या ठिकाणीं आरमाराचें संरक्षण करण्याकरितां दीपगृहें बनविण्यांत आलीं. तात्पर्य हेंच कीं, कोणत्याहि प्रकारचा रक्तपात न करितां जपाननें कोरियामध्यें आपलें राज्य स्थापन केलें. युद्ध केवळ चीनच्या हद्दीवरच सुरू होतें. कोरियाचें त्यामुळें कांहींच नुकसान झालें नाहीं. रशियानें व्लडिव्होटस्कमध्यें त्याचें निकामीं आरमार बुडविलें; पण त्या आरमारांत काय होतें ! एक फुटकेंसें गलबत व दोन लहानशा आगबोटी. यावरच रशियाला संतुष्ट व्हावें लागलें.

रुसो—जपानी युद्धानंतर पोर्टस्माउथ येथें तह झाला. त्या तहान्वयें रशियानें असें कबूल केलें कीं, कोरियांत जपानचीच सर्वांत जास्त सत्ता असावी. ह्या तहावर स्वाक्षरी होण्याच्या कांहीं दिवसांपूर्वीं ब्रिटन व जपान यांचा तह पुन्हां दृढ करण्यांत आला होता. ह्या तहान्वयें ब्रिटननेंहि असें कबूल केलें होतें कीं, कोरियामध्यें सर्वांत जास्त सत्ता जपानलाच आहे, आणि पूर्व आशियांत शांतता स्थापन करण्याकरितां कोरियांत त्यानें पाहिजे तशी व्यवस्था करावी. या अँग्लो—जपानी तहावर १२ आगष्ट १९०५ रोजीं सह्या झाल्या व रूसोजपानी तहावर ५ सपटेंबर रोजीं सह्या करण्यांत आल्या; परंतु हे दोन्ही तह पुढें कसे घडून येतील याचा जपानला पूर्ण कयास होता, ह्मणून त्यानें १९०५ च्या आरंभींच कोरियाचें सैन्य पुष्कळ कमी केलें होतें व तेथील सर्व राज्य-व्यवस्था आपल्या हातांत घेतली होती. जपानी नोटाहि कायद्यानें चलन

म्हणून चालू करण्यांत आल्या आणि १ जून १९०५ रोजीं स्वतः कोरियन सरकारनेंहि आपला कोश त्या बँकेंत समाविष्ट केला.

युद्ध समाप्त झाल्यावर जपान कोरियाला आपल्याच एका प्रांतांत समाविष्ट करण्याच्या उद्योगाला जोरानें लागला. तेथें जें कांहीं थोडें फार सैन्य होतें, तेंहि निखालस कमी करण्यांत आलें आणि तेथील राजाच्या राजवाड्याच्या रक्षणाकारितां केवळ दीड हजार सैन्य बाकी ठेवलें. नवंबर १९०५ मध्यें मार्कीस ईटोनें कोरियाच्या राजाला असा एक तह करण्यास भाग पाडलें कीं, त्या योगानें कोरियाचे सर्व परराष्ट्रीय संबंध जपानच्या हातीं आले व देशाचा कारभारहि स्यूलमध्यें असलेल्या रेसिडेंटच्या आज्ञेविना होईनासा झाला. तेथील रेल्वे, तारा व टपालगृहें यांच्यावरहि जपानची सत्ता चालूं लागली व कोरियाचीं तिकिटेंहि छापण्याचें बंद झालें. राजाच्या सर्व विभागांत जपानी अधिकारी नेमण्यांत आले. जपानी लोकांनीं रशियाशीं व ब्रिटनशीं जो तह केला होता, त्यांत जरी कोरियाचा पूर्ण संबंध होता, तरी त्यावेळीं कोरियाचें अनुमोदन मुळींच घेण्यांत आलें नव्हतें. किंवा पूर्वीं त्याला कोणतीहि सूचना देण्यांत आली नव्हती. कोरियाच्या राजानेंहि स्पष्टपणें असें जाहीर केलें कीं, मार्कीस इटोनें जबरदस्तीनें तहावर सही करण्यास आपणास भाग पाडलें. ह्यासंबंधीं अमेरिकेजवळ गाऱ्हाणेंहि नेण्यांत आलें होतें. कोरियाचे दोघे प्रधान तर या परिस्थितिमुळें इतके दुःखी झाले कीं, त्यांनीं आत्महत्या करून घेतली; परंतु कोरियाच्या या त्रागयावर कोणत्याहि राष्ट्रानें लक्ष दिलें नाहीं. सर्वांपूर्वीं अमेरिकेनें कोरियांत असलेला आपला वकील परत बोलाविला. यानंतर अन्यराष्ट्रांनींहि त्याचें अनुकरण केलें. त्यायोगानें कोरियाचा परराष्ट्रीय कारभार बंद झाला व तो जपानच्या द्वारें होऊं लागला.

१९०५ मध्यें जपानविरुद्ध कोरियाच्या दक्षिण आणि पूर्व भागांत बंडें उद्भवलीं; पण तीं आपल्या सैन्याच्या जोरावर जपाननें दाबून

टाकिली. कोरियाच्या बाहेर राहणाऱ्या कोरियनानींहि क्रांतिचा कांहीं उद्योग केला होता; पण तोहि फसला. मार्कीस इंटो यानें कोरियाचा पक्षपात करणाऱ्या कित्येक अधिकाऱ्यांना आणि पुढाऱ्यांना पकडून राजाला एकप्रकारच्या कैदेंत ठेवलें. ज्या मंत्र्यांनीं १९०५ सालीं कोरियास पारतंत्र्यांत दृढपणाऱ्या तहावर सह्या केल्या होत्या त्याचा वध करण्याकरितां एक गुप्त कट करण्यांत आला होता. त्यांत सामील झाल्याच्या आरोपावरून तेथील तेहत्तीस पुढाऱ्यांना फांशीची शिक्षा देण्यांत आली. यानंतर कांहीं कोरियन देशभक्त गुप्तरूपानें हेग परिषदेंत जाऊन पोहोंचले, आणि त्यांनीं अशी फिर्याद केली कीं, जपान आह्मावर अतिशय अत्याचार करीत असून जुलमानें राज्यकारभार चालवीत आहे. हेग परिषदेनें त्यांच्या फिर्यादीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; परंतु वर्तमानपत्रांतून त्यावेळीं त्या गोष्टीचा फारच गाजावाजा झाला होता आणि कोरियाविषयीं जगानें आपली सहानुभूति प्रकट केली होती. या घटनेनें जपानी लोकांना व सरकारला अतिशय चीड आली व त्यांनीं हेग कान्फरन्समध्यें गेलेले लोक आगांतुक आहेत. त्यांच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं, असें कोरियाच्या राजास जाहीर करण्यास भाग पाडलें. त्याचप्रमाणें राजानें असेंहि घोषित केलें कीं, जे लोक विनाकारण हेग परिषदेंत गेले होते, त्यांना कडक शिक्षा देण्यांत येईल. ही घटना घडून येतांच कोरियन क्रांतिकारकांत प्रचंड खळबळ उडाली व त्यांच्याकडून पुष्कळ जपानी अधिकारी मारले गेले. जपान असल्या संधीची वाट पहात होताच, त्यानें ठिकठिकाणीं गोळीबार चालविला व शेंकडो क्रांतिकारकांस परलोकाचा रस्ता दाखविला. ही धामधूम सुमारें एक महिनापर्यंत चालली होती. त्यानंतर संघटित बंड बंद झालें; पण मधून मधून जपानी अधिकाऱ्यांची हत्या करण्यांत येतच होती. जपानच्या प्रत्येक वस्तूचा कोरियन लोक अत्यंत तिरस्कार करूं लागले. शेवटीं मार्कीस इंटोनें जाहीर केलें कीं, जपानी लोकांना कोरिया

आपल्या ताब्यांत ठेवण्याची इच्छा नाहीं; किंवा ते तेथें वसाहत करण्यासही आलेले नाहींत. तर कोरियाची सुव्यवस्था लागून तो युरोपियन-राष्ट्रांच्या मगरमिठींतून आपला पूर्ण बचाव करण्यास समर्थ होतांच आह्मीं तत्काळ निघून जाऊं. कारण कोरिया जर कोणत्याहि प्रबल युरोपियन राष्ट्राच्या संरक्षणाखालीं गेला, तर जपानला अतिशय धोका आहे; परंतु ह्या जाहीरनाम्यानें कोरियन स्वातंत्र्यवाद्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं आपले प्रयत्न तसेच चालू ठेवले. यामुळें दुसऱ्या वर्षी जपानाकडून बारा हजार कोरियन लोकांना कंठस्नान घालण्यांत आलें. या धामधूमींत जपानचीहि पुष्कळ हानी झाली. त्याचे सुमारें दोन हजार लोक मारले गेले. कोरियन स्वातंत्र्यवाद्यांजवळ लष्करी सामग्री फारशी नव्हती, ह्मणून त्यांचे प्रयत्न सफल होतील अशी परिस्थिती नव्हती. परंतु त्यांनीं आपला उद्योग जोरांत ठेविला. दुसरीकडे पुष्कळ कोरियन लोक ख्रिस्तिधर्माचा स्वीकार करीत होते; त्यामुळें क्रांतिकार्यांत समाविष्ट होण्याकरितांच हे लोक त्या धर्माचा स्वीकार करीत आहेत कीं काय असा जपान सरकारला संशय येऊं लागला.

कोरियांतून पळून गेलेल्या आणि गुप्तपणें लपून राहिलेल्या अनेक देशभक्तांनीं गुप्त सभा स्थापन केल्या होत्या व तद्द्वारें ते देशविदेशांत जपानसरकारला घोर विरोध करीत होते. संधि सांपडतांच बलानें व सहासानें आपलें कार्य पार पाडण्यास ते तत्पर असत. १९०८ मध्यें अमेरिकेंतील सानफ्रान्सिस्को शहरांत जपानसरकार कोरियाचा राज्य-कारभार चांगल्या रीतीनें चालवीत आहे असें आपल्या व्याख्यानांतून प्रतिपादन करणाऱ्या मि. स्टेव्हेन्स नामक युरोपियनालाहिं कोरियन क्रांतिकारकांनीं ठार केलें. इतका जपानाविषयींचा त्यांचा तिरस्कार कळसास पोहोंचला होता. १९०९ मध्यें प्रिन्स ईटो नामक राजपुत्राचा हार्बिन नामक एका देशभक्तानें वध केला. जपानची कोरियावर सत्ता असणें अत्यावश्यक आहे असें प्रतिपादन केलें होतें, ह्मणून जपानच्या

मुख्य प्रधानाचा वध करण्याचाहि प्रयत्न करण्यांत आला. जरी जपाननें कोरियाची चळवळ दाबण्याचा पुष्कळ उद्योग केला, तरी कोणत्याहि उपायानें चळवळीचें शमन झालें नाहीं. नाइलाज होऊन १९०९ च्या शेवटीं कोरियाला शांत करण्याची आशा त्यानें सोडून दिली व कोरियाला पूर्ण रीतिनें पारतंत्र्यांत दडपून त्याची खोड जिरविण्याचा निश्चय केला. मे १९१० मध्यें जनरल टेराशी याला तेथील रेसिडेंट जनरल नेमून पाठविण्यांत आलें. कोरियाला संपूर्णपणें जपानच्या आधिसत्तेंत समाविष्ट करण्याचें अधिकारपत्र त्याला देण्यांत आलें होतें. कोरियाला आपल्या साम्राज्यांत समाविष्ट करण्याची आपली इच्छा नाहीं असें जपाननें पूर्वी जाहीर केलें होतें; यामुळें रशिया कदाचित् आतां आपणाला विरोध करील अशी त्याला भीति वाटत होती. ह्मणून त्यानें विचार केला कीं, प्रथम या बाबतींत रशियाशीं जर आपण तह केला, तर सर्व कार्य योग्य रीतीनें सिद्धीस जाईल. अन्य राष्ट्रांची त्याला फारशी भीति वाटत नव्हती. कारण इंग्रजांनीं इजिप्तांत व फ्रान्सनें सयामांत कोणत्या धोरणानें राज्यप्रसार केला ह्याची त्याला पूर्ण माहिती होती. यामुळें त्यानें मंचुरियांतील आपलें सर्व सैन्य हालवून कोरियांत आणलें आणि २२ ऑगष्ट १९१० रोजीं कोरिया पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतला व त्या कृत्याला संमति देण्यास तेथील राजाला भाग पाडलें.

पेट्रोग्रॉडमध्यें रहाणाऱ्या कोरियन वकीलानें, रशियानें या कृत्यांत विरोध करावा ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला; परंतु जेव्हां त्याचे प्रयत्न पूर्णपणें निष्फळ झाले, तेव्हां त्यानें आपल्या देशाची दुर्दशा नेत्रांनीं पहाण्याचें टाळण्याकरितां आत्महत्त्या केली; पण स्वतः कोरियांत जपानच्या या कृत्याचा संघटित निषेध मात्र झाला नाहीं. खरी गोष्ट अशी होती कीं, चार वर्षें जपाननें केलेल्या प्रखर अत्याचारानें कोरियन देशभक्तांचा नायनाट झाला होता. त्यांच्यापाशीं शस्त्रेंहि शिल्लक नव्हतीं; किंवा त्यांच्याजवळ द्रव्यहि नव्हतें. यामुळें त्यांना कांहींच हालचाल

करितां आली नाहीं. कोरिया आपल्या ताब्यांत घेतांना जपाननें असें जाहीर केलें कीं, "दहा वर्षेपर्यंत तेथील आयात मालावर असलेल्या करांत कांहींच बदल करण्यांत येणार नाहीं व बंदरें आणि व्यापारी नियम ह्यांच्या बाबतींत सर्वराष्ट्रीय नियमाचें पालन करण्यांत येईल. केवळ मेसेनपो बंदर मात्र आमच्या आरमाराकरितां राखून ठेवलें जाईल. कोरियाच्या राजाचा मान व मर्यादा कायम राहील व पूर्वी राजघराण्याला जितका तनखा मिळत होता, तितका पुढेंहि मिळेल." राजाला पूर्वी वीस लाख रुपये तनखा मिळत असे तो तनखा जपाननें कायम ठेवला; इतकेंच नाहीं, तर कोरियन लोकांनीं कोणत्याहि प्रकारचा विरोध किंवा गुप्तकारस्थानें करूं नयेत ह्मणून जपाननें पंचाहत्तर कोरियनांना मोठमोठे किताब, जहागिरी व बक्षिसें दिलीं आणि त्यांना आपल्या साम्राज्याचे सरदार बनविलें. या प्रकारें धन व पदव्या समर्पण करून कोरियन लोकांची चळवळ बंद करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. जपानच्या राज्यकारभाराला विरोध करूं नये ह्मणून जणूं काय त्यांच्या तोंडाला सोनेरी कुलूप ठोकण्यांत आलें. पराधिन देशांतील लोकांनीं परकीय सरकारनें दिलेल्या पदव्यांनीं आपला बहुमान झाला, असें समजणें हा केवळ भ्रम आहे. त्यांनीं या पदवीदानाचा वास्तविक अर्थ काय आहे ह्याचा चांगला विचार केला पाहिजे.

ह्या घटनेमुळें कोरिया हा जपानी साम्राज्याचा एक घटक झाला. ह्या वीस वर्षांत त्याच्या स्थितींत महदंतर पडलें आहे. जपानच्या कारभारामुळें त्या देशाची आर्थिक, शैक्षणिक उन्नति झाली यांत संशय नाहीं. त्या देशांत सर्व ठिकाणीं रेल्वे, तारायंत्रें निर्माण करण्यांत आलीं आहेत व शेतकी आणि व्यापार ह्यांचीहि उन्नति करण्यांत आली आहे; पण अंकित देशाची उन्नति करितांना सर्व ठिकाणीं राज्यकर्त्यांचा जो उद्देश असतो, ताच तेथेंहि जपानचा उद्देश आहे. पोलिस, न्याय व अंमलबजावणी या खात्यांचा कारभार तेथें अतिशय ढिला असून सर्व गोष्टी जपा-

नच्या फायद्याकरितां चालत असतात. त्या देशांतील लोकांना आपले निर्बंध तयार करण्याचा हक्क नाहीं; किंवा कोणताहि महत्वाचा अधिकार त्यांच्या ताब्यांत नाहीं. राज्यकर्त्यांच्या फायद्याकरितां तेथील सर्व कारभार चालविण्यांत येतो. तद्देशीय लोकांच्या हितसंबंधाचा मुळींच विचार करण्यांत येत नाहीं.

कोरियाची लोकसंख्या सुमारें पावणेदोन कोटी आहे. त्यांत जपानी लोकांची संख्या शेंकडा दोन इतकी आहे. रूसो जपानी युद्धापूर्वीपेक्षां जपानी लोकांची संख्या आतां दसपट आहे. तथापि जितक्या जपानी लोकांनीं त्या देशांत वस्ती करून राहावें अशी जपान सरकार खटपट करितें त्याच्या दशांशसुद्धां जपानी लोक त्या देशांत जाऊन राहत नाहींत. तेथें जे जपानी लोक आहेत ते बहुतकरून शहरांत राहतात व व्यापार करणेंच पसंत करतात; परंतु जपानी लोकांनीं तेथें शेतकी करावी अशी सरकारची इच्छा आहे. तात्पर्य हेंच कीं, जपानानें कोरिया आपल्या अंकित करितांना जे फायदे मनांत योजिले होते, ते अजून पूर्ण झालेले नाहींत किंवा होतील अशीं चिन्हेंहि दिसत नाहींत.

अधिकार भ्रष्ट झालेले कोरियाचे दोघेहि राजे परलोकवासी झाले. १९१९ मध्यें ली नांवाचा राजा कोरियाच्या सिंहासनावर बसला. त्या राजाचें शिक्षण जपानमध्येंच झालें होतें आणि त्याचा विवाहहि एका जपानी राजकुमारीशींच झाला होता. जपानी अधिसत्ता त्यानें पूर्णपणें स्वीकारल्यावरूनच त्याला सिंहासनावर अधिष्ठित करण्यांत आलें; परंतु तेथील सामान्य जनता स्वातंत्र्याकरितां अजूनहि प्रयत्न करीतच आहे व आपण स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देऊं असा त्यांना दृढ विश्वास आहे. तेथील ख्रिश्चन लोक सर्वांत जास्त स्वातंत्र्यप्रिय आहेत. १९११ मध्यें त्यांनीं एक मोठा गुप्त कट करून जपानी राजसत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न केला; पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाहीं.

गेल्या युरोपियन महायुद्धाच्या वेळीं कोरियन लोक स्वस्थ होते. इजिप्त-प्रमाणें जर्मनीच्या कारस्थानाला ते बळी पडले नाहींत. तहपरिषद आपल्या स्वातंत्र्यास मान्यता देईल अशी त्यांना पूर्ण आशा होती. जर्मनीशीं आपण जें युद्ध पुकारलें आहे तें अन्यायाचें परिमार्जन करून स्वयंनिर्णयानुसार जगाची पुनर्घटना करण्याकरितां पुकारलें आहे असें दोस्त राष्ट्रांच्या मुत्सद्द्यांनीं जें जाहीर केलें होतें त्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. अध्यक्ष विलसन ह्यांच्या चौदा तत्वांचीहि त्यांना कांहीं आशा वाटत होती. जेव्हां अमेरिकेमागून चीन आणि सयामहि युद्धांत समाविष्ट झाला. तेव्हां कोरियनांना आशा वाटूं लागली कीं, इतर परतंत्र राष्ट्रांबरोबरच तहपरिषद् आमच्या दुःखांकडेहि लक्ष देईल. पण शेवटीं त्यांना कळून आलें कीं, हत्तीचे खावयाचे दांत निराळे व दाखवावयाचे दांत निराळे असतात.

जेव्हां युद्ध बंद झालें तेव्हां कोरियामध्यें प्रथम साधारणपणें स्वातंत्र्य-प्राप्ति करितां प्रयत्न करण्यांत आले. त्या प्रयत्नास आळा घालण्याची जपाननें शिकस्त केली; पण ते प्रयत्न जास्तच जोरानें होऊं लागले. कारण क्रांति ही एक अशीच चीज आहे कीं, तिला आळा घालणेंच शक्य नाहीं. जपानला त्या बाबतींत मुळींच यश आलें नाहीं. कोरियनांनीं आणखी एक पाऊल पुढें टाकून आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व तहपरिषदेकरितां त्यानें आपले कांहीं प्रतिनिधीहि निवडले. अमेरिकेंत रहाणाऱ्या कोरियनांनीहि तेथें सभा भरवून स्वतंत्र कोरियाला मान्यता दिली होती व त्याबद्दल तारेनें तहपरिषदेलाहि कळविलें होतें. तहपरिषदेपुढें शांघाइ वगैरे ठिकाणाहून अत्याचारी जपानी लोकांबद्दल ज्या तक्रारी आल्या होत्या, त्या इजिप्त आणि भारतवर्ष यांतून इंग्रजांबद्दल आलेल्या तक्रारीं सारख्याच होत्या आणि फ्रान्सच्या वसाहतींचीहि कहाणी त्याचप्रकारची होती. ह्यामुळें तेरे भी चूप आणि मेरे भी चूप

करण्याशिवाय सर्वांना गत्यंतर राहिलें नाहीं. कोरियानें जपानी लोकां-बद्दल ज्या तक्रारी केल्या होत्या त्यांत जपानी लोकांनीं आमचे गांव जाळले, आमच्या स्त्रियांवर बलात्कार केला आणि निःशस्त्र मनुष्यावर बंदुका चालवून त्यांचा वध करण्यांत आला अशा तक्रारी होत्या. अर्थात् जेते लोक जित लोकांना निरंतर दास्यांत ठेवण्याकरितां जे उपाय अमलांत आणतात तेच उपाय कोरियांत जपाननें अमलांत आणले होते. त्यांत कोणतीहि नवी गोष्ट नव्हती. स्वतः जपानी वर्तमानपत्रांनींहि ही गोष्ट कबूल केली आहे कीं, निःशस्त्र मनुष्याचा कोरियांत वध झाल्यामुळें सुमारें आठशें विद्यार्थ्यांनीं टोकियो विश्वविद्यालयाशीं असहकारिता केली होती. जपानी सैनिक त्या लोकांचा वध करीत. १४ एप्रिल १९१९ रोजीं पांच हजार कोरियनांनीं स्यूल येथें जपानी सैन्यावर आक्रमण केलें होतें. जपानी अधिकाऱ्यांनीं त्या निःशस्त्र लोकांवर गोळीबार करून त्यांतील शेंकडों लोकांना कापून काढलें आणि त्यांचा पुढारी सानपिंग यास पकडलें. यानंतर कोरियाच्या तेराहि प्रांतांतील प्रतिनिधींनीं एकत्र जमून एक सभा केली आणि डॉ. सिंघमनरहीला आपला प्रतिनिधी निवडलें. डॉ. रही हा १८९४ पासून कोरियन तरुण पक्षाचा पुढारी होता. तो एक कुलीन आणि विद्वान् पुढारी होता व अमेरिकेंत त्याची पुष्कळ प्रख्याति होती.

कोरियानें पॅरिसच्या तह परिषदेंत आपल्या ज्या प्रतिनिधींना पाठविलें होतें, त्यांचें ह्मणणें कांहींच ऐकून घेण्यांत आलें नाहीं. तहपरिषदेच्या कार्यामुळें सर्व जगाला हें कळून चुकलें कीं, दोस्त राष्ट्रांनीं आरंभीं ज्या मोठमोठ्या तत्वांची घोषणा केली होती, त्यांची अंमलबजावणी ते केवळ शत्रूराष्ट्रांच्या ताब्यांत असलेल्या लोकांवर करण्यास पहात होते. स्वतः आपल्या अंकित लोकांवर नव्हे. जगानें हेंहि पाहिलें कीं, प्रेसिडेंट विलसननें जीं १४ तत्वें प्रतिपादन केलीं होतीं, तीं कार्यरूपांत

परिणत करण्याचें सामर्थ्य त्याच्या किंवा अमेरिकेच्या अंगांत राहिलें नाहीं. ह्या प्रकारें दुसऱ्या परतंत्र देशांचीहि तहपरिषदेंत कोरियाप्रमाणेंच निराशा झाली; पण खरें पाहिलें तर कोरियनांना राष्ट्रसंघाची किंवा तह परिषदेची मुळींच आशा वाटत नव्हती किंवा सुधारलेल्या जगावरहि त्याचा विश्वास नव्हता. त्यांचा फक्त आपल्या प्रयत्नांवर विश्वास होता. त्यांना वाटत असे कीं, जपानमध्यें समाजसत्तावाद्यांचें प्राबल्य झाल्यास आपली स्वातंत्र्याकांक्षा पूर्ण होईल; परंतु आतां तीहि त्यांची आशा मावळून गेली आहे. आतां त्यांनीं फक्त " उद्धरेदात्मनात्मानं " ही उक्ति हृदयाशीं बाळगिली आहे.

कोरियामध्यें जपाननें जे अत्याचार केले. त्यांच्याविरुद्ध जपानी प्रजेनेंहि पुष्कळ चळवळ केली. त्यामुळें ज्यांनीं कोरियनांवर अत्याचार केला, त्या अधिकाऱ्यांवर लष्करी कोर्टांत खटले चालविणें सरकारास भाग पडलें. ह्मणून भारतवर्षांतील इंग्रजी अंमलापेक्षां कोरियांतील जपानी अंमल चांगला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कोरियाचें स्वातंत्र्य नष्ट करणें स्वदेश रक्षणाकरितां जपानला भाग पडलें आहे. अन्ययुरोपियन राष्ट्रांनीं त्या देशांत घुसून जपानच्या छातीवर कट्यार रोंखण्याचा प्रयत्न केला नसता, तर जपाननें कोरियाच्या स्वातंत्र्याचा अपहार सहसा केला नसता आणि पुढेंहि अन्य युरोपियन राष्ट्रांची साम्राज्यतृष्णा शांत होईल, तेव्हां तो कोरियाला स्वातंत्र्यदान केल्याशिवाय सहसा राहणार नाहीं. हे ईश्वरा ! ह्या युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यतृष्णेमुळें दुर्बल देशांची किती हानि होत आहे हें नीट डोळे उघडून पहा आणि त्यांचें रक्षण कर. असली दुष्ट वासना बाळगणारीं राष्ट्रें जगांतून जितक्या लवकर नामशेष होतील तितकें जगाचें अधिक कल्याण होईल.

# जपानची उत्क्रांति.

जेव्हां पौर्वात्य लोक प्राश्चात्य राष्ट्राच्या साम्राज्यनिष्ठ घोरणांचें अवलंबन करितात, तेव्हां पाश्चात्यांना त्यांचा हेवा वाटतो, आणि ते ह्मणूं लागतात कीं, आमची संस्कृति श्रेष्ठ असल्यानें पौर्वात्य लोक आमचें अनुकरण करीत आहेत; पण पाश्चात्य लोकांची ही मोठी चूक आहे. आवश्यकता ही शोधांची जननी आहे, ह्या गोष्टीकडे ते लक्षच देत नाहींत. आजपर्यंत मनुष्यानें व्यक्तिशः किंवा समष्टिरूपानें जे मोठमोठे उद्योग केले आहेत, त्यांत त्यांचा उद्देश असा दिसून आला आहे कीं मनाला बुद्धीच्या अंकित ठेवावें. प्रवृत्तीला संकल्पाच्या आधिन करावें. आपल्या विचारांना बाह्यपरिस्थितीच्या अनुकूल करावें आणि तत्वांना वास्तविक स्थितीचें स्वरूप द्यावें. जर परिस्थितीच्या अनुकूल बनणें ज्ञानाचाच विषय होता, आणि प्रत्यक्ष कार्याशीं त्याचा जर कोणताच संबंध नसता, तर आमच्यापुढें बिकट सामाजिक प्रश्नच उभे राहिले नसते. परिस्थितिप्रमाणें शठंप्रतिशाठ्यं या धोरणानें वागून पौर्वात्यांनीं आपल्या तोंडांतला घांस काढून घेतल्यानें पाश्चात्यांना दुःख व हेवा उत्पन्न होणें साहजीकच होतें. पौर्वात्य, लोक पाश्चात्य संस्कृति श्रेष्ठ समजून तिचें अनुकरण मुळींच करीत नाहींत; परंतु ते नैसर्गिक नियमानुसार बाह्यपरिस्थितीच्या अनुकूल बनण्याचा प्रयत्न करीत आहेत.

जर कोणत्या पौर्वात्य देशानें पाश्चात्यांची नीति ओळखून तावडतोब तिचें अवलंबन केलें असेल, तर तें जपाननें. सुमारें ऐंशीं वर्षांपूर्वीं पहिल्या प्रथम पाश्चात्य राष्ट्रांची नजर जपानवर पडली; पण जपान एक बेट असल्यामुळेंच केवळ त्याचा बचाव झाला, आणि जेव्हां पहिल्याप्रथम पाश्चात्यांनीं त्या देशावर विनाकारण अग्निगोलकांचा वर्षाव केला, तेव्हां तोहि पूर्णपणें समजून चुकला कीं, या गोऱ्या लोकांच्या दास्यत्वापासून

अलिप्त राहण्याकरितां आपण कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे. जपान जो अवघ्या चाळीस वर्षांतच युरोपियन राष्ट्रांच्या साच्यांत घट्ट बसला, त्याचें कारण त्याला युरोपियनांचें अनुकरण करण्याची हौस होती हें नव्हे तर त्याला आपलें जपानत्व जगांत अभिमानानें मिरविण्याची हौस होती हें होय. तो आपलें अस्तित्व नामशेष करूं इच्छित नव्हता, तर उज्ज्वल करूं इच्छित होता. जपाननें नक्कल केली नाहीं तर अपूर्व बुद्धिमत्ता दाखवून ग्राह्यांस तेवढा ग्रहण केला. कोणत्याहि बलवान् शत्रूपासून बचाव करण्याचा खरा उपाय आपणाहि त्याचप्रमाणें बलवान् होणें हाच होय. जपानचा आधुनिक इतिहास अशा एका राष्ट्राचा इतिहास आहे कीं, ज्याला आपल्या लोकांच्या उणिवा समजत होत्या व जें युरोपियनांच्या तावडींतून सुटण्याकरितां आणि बलांत त्याची बरोबरी करण्याकरितां कोणताहि स्वार्थत्याग करण्यास तयार होतें. जरी युरोपियन लोक जपानपेक्षां सर्व बाबतींत श्रेष्ठ होते आणि जपान केवळ त्याच्या श्रेष्ठत्वाचें अनुकरण करीत होता, तरी त्यानें त्यांचा धर्म आणि नैतिक आदर्श ह्यांचेंहि ग्रहण केलें असतें; परंतु तें त्यानें मुळींच केलें नाहीं. त्यानें केवळ युरोपियनांची बरोबरी करण्याकरितां त्यांच्या कर्तबगारीचेंच अनुकरण केलें. त्यांची नीति त्यानें कधींच ग्रहण केली नाहीं. केवळ बल आणि धूर्तता हींच श्रेष्ठत्वाचीं चिन्हें नाहींत.

जपानच्या आधुनिक राज्यपद्धतीच्या विकासाचा त्याच्या परराष्ट्रीय नीतीशीं पूर्णपणें संबंध आहे. दोघांचाहि एकमेकांवर परिणाम झाला आहे. जेव्हां आह्मांला असें दिसून येतें कीं, जपानचें परराष्ट्रीय धोरण स्थीर करण्याकरितां त्याला आधुनिक लोकसत्तात्मक राज्यपद्धतीला कांहींअंशीं शरण जावें लागलें आणि गेल्या शंभर वर्षांत त्या देशांत जितकीं राजकीय परिवर्तनें झालीं तीं सर्व बाह्य जगांतील अपरिहार्य घटनांमुळें झालीं आहेत. इतकें ध्यानांत ठेवलें असतां दोघांचीहि सांगड आह्मीं कां घालतों हें तत्काळ समजून येईल. जपानच्या राजकीय

चरित्रावरून ही गोष्ट पूर्णपणें समजून येते कीं, जपाननें युरोपियनांचें जें अनुकरण केलें, तें मजेखातर किंवा शोकाकरितां नाहीं. त्यानें युरोपियनांचें किंवा अमेरिकनांचें तंतोतंत अनुकरण केलें नाहीं. त्यांत पुष्कळ इष्ट परिवर्तन केलें आहे. अजूनही पाहिजे तेव्हां मंत्रिमंडळ मोडण्याचा किंवा ठेवण्याचा जपानच्या बादशहाला पूर्ण अधिकार आहे, तसेंच पार्लमेंटानें जर सरकारचें समर्थन केलें नाहीं, तर पार्लमेंटहि बरखास्त करण्याचा त्याला अधिकार आहे आणि त्यांतल्यात्यांत मौज ही कीं, जेव्हां जेव्हां सम्राट पार्लमेंट बरखास्त करितो तेव्हां तेव्हां पुन्हा निवडून येणारे सदस्य प्रचलित सरकारच्याच पक्षाचे निवडून येतात, यावरून राजावर जनतेचा किती विश्वास व भक्ति आहे हें चांगलें कळून येतें.

चिनी–जपानी युद्धानंतर जपानी लोकांमध्यें राष्ट्रीयत्व व देशभक्ति ह्यांची भावना अधिकच जागृत झाली. आणि आपलें राजकीय अस्तित्व कायम राखण्याकरितां आधुनिक तऱ्हेनें लष्कराची संघटना करणें अत्यावश्यक आहे हें त्यांना पूर्णपणें कळून चुकलें व त्यांनींच होऊन सैन्यवृद्धिकरितां आम्हीं करांचा विशेष बोजा पत्करण्यास तयार आहोंत अशी प्रचलित सरकारास विनंति केली. त्यावेळीं जपान सरकार देशांतील राजकीय पक्षांचा विचार घेण्यास तयार झालें. आतां तेथें पुष्कळ राजकीय पक्ष झाले आहेत;परंतु त्यावेळीं तेथें वृद्धमुत्सद्दी आणि सरदार यांचा एकच प्रबल राजकीय पक्ष होता आणि वास्तविकपणें तोच राज्यकारभार पाहत असे. त्याच पक्षांतील लोक सम्राटला जो सल्ला देत त्याचप्रमाणें सम्राट वागत असे. देशांतील कोणत्याहि अन्य राजकीय पक्षाला त्या कृत्यास विरोध करण्याचें साहस होत नसे. सर्व सामान्यजनता त्या कारभारामुळें पूर्णपणें संतुष्ट होती अशांतली गोष्ट नाहीं, ह्मणून रूसो जपानी युद्धास प्रारंभ होण्याच्या कांहीं कालापूर्वी तेथील सामान्य लोकमत प्रबल होऊं लागलें आणि राजकीय कार्यावर त्याचा प्रभाव पडूं

लागला. जपाननें अतिशय सहनशीलता धारण केल्यामुळें चीन जबरदस्त बनून जपानला गमजा सांगूं लागला आहे असें सामान्यजनतेचें ह्मणणें पडलें. सरकारच्या धोरणाचें समर्थन करण्याकरितां सम्राटनें जें भाषण केलें, त्यांतील मुद्देहि लोकांना ग्राह्य झाले नाहींत आणि पार्लमेंटानें सरकारच्या निंदेचा ठरावहि पास केला. ह्यावर सम्राटनें पार्लमेंट बरखास्त केलें. यानंतर दीडवर्षानें युद्ध समाप्त झाल्यावर पोर्टस्माउथच्या तहाच्या अटी प्रसिद्ध झाल्या, तेव्हांहि लोकमत अतिशय प्रक्षुब्ध झालें होतें. त्यामुळें टोकियो येथें भयंकर दंगाहि झाला होता. जपानचें पार्लमेंट, वर्तमानपत्रें आणि सामान्यजनता ह्यांनीं एकस्वरानें सरकारचा निषेध चालविला होता. जपाननें रशियाजवळ पूर्ण नुकसान-भरपाई व संघालीन बेटें घेणें आवश्यक आहे असें त्याचें ह्मणणें होतें.

रूसो-जपानी युद्धानंतर आठ दहा वर्षांनीं लोकमताचा जोर जपानांत आणखीहि वाढला आणि तेथील राज्यकारभारांत लोकसत्ताक पद्धति जास्तच प्रचारांत आली. त्याचें कारण असें होतें कीं, रूसो जपानी युद्धामुळें जपान सरकारला अतिशय कर्ज झालें होतें. इतकें असूनहि तेथील सरकारला लष्कर आणि आरमार वाढविल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. वर्तमानपत्रें या गोष्टीचा निषेध करीत असत. या योगानें लोकमत लष्करी खर्च वाढविण्यास प्रतिकूल झालें. अशा रीतीनें प्रचलित सरकारविषयीं फारच अप्रीति पसरल्यानंतर तेथील मंत्रिमण्डळानें राजीनामा दिला. ह्या योगानें लोकमताचा फारच विजय झाला. त्यानंतर मार्कीस ओकुमा ह्याला मुख्य प्रधानपद अर्पण करण्यांत आलें. ते कोणत्याहि विशिष्टपक्षांतील किंवा वर्गांतील नव्हते. त्यांनीं सर्व पक्षांचें मिळून एक मंत्रिमंडळ बनविलें. या योगानें बहुतेक लोकांना आनंद झाला. नंतर पार्लमेंटची निवडणूक करण्यांत आली. त्यांत मंत्रिमण्डळाला पाठबळ देणारे सभासदच जास्त निवडून आले. परंतु डिसेंबर १९१५

मध्यें मार्कीस ओकुमाच्या परिक्षेची वेळ आली. त्यावेळीं पुन्हां लष्करी खर्च वाढविण्याचा प्रश्न उभा राहिला होता आणि तो सोडविण्यांत ओकुमाच्या मंत्रिमंडळाला हार खावी लागली. जर त्यावेळीं ओकुमानें पार्लमेंटच्या निर्णयाची उपेक्षा केली असती तर फारसें बिघडलें नसतें; परंतु त्याची कर्तबगारी कांहीं और होती. त्यानें पार्लमेंट बरखास्त करण्याचा बादशहास बेधडक सल्ला दिला. जरी त्याचें वय यावेळीं पंचाहत्तर वर्षांचें होतें आणि त्याचा एक पाय तुटल्यामुळें त्या जागीं लांकडी पाय बसविला होता तरी त्याचा उत्साह कांहीं अवर्णनीय होता. त्यानें देशांत सगळीकडे फिरून लष्कर वाढीच्या आवश्यकतेवर व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. ज्या ठिकाणीं त्याला जाणें शक्य नव्हतें. त्या ठिकाणीं फोनोग्राफद्वारां आपलीं भाषणें घोषीत करण्याचा त्यानें सपाटा चालविला. त्याच्या ह्या अपरिमित परिश्रमाचा परिणाम असा झाला कीं, नूतन पार्लमेंटच्या निवडणुकींत सरकारी पक्षाचें फार मोठें बहुमत झालें. पूर्वीची परिस्थिति साफ बदलून गेली. मग ओकुमाचा आनंद काय विचारावा ? सर्व दृष्टीनें त्याचा विजय झाला.

३ अक्टोबर सन १९१६ रोजीं आपला वृद्धापकाल झाल्यामुळें मार्कीस ओकुमानें राजीनामा दिला. आपल्या मागें काउंट केटो यास मुख्य प्रधानपद द्यावें अशी इच्छा त्यानें प्रकट केली; परंतु सम्राटनें ती गोष्ट मान्य केली नाहीं. गतनिवडणुकींत केटोचा पक्ष फार प्रबल होता आणि मुख्य प्रधानकीस तो लायकहि होता; परंतु पुन्हां सरदाराच्या हातीं राजकारणाचीं सूत्रें येणें योग्य आहेत असें सम्राटला वाटल्यामुळें त्यानें आपल्याच तंत्रानें मंत्रिमंडळाची निवडणूक केली. जपानांत अजून लोकसत्ताक पद्धति रुजलेली नाहीं. अर्थात जपाननें पाश्चात्य गोष्टींचें पूर्णपणें अनुकरण केलेलें नाहीं. त्यानें आपल्या उन्नतीस आवश्यक इतक्या गोष्टी ग्रहण केल्या आणि बाकी सर्व सोडून दिल्या. तेथील

शिक्षित लोकांमध्येंहि अजून लोकसत्ताक राज्यपद्धति दृढमूल झालेली नाहीं. तेथील गरीब लोक शिक्षण संपादन करून सरकारी नोकरींत शिरतात आणि व्यापारी वगैरे धनिक लोक जुन्या मताप्रमाणें वागतात. राजकीय तत्त्वें डोळयापुढें ठेऊन सर्वसाधारण लोकांचें हित साधण्याकरिता झटणारे समाजसत्तावादी वगैरे राजकीय पक्ष तेथें अजून प्रबल झालेले नाहींत. तेथील बहुतेक लोक राजकीय बाबतींत उदासीन असतात. ते सांगतात कीं, आम्हीं सम्राटाच्या पक्षाचे आहोंत आणि सम्राटच इतर सर्व सरकारीमंडळाचा नियामक असल्यानें आम्हीहि सरकारच्या पक्षाचे आहोंत. अन्यराजकीय पक्षांशीं आमचा कांहींच संबंध नाहीं. तेथील बहुतेक वर्तमानपत्रेंहि राजपक्षांचींच आहेत. अन्यपक्षांचीं वर्तमान पत्रें अगदीं थोडीं आहेत आणि जीं आहेत त्यांचा खपहि अगदीं कमी आहे.

जर जपानला युरोपियन आणि अमेरिकन ह्यांच्या हल्ल्याचें भय वाटलें नसतें तर तेथें पूर्ण एकतंत्री राज्यपद्धतीच दिसून आली असती. पार्लमेंट आणि मंत्रिमंडळ यांचा जो देखावा तेथें दिसून येतो तो केवळ परकीय लोकांपासून स्वदेशाचा बचाव करण्याकरितां होय. जपानमध्यें संघटित राज्यपद्धति स्थापन करण्याचा जो हेतु होता तो अजूनहि कायम आहे. आपणहि सर्व बाबतींत युरोपियन व्हावें ह्मणून जपाननें संघटित राज्यपद्धति ग्रहण केली नव्हती. त्यानें प्रारंभापासून शेवटपर्यंत सर्व गोष्टी आपल्या स्वतःच्या ठेवल्या आहेत. त्यानें आपले जुने विचार किंवा जुने आदर्श सोडलेले नाहींत किंवा जुन्या संस्कृतीचा परित्याग केलेला नाहीं.

जेव्हां जपान चांगला बलवान झाला तेव्हां स्वदेशांत आणि परदेशांत जपानचा सन्मान वाढविण्यावर त्यानें सर्वांपेक्षां जास्त भर दिला. अज्ञ लोक जपानच्या साम्राज्यतृष्णा व युद्धप्रियता वाढत चाल-

अशी समजूत करून घेऊन त्याला दोष देतात; परंतु त्यांना हें माहीत नाहीं कीं, जपाननें आजपर्यंत जीं युद्धें केलीं आहेत तीं केवळ अपरिहार्य ह्मणून आपल्या सन्मानाकरितां केलेलीं आहेत. जपानी लोक अपमान सहन करणारे नाहींत. ते स्वभावतः क्षत्रिय आहेत. ही त्यांची क्षत्रियवृत्ति युरोपियन राष्ट्रांच्या स्वार्थाआड आल्यानें एन केन कारण जगांत जपानची नाचक्की करण्याचा त्यांनीं प्रघात चालू केला आहे. जपाननें कोरियाचें जें संरक्षण केलें त्यामुळें या गोऱ्या राष्ट्रांना हा पिंवळा बागुलबोवा कदाचित् आशियाटिकांचें एकीकरण करून आपणाला आशियाखंडांतून हांकलून देईल असें भय पडलें आहे. सर्व जगतावर अधिसत्ता गाजविण्याचा ताम्रपट ईश्वरानें आपणास अर्पण केला आहे, अशी समजूत असलेल्या गोऱ्यांना जपानचा हेवा वाटणें सहाजिकच आहे. तुह्मीं बरोबरीच्या नात्यानें आपणाशीं व्यवहार केला पाहिजे, न केल्यास जपानी तोफांचें सामर्थ्य रशियाप्रमाणें अन्य युरोपियन राष्ट्रांच्याहि प्रत्ययास येईल असें त्यानें आपल्या कृतीनें गोऱ्या राष्ट्रांस कळविलें आहे. आपण ज्याप्रमाणें आशियांतील अन्य राष्ट्रांना लुटीत आहों त्याचप्रमाणें जपाननेंहि गुपचूपपणें आपणांस लूट करूं द्यावी अशी गोऱ्या लोकांची मनिषा होती; परंतु ती त्यांची मनिषा जपाननें पूर्णपणें निष्फळ केली इतकेंच नव्हे, तर जपान आशियांतून चंबुगवाळें उठविण्यास आपणास भाग पाडील कीं काय अशी त्यांना भीति वाटूं लागली आहे. सृष्टीचा असा नियम आहे कीं, एकच राष्ट्र ह्मणून कधींहि निरंतर बलवान् रहात नाहीं. एक राष्ट्र अबल होतांच दुसरें राष्ट्र येऊन त्याची जागा ग्रहण करितें. आजपर्यंत जगांत शेंकडो साम्राज्यें उत्कर्षास पोहोंचून नष्ट झालीं आहेत. मग या युरोपियन राष्ट्रांचीच ती कथा काय ? पण एक गोष्ट मात्र विचारणीय आहे. आज ज्या रस्त्यानें जपान [illegible] आहे त्या योगानें त्याची खरी उन्नति होईल कीं, नाहीं याबद्दल

कोरिया आणि जपान यांच्यामध्यें अस
जबरदस्त संशय आहे. आतांनु चंद्रावरहि त्यांची दृष्टी होती. त्याच- आणि ज्यांत कोणी बलवान बिण्याकरितां सुशिमा प्रांत उपटण्याचय असलें समानतेचें युग अस्त्रारें ते दोघेहि आपआपला हेतु साध्य करण्यास नाहीं तरच सर्व जगांतील लोकांत बंधुभाव प्रसृत ... जगांत चाललेल्या घडामोडीवरून अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, जरी समानतेचें युग दूर असलें तरी युरोपियन राष्ट्रांच्या स्वार्थास लवकरच आळा बसल्याशिवाय रहाणार नाहीं. ईश्वर करो व तें युग लवकर येऊन या गोऱ्यांच्या अत्याचारापासून जगाचा बचाव होवो.

सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कांहीं पोर्तुगीज, डच आणि स्पॅनिश लोकांनीं पहिल्याप्रथम जपानांत जाऊन तेथें आपला पाय रोवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनीं पहिल्यानें तेथें आपले मिशनरी पाठविले आणि जेव्हां तेथें त्या मिशनऱ्यांचा चांगला सत्कार झाला असें त्यांनीं पाहिलें तेव्हां पुढें पाय पसरण्याकरितां त्यांनीं आपले व्यापारी पाठविले. त्या लोकांच्या कारस्थानामुळें लवकरच जपानी लोकांना कळून आलें कीं, हे परकीय लोक व्यापाराच्या मिषानें आमच्या देशावर अधिकार गाजवूं इच्छित आहेत तें पाहून जपानी लोकांनीं त्या परकीय लोकांना जबरदस्तीनें आपल्या देशांतून हांकलून लावलें. यानंतर तीनशें वर्षेपर्यंत जपानी लोक ह्या परकीयांच्या त्रासापासून अलिप्त राहिले. तीनशें वर्षांनंतर त्यांना दिसून आलें कीं, पोर्तुगीज, डच आणि स्पॅनिश लोकांनीं पूर्वीं ज्याप्रमाणें आपल्या देशांत वर्तन केलें होतें तसलेंच वर्तन इंग्रज, फ्रेंच आणि रशियन लोक चीनाशीं करीत आहेत. त्याच सुमारास जपाननें युरोपियन लोकांना आपल्या देशाशीं व्यापार करण्यास परवानगी दिली होती; पण लवकरच त्यांना कळून आलें कीं, युरोपियन राष्ट्रें आशियाटिकांशीं अतिशय निंदनीय व अनुचित व्यवहार करीत आहेत. १८४० मध्यें जपानला दिसून आलें कीं, इंग्रज लोक अफूचें

तच नाहा. त्यावळा ब्रिटननें अफूचा व्यापार सुरू ठेवण्या
भाग पाडलें, त्याचें हांगकांग हें महत्वाचें बंदर हिरावून घेतलें
याप्रमाणें दुसऱ्या राष्ट्रापुढें चीनला लुबाडण्याकरितां एक घाणेर
हरण घालून ठेवलें. यानंतर १८५७ ते १८६० पर्यंत जें युद्ध झा
त्यांत फ्रान्सनें ब्रिटनला मदत केली होती आणि या दोघांनींहि
पेकिंग आपल्या ताब्यांत घेतलें होतें. या दोन्हीं युद्धांत नुकसा
ह्मणून विनाकारण चीनाकडून मोठमोठ्या रकमा वसूल करण्यां
होत्या. परकीयांचे हे सर्व अत्याचार पाहून जपानी लोक ज
आणि आपणावरही युरोपियन लोक असाच जुलूम करणार ना
बद्दल कांहीं तरी तजवीज केली पाहिजे ही भावना त्यांच्यांत प्रादु
झाली. ह्मणूनच जपाननें आपलें लष्करी सामर्थ्य वाढविलें आणि याच-करितां आपली जुनी राज्यपद्धति कायम राखूनहि कांहींअंशीं लोकसत्ता-त्मक राज्यपद्धतीचा अंगिकार केला. या सर्व गोष्टींचें तात्पर्य हेंच कीं, ह्या युरोपियन राष्ट्रांकडून नामुष्कीचें मरण पत्करण्यास तो तयार नव्हता. त्याला आपलें अस्तित्व कायम राखण्याची इतकेंच नव्हे, तर सन्मानानें कायम राखण्याची इच्छा होती. पन्नास वर्षेपर्यंत तो एकसारखा याच दृष्टीनें आपली उन्नति करीत राहिला होता. त्याला अशी आकांक्षा होती कीं, एक दिवस आपल्या तोफा पोर्टआर्थरवर डागल्या जातील व पॅसिफिक महासागरांत आपण रशियाचें आरमार पार बुडवून टाकूं. कर्तबगारीच्या जोरावर ही आकांक्षा त्यानें पूर्णतेस नेली.

ब्रिटन आणि रशिया केवळ हॉंगकांग व व्लेडिव्हास्टाक घेऊनच संतुष्ट झाले नाहींत. इंग्रज लोक शांघायजवळचा चूसन द्वीपसमूहहि

कोरिया आणि जपान यांच्यामध्यें असा जबरदस्त संशय आहे. आतांन बंदरावरहि त्यांची दृष्टी होती. त्याच- आणि ज्यांत कोणी बलवानविण्याकरितां सुशिमा प्रांत उपटण्याच्या असलें समानतेचें त्याचबरोबर एकमेकांचा मत्सर करून त साध्य करण्यास न हीं गणोत हीं दोन्हीं बलवान् राष्ट्रें आपापसांत तह करतात कीं, जग च्या उरावर बसतात या विषयीं लोक संशयांत होते. कारण जरी युरोपियन राष्ट्रांची अशी समजूत होती कीं, आशियाटिकांशीं करतांहि तऱ्हेचा व्यवहार केला तरी त्यांत पाप नाहीं. त्या वेळीं जर येऊन हे राष्ट्र आशियाटिकांचा पक्ष घेत असेल तर तें नीतीच्या करितां नसून स्वतःच्या लाभाकरितां होय. जपाननें उठून सोळा यांवर उभें रहाण्याचा जेव्हां विचार केला तेव्हां या धोरणाचें स्पॅनिश र मिळालें. जपानच्या उन्नतिमुळें युरोपियन राष्ट्रांच्या साम्रा- ज्याच आळा बसला आणि आशियांत क्रांतियुगास आरंभ झाला. कि हीं उद्यां आशियांतील सर्व देश पूर्ण स्वतंत्र झाल्याशिवाय हें तियुग समाप्त होणार नाहीं हें खास.

REFBK-0004473